सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. ३० ऑगस्ट २०२५ | वर्ष - तिसरे | अंक १४८ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## मराठा समाजाबाबत आम्ही सकारात्मक, ठाकरे-पवारांनी मराठा-ओबीसींमध्ये भांडण लावू नये

### देवेंद्र फडणवीसांचे आवाहन

मुंबई : गेल्या दहा वर्षात आमचं सरकार असतानाच मराठा समाजाला न्याय दिला, आरक्षण दिलं. त्या आधीच्या कोणत्याही सरकारने मराठा समाजासाठी काहीही केलं नाही असा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. मराठा आणि ओबीसींमध्ये भांडण लागावं अशी ठाकरे-पवारांची इच्छा असल्याची टीकाही फडणवीस यांनी केली. मराठा समाजाच्या मागण्यांबाबत आम्ही सकारात्मक असून चर्चेतून मार्ग काढू असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

मुंबईतील आझाद मैदानात मनोज जरांगे यांचे मराठा आरक्षणसाठी आंदोलन सुरू आहे. त्यावर बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर टीका केली. काही पक्ष हे सोईची भूमिका घेत आहेत. ते ठाम भूमिका घेत नाहीत. तुमची कायदेशीर भूमिका काय आहे ते सांगा. ते समाजासमाजात भांडण लावत आहेत. राजकीय पोळी भाजून घेण्याचं काम करत आहेत असं फडणवीस म्हणाले.

शासनाची भूमिका सहकार्याची

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शासनाची भूमिका सहकार्याची आहे. एखादं आंदोलन लोकशाही मार्गाने सुरू असेल तर त्याला सहकार्य करणे, चर्चेतून मार्ग काढण्याचा प्रयत्न सुरू आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात लोक आल्यानंतर वाहतूक कोंडी होत आहे. काही लोक आडमुठेपणामुळे वागतात आणि पूर्ण आंदोलनाला गालबोट लागतं, त्याची खबरदारी घ्यावी.

न्यायालयाच्या निर्देशानुसार प्रशासन कार्यवाही करेल

उच्च न्यायालयाने काही बंधने घालून दिले आहेत. त्यानुसार प्रशासन कार्यवाही करत आहे असं फडणवीस म्हणाले. ते म्हणाले की, मनोज जरांगे यांनी आंदोलनासाठी एक दिवस वाढवून मागितला आहे. कायद्याच्या चौकटीत राहून, उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पोलिस त्यावर कार्यवाही करतील. प्रशासन त्या संदर्भात सकारात्मक विचार करेल.

मनोज जरांगे यांच्या ज्या मागण्या आहेत त्यावर सकारात्मक विचार करण्याचा प्रयत्न आहे. त्यांच्या मागण्यांवर कायदेशीर आणि संविधानातील मार्ग काढावा लागेल. त्यासाठी एक समिती नेमली आहे असं फडणवीस म्हणाले. लोकांना कुठेही त्रास होईल असं कुणीही वागू नये. चर्चेतून मार्ग निघेल असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

ओबीसी-मराठ्यांमध्ये विरोधक भांडण लावतात

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, दोन समाज एकमेकांसमोर उभे राहू नयेत अशी आपली इच्छा आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये, या काळातच मराठा समाजाला न्याय मिळाला आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्याचं काम आम्हीच केलंय. या समाजात उद्योगासाठी मदत केली आहे. शिक्षण आणि रोजगाराच्या योजना राबवल्या आहेत. मराठा समाजासाठी आम्ही सकारात्मक आहोत. त्या समाजाच्या पाठीशी आम्ही आहोत.

काही लोक जाणीवपूर्वक ओबीसी आणि मराठा समाज एकमेकांसमोर उभे करण्याचा प्रयत्न करत आहेत. पण त्यांनी तसं करू नये, नाहीतर त्यांचं तोंड भाजेल. एकाला समोर करायचं, दुसऱ्याला नाराज करायचं. नंतर त्याला पुन्हा समोर करायचं. एकमेकांमध्ये लढवायचं हे काम काही लोकांचं सुरू आहे असं म्हणत फडणवीसांनी विरोधकांवर टीका केली.

समिती मागण्यांचा विचार करेल

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मनोज जरांगे यांनी केलेल्या मागण्यांवर कार्यवाही करण्यासाठी एक उच्च स्तरीय समिती नेमण्यात आली आहे. या संदर्भात कायदेशीर प्रक्रिया काय आहे याचा समिती विचार करेल. या कमिटीला शासनाचे सर्व अधिकार आहेत. त्यामुळे या समितीचा निर्णय हा मंत्रिमंडळाचा निर्णय असेल.

## पंतप्रधान मोदींना जपानमध्ये खास भेट म्हणून मिळाली दारुम बाहुली

टोकियो / नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या दोन दिवसांच्या जपान दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात शुक्रवारी (दि.२९) टोकियोमध्ये शोरिंझान दारुमा-जी मंदिराचे मुख्य पुजारी रेव सेइशी हीरोसे यांनी पंतप्रधान मोदींना एक खास भेट म्हणून दारुम डॉल दिली. ही डॉल जपानमधील पारंपरिक बाहुली मानली जाते, जी सौभाग्य आणि यश यांचं प्रतीक आहे. विशेष म्हणजे, या बाहुलीचं भारताशी एक खोल नातं आहे.



दारुम डॉल ही गोलसर, खोखली आणि हात-पाय नसलेली एक पारंपरिक जपानी बाहुली आहे. तिचं डिझाईन बोधिधर्म या बौद्ध भिक्षूच्या आधारावर तयार करण्यात आलं आहे. सामान्यतः ही बाहुली लाल रंगाची असते, कारण एशियाई संस्कृतीत लाल रंगाला सौभाग्य, समृद्धी आणि यशाचं प्रतीक मानलं जातं. दारुम डॉलचा संबंध भारतातील बौद्ध भिक्षू बोधिधर्म यांच्याशी आहे. असं मानलं जातं की बोधिधर्म दक्षिण भारतातून चीन आणि जपानमध्ये गेले होते, आणि तिथूनच झेन बौद्ध धर्माच्या परंपरेची सुरुवात झाली. जपानमध्ये त्यांना 'दारुमा' असं म्हटलं जातं, आणि त्यावरूनच दारुम डॉल या बाहुलीचं नाव पडलं. म्हणूनच दारुम डॉल ही फक्त जपानी संस्कृतीचा भाग नाही, तर तिचे मूळ थेट भारताच्या बौद्ध धर्माशी जोडलेलं आहे.

## चंबा येथे दरड कोसळून ११ जणांचा मृत्यू

शिमला : हिमाचल प्रदेशातील चंबा आणि भरमौर परिसरात जोरदार पावसामुळे मोठ्या प्रमाणावर हानी झाली आहे. भरमौर परिसर संपूर्णपणे बाहेरच्या जगापासून तुटून गेला आहे. अनेक ठिकाणी रस्ते कोसळले असून वाहतुकीस अडथळा निर्माण झाला आहे. दूरसंचार सेवा सुद्धा अनेक भागांत अजूनही सुरू झालेल्या नाहीत. मणिमहेश यात्रेत सहभागी हजारो भाविक अडकले आहेत.

गेल्या ४ ते ५ दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आणि भूस्खलनामुळे सामान्य जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक लोकांनी आपली वाहने रस्त्यावरच सोडून पायपीट सुरू केली आहे. चंबा जिल्ह्यातील भरमौर भागात प्रसिद्ध मणिमहेश यात्रा सुरू आहे. गेल्या ४ दिवसांपासून मोबाईल नेटवर्क पूर्णपणे बंद असल्याने यात्रेकरूंचा त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क तुटला होता, ज्यामुळे चिंता वाढली होती. भूस्खलन आणि रस्ते बंद असल्याने अनेक यात्रेकरू भरमौरमध्ये अडकले आहेत. चंबा जिल्ह्यात आतापर्यंत ११ लोकांचा मृत्यू झाला आहे. परिस्थिती पाहता मणिमहेश यात्रेला तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे.

मणिमहेशमधून सुमारे ३ हजार लोक सुखरूप परतले आहेत, पण अजूनही सुमारे ७ हजार भाविक तिथे अडकलेले आहेत. त्यांच्या मदतीसाठी प्रशासनाने हेल्पलाईन क्रमांक जाहीर केले आहेत. ही यात्रा दरवर्षी जन्माष्टमीपासून राधाष्टमीपर्यंत आयोजित केली जाते. यंदा जन्माष्टमी १६ ऑगस्टला होती तर राधाष्टमी ३१ ऑगस्टला आहे.

दरम्यान, हिमाचल प्रदेशातल्या या मुसळधार पावसामुळे राज्यभरात जनजीवन ठप्प झाले आहे. राज्यातील २राष्ट्रीय महामार्गांसह एकूण ७९५ रस्ते बंद आहेत. तसेच ५ जिल्ह्यांतील सर्व शैक्षणिक संस्था बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.ब्यांस नदीच्या पातळीत मोठी वाढ झाली आहे. हवामान विभागाने चंबा, कांगडा आणि मंडी जिल्ह्यांसाठी २ दिवसांचा रेड अलर्ट जारी केला आहे.भूस्खलनामुळे अनेक ठिकाणी घरांमध्ये पाणी शिरले आहे, तसेच चंबा जिल्ह्यात ५ घरे कोसळली आहेत.

## बिहारच्या ३ लाख मतदारांना निवडणूक आयोगाची नोटीस

### परदेशी नागरिक असल्याच्या संशयावरून बजावली नोटीस

पाटणा : बिहारमध्ये सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेच्या (एसआयआर) दरम्यान सुमारे ३ लाख मतदारांना नोटीस पाठवण्यात आली आहे. या नागरिकांची नागरिकता संशयास्पद असल्याचा संशय आहे.

बिहारमध्ये बांगलादेश, नेपाळ, म्यानमार आणि अफगाणिस्तान येथून आलेल्या संशयित मतदारांना बिहारमधील विविध जिल्ह्यांमध्ये, विशेषतः आंतरराष्ट्रीय सीमा लागून असलेल्या भागांतील निर्वाचन




नोंदणी अधिकाऱ्यांकडून (ईआरओ) या नोटिसा पाठवण्यात आल्या आहेत. या मतदारांच्या दस्तावेजांची पडताळणी करताना काही विसंगती आढळून आल्यामुळे ही कारवाई करण्यात आली.

या संशयित मतदारांची नावे १ ऑगस्ट रोजी जाहीर झालेल्या मसुदा मतदार यादीत प्रकाशित करण्यात आली होती. निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे की, जर हे मतदार भारतीय नागरिक असल्याचे योग्य कागदपत्र सादर करण्यात अयशस्वी झाले, तर त्यांची नावे ३० सप्टेंबर रोजी प्रसिद्ध होणाऱ्या अंतिम मतदार यादीतून वगळली जातील.

निवडणूक आयोग या प्रकरणांमध्ये कायदेशीर कारवाई करण्याचा विचार सुद्धा करत आहे. यासंदर्भात निवडणूक आयोगातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार बिहारमधील ३ लाख लोकांची नागरिकता संशयास्पद आहे. अशा लोकांना नोटीस बजावण्यात आली आहे. या मतदारांपैकी बरेच जण बांगलादेश आणि नेपाळ येथील असल्याचा संशय आहे. तर काहीजण म्यानमार आणि अफगाणिस्तान येथील असल्याचीही माहिती आहे. जिल्ह्यांमध्ये बूथ लेव्हल ऑफिसर्स (बीएलओ) यांनी केलेल्या क्षेत्र भेटीदरम्यान ही माहिती समोर आली, आणि त्यानंतर संबंधित ईआरओने नोटिसा जारी केल्या.

दस्तऐवज पडताळणीदरम्यान अनेक विसंगती आढळल्या, आणि त्यानंतर क्षेत्रीय चौकशी करून नोटिसा पाठवण्यात आल्या. पूर्वी चंपारण, पश्चिमी चंपारण, मधुबनी, किशनगंज, पूर्णिया, कटिहार, अररिया आणि सुपौल हे जिल्हे अशा प्रकरणांसाठी विशेष लक्षात आले आहेत. ज्यांना नोटिसा पाठवण्यात आल्या आहेत, त्यांच्याकडून आवश्यक दस्तावेज सादर करण्यास सांगण्यात आले आहे. जर त्यांनी योग्य कागदपत्र सादर केली, तर त्यांची नावे मतदार यादीतून काढली जाणार नाहीत.

पण जर कोणी आवश्यक दस्तावेज सादर करण्यात अपयशी ठरले, तर त्यांची नावे मसुदा मतदार यादीतून वगळली जातील आणि त्यांच्याविरुद्ध कारवाईही होऊ शकते. यानंतर आयोगाचे अधिकारी जिल्हा प्रशासनाला अहवाल देतील की हे मतदार गैर-भारतीय नागरिक असल्याचे

### अजित पवारांवर कांद्याची माळ फेकण्याचा प्रयत्न, संभाजी ब्रिगेड आक्रमक

अहिल्यानगर: आज श्रीगोंदा येथे उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या दिशेने कांद्याची माळ फेकण्याचा प्रयत्न झाला. याप्रसंगी, पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतलं असून ते संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी असल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादीचे तत्कालीन युवक अध्यक्ष सूरज चव्हाण यांच्याकडून लातूरमध्ये संभाजी ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्षांना मारहाण करण्यात आली होती. याच पार्श्वभूमीवर संभाजी ब्रिगेडच्या समर्थकांनी असे कृत्य करण्याचा प्रयत्न केला असावा, असा अंदाज आहे. श्रीगोंदा येथे शेतकरी मेळाव्यात अजित पवारांचे भाषण सुरू असताना संभाजी ब्रिगेडचे काही कार्यकर्ते हातात कांद्याची माळ घेऊन आले होते.

## मोदींवर अपशब्दांचा वर्षाव अन् शाहांचा इशारा... जितक्या शिव्या द्याल, तितकं कमळ बहरणार!

बिहार : बिहारमध्ये या वर्षाअखेर होणाऱ्या विधानसभा निवडणुकांची तयारी सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर भाजप आणि काँग्रेस यांच्यातील आरोप-प्रत्यारोपांच्या फेऱ्यांनाही चांगलाच वेग आला आहे. दरम्यान, काँग्रेस नेते राहुल गांधी हे मतदार हक्क यात्रा घेऊन बिहार दौऱ्यावर आहेत. त्यांच्या सभांमुळे काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, या दौऱ्यादरम्यान मोठा वाद उद्भवला. काँग्रेसच्या मंचावरून बोलताना युथ काँग्रेसच्या एका स्थानिक नेत्याने थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना त्यांच्या आईवरून शिवीगाळ केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणाने राजकीय वर्तुळात खळबळ उडवली असून भाजपने यावरून काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी यावर तीव्र प्रतिक्रिया नोंदवली आहे. काँग्रेसला जनतेच्या प्रश्नांना उत्तर देता येत नाही म्हणून वैयक्तिक पातळीवर अशा घाणेरड्या शब्दांचा वापर केला जातो. ही मानसिकता बिहारच्या जनतेला नक्कीच मान्य होणार नाही, अशी टीका अमित शाह यांनी केली आहे. यामुळे बिहारमधील निवडणूक रंगत अधिकच वाढली असून पुढील काही दिवसांत हा वाद आणखी चिघळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

गुवाहाटीत अमित शाहांचा काँग्रेसवर हल्लाबोल

आसामची राजधानी गुवाहाटी येथे आयोजित सभेत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली. आपल्या भाषणात त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आंतरराष्ट्रीय मान्यतेचा उल्लेख करत, आजपर्यंत २७ देशांनी नरेंद्र मोदींना सर्वोच्च पुरस्कारांनी सन्मानित केले आहे. असा नेता ज्याचा संपूर्ण जग आदर करतो, तो भारताचा पंतप्रधान आहे, असे सांगितले. मात्र, त्याचवेळी अमित शाह यांनी काँग्रेस नेते राहुल गांधींवर निशाणा साधला. भारतीय राजकारणात द्वेष आणि तिरस्काराचे नकारात्मक राजकारण सुरू करण्याचे काम राहुल गांधी करत आहेत. बिहारमध्ये सुरू असलेल्या काँग्रेसच्या 'घुसखोर बचाओ यात्रेतून' पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या दिवंगत मातेसाठी अपशब्द वापरण्यात आले. हे काँग्रेस नेत्यांचे सर्वात घृणास्पद कृत्य आहे, असे शाह म्हणाले.

## मोफत पार्किंग सुविधेमुळे शिर्डीतील वाहतूक सुरळीत - विखे पाटील

शिर्डी, दि. २९ - साईबाबा संस्थानच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या मोफत पार्किंग सुविधेमुळे शहरातील वाहतूक व्यवस्था नियंत्रित ठेवण्यास मोठा हातभार लागणार असून मंदिरासमोरील मार्ग भाविकांसाठी अधिक सोयीचा ठरेल, अशी अपेक्षा जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केली.

साईबाबा संस्थानतर्फे मध्यवर्ती भागात सुरू करण्यात आलेल्या मोफत पार्किंग सुविधेचा औपचारिक शुभारंभ पालकमंत्री श्री.विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमास संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर,



उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, तहसीलदार अमोल मोरे, मुख्याधिकारी सतीश दिघे, माजी नगराध्यक्ष कैलास कोते, अभय शेळके, विजय जगताप, रविंद्र गोंदकर, बाबासाहेब कोते यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

भाविकांसाठी सुरू केलेल्या या पार्किंग सुविधेचे स्वागत करून श्री.विखे पाटील म्हणाले, या सुविधेमुळे भाविकांची मोठी सोय होणार आहे. शिर्डीत येणाऱ्या भाविकांची संख्या विचारात घेतली तर शहरात पार्किंगसाठी कुठेही जागा उपलब्ध नाही. त्यामुळे सर्व वाहने व प्रवासी बस रस्त्यावर उभी राहत असल्याने वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होते.

पुढील काळात खासगी प्रवासी बससुद्धा या ठिकाणाहून सोडाव्यात, अशी सूचना त्यांनी केली. नव्या पार्किंग ठिकाणाहून संस्थानतर्फे भाविकांसाठी बस सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तरीदेखील या ठिकाणी स्वच्छतागृह, वीजेची सुविधा व पक्के बांधकाम होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात थांबण्याची सोय निर्माण करण्यात यावी. तसेच दिव्यांग व्यक्तींसाठी छोट्या इलेक्ट्रिक बस संस्थानने घ्याव्यात, अशी सूचना मंत्री विखे पाटील यांनी केली.

या पार्किंग सुविधेमुळे मंदिर परिसर भविष्यात 'नो पार्किंग झोन' म्हणून घोषित करता येईल. याचा थेट फायदा वाहतूक नियंत्रणासाठी होईलच, शिवाय शहरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळेल. आगामी काळात शिर्डी शहराच्या सौंदर्यीकरणाचे व्यापक काम हाती घेण्यात येणार असल्याचेही श्री.विखे पाटील यांनी सांगितले.

## भाविकांच्या आरोग्यास बाधा पोहोचणार नाही याची खबरदारी घ्या!

### सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोंतूला यांचे आवाहन

तभा वृत्तसेवा

माहूर , दि.२९ ऑगस्ट : माहूर गडावर पुढील महिन्यात साजरा होणाऱ्या नवरात्र महामहोत्सवासाठी सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीथ चंद्रा दोंतूला यांच्या अध्यक्षतेखाली आज दि २९ रोजी बैठक घेण्यात आली. या बैठकीत नवरात्र उत्सव काळात येणाऱ्या भाविकांच्या आरोग्याला बाधा पोहोचणार नाही याची खबरदारी घेण्याचे आवाहन उपस्थित सर्व विभाग प्रमुखांसह कर्मचाऱ्यांना सहाय्यक जिल्हाधिकारी जेनित चंद्रा दोंतूला यांनी केले



या बैठकीत सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोंतूला यांचे सह तहसीलदार अभिजीत जगताप, गटविकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस ,पोलीस निरीक्षक गणेश कराड, नगराध्यक्ष फिरोज दोसानी, नायब तहसीलदार कैलास जेठे, नायब तहसीलदार श्रीमती अरुणा सूर्यवंशी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता डी के भिसे ,वैद्यकीय अधीक्षक डॉ किरण कुमार वाघमारे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ आर डी माचेवार, मरविम कंपनीचे अभियंता आर बी शेंडे, एसटी महामंडळाचे सी आर समर्थवाड, माहूर न पं चे कार्यालय अधीक्षक संदीप गजलवाड, नको चे अभियंता गिरीश डूबेवार, विस्तार अधिकारी रमेश गावंडे, डॉ अभिजीत आंबेकर, तलाठी चंद्रकांत बाबर, महसूल सहाय्यक प्रभू गावंडे, श्री रेणुका देवी संस्थानचे विश्वस्त संजय कान्नव, क. अभियंता पी व्ही हंचाटे ,व्यवस्थापक योगेश साबळे ,वन विभागाचे वनपाल मनोहर कत्तुलवार, श्री दत्त शिखर संस्थांनचे लेखापाल प्रकाश गायकवाड यांचे सह देवस्थानचे प्रतिनिधी,गडावरील व्यापारी, पत्रकार ,पोलीस मान्यवर उपस्थित होते.

बैठकीत,या नवरात्र महोत्सवात लाखो भावीक येणार असल्याने उपस्थित सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी त्यांना दिलेली जबाबदारी पार पाडत भाविकांच्या आरोग्याला बाधा पोचणार नाही तसेच त्यांची सुरक्षा व्यवस्था, महाप्रसाद तसेच एसटी महामंडळाने त्यांना गडावर पोहोचविण्याची जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडत मरावीकंने विद्युत पुरवठा खंडित होऊ देऊ नये, सर्व विभाग प्रमुखांनी दिलेली जबाबदारी चोखपणे पार पाडावी, अशा सूचना यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोंतुला यांनी दिल्या.

### शिवसेना आमदार अमोल खताळ यांच्यावर हल्ला

संगमनेर : संगमनेर विधानसभेचे शिवसेनेचे आमदार अमोल खताळ यांच्यावर हल्ला झाल्याची घटना गुरुवारी संध्याकाळी ७.४० वाजेच्या सुमारास नाशिक-पुणे महामार्गावरील मालपाणी लॉन्स येथे घडली. हल्लेखोर संगमनेर तालुक्यातील एका ग्रामीण भागातील आहे. यामुळे संगमनेर तालुक्यात तणावाचे वातावरण निर्माण झाले. खताळ यांनी संयमाची भूमिका घेत कार्यकर्त्यांना संयम आणि शांतता ठेवण्याचे आवाहन केले आहे.

संगमनेर शहरातील मालपाणी लॉन्स येथे गणेशोत्सवानिमित्त संगमनेर फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले आहे. खताळ कार्यक्रमासाठी गेले होते. कार्यक्रम पार पडल्यानांतर नागरिकांना भेटत त्यांच्या वाहनाकडे जात असताना ग्रामीण भागातील एका युवकाने त्यांच्यावर हल्ला केला. त्यानंतर त्याला पोलिसांनी लगेचच ताब्यात घेतले.

## अजिंठा घाटात तिहेरी अपघात, चार जण जखमी घाटात वाहतूक ठप्प !

तभा वृत्तसेवा

अजिंठा दि, २९ ऑगस्ट - अजिंठा घाटात अपघाताचे सत्र सुरू असून शुक्रवारी घाटामध्ये पुढील वाहनाला ओव्हरटेक करून घाट चढत असलेल्या ट्रकला साईट देण्यासाठी थांबलेल्या कारवर पाठीमागून येणारी ट्रॅव्हल्स बस धडकून झालेल्या विचित्र तिहेरी भीषण अपघातात कार मधील चार जण गंभीर जखमी झाल्याची घटना शुक्रवारी (ता. २९) सकाळी साडेसहाच्या सुमारास अजिंठा घाटातील पहील्या वळणा जवळ घडली . या अपघातात कार चक्काचुर झाली आहे . जखमीना सिल्लोड रुग्णालयात उपचार करून छत्रपती संभाजी नगर घाटी रुग्णालय पाठवण्यात आले .या अपघातामुळे महामार्गावर सुमारे एक तास वाहतूक ठप्प झाली होती .



मिळालेल्या माहितीनुसार हा अपघात अजिंठा घाटातील पहिल्या वळणा उतरत असलेली ट्रव्हल्स बस (क्र. एमएच ०९ सी - व्ही ६३९७ )तसेच कार (क्र. एमएच १९ एक्स - ५६६६ ) व घाट चढत असलेली ट्रक (क्र. टीएन ३४ ए झेड १२८५ या तिन वाहना मध्ये विचित्र अपघात घडल्या नंतर फौजदार रामेश्वर इंगळे, पोलिस कर्मचारी बबन जाधव, राम आडे, दिलीप तडवी, विकास दुबेले, . दगडू तडवी तसेच ग्रामस्थांनी मदतकार्य करून कार मधील जखमींना बाहेर काढून उपचारासाठी रवाना केले . शारदा भूषण पाटील (वय ३५ ),शोभाबाई नवलसिंग कोळी ( वय ६५ ),रत्नाकर श्रीराम पारे (वय ४२ ), भूषण रवींद्र पाटील (वय ३५ ) रा. उदडी ता. रावेर जि. जळगाव हे या अपघातात जखमीचे नावे आहेत . सिल्लोड ग्रामीण रुग्णालयात उपचार करून पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजी नगर येथील रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. या अपघातामुळे महामार्गावर सुमारे एक तास वाहतूक ठप्प झाली होती . पोलिसांनी मदत कार्य करून वाहतूक सुरळीत केली .

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### गोदावरी नदीचे पात्र दुथडी भरुन वाहु लागले

#### जायकवाडीच्या जलाशयातून पाण्याचा विसर्ग : नदीकाठच्या गावांना इशारा

**परभणी,/प्रतिनिधी :** जायकवाडी प्रकल्पातील पाणी पातळीत मोठ्या प्रमाणावर वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर पाटबंधारे खात्याने जायकवाडीचे १८ दरवाजे उघडून गोदावरी नदी पात्रात ९ हजार ४३२ क्यूसेक पाण्याचा विसर्ग सुरु केला असून त्यामुळे परभणी जिल्ह्यातील गोदावरी नदीचे पात्र दुथडी भरुन वाहू लागले आहे.

जायकवाडी जलाशयातून गुरुवारी दुपारी १८ दरवाजे ०.५ फूट उचलून ९ हजार ४३२ क्युसेक पाण्याचा विसर्ग गोदावरी नदीच्या पात्रात सुरु करण्यात आला. या जलाशयात ९१.४७ टक्के एवढा पाणीसाठा उपलब्ध आहे. या जलाशयात पाणलोट क्षेत्रातून मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवक होत आहे. त्यामुळे पाण्याची सतत होणारी आवक ओळखून पाटबंधारे खात्याने गोदावरीच्या पात्रात पाण्याचा विसर्गाचा निर्णय घेतला.

दरम्यान, येत्या काही तासात पाणी विसर्गाचे प्रमाण वाढविले जाण्याची शक्यता असून त्यामुळे गोदावरी नदीस पूर येईल, अशी चिन्हे आहेत. या पार्श्वभूमीवर नदीकाठच्या गावांना सतर्क राहण्याचे निर्देश पाटबंधारे खात्याने जिल्हा प्रशासनामार्फत दिले आहेत.

### श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या जयंती महोत्सवानिमित्त रविवारी भरगच्च कार्यक्रम :

#### गुणवंतांचा, खेळाडूंचा गौरव : जिल्हास्तरीय स्केटींग स्पर्धा

**परभणी,/प्रतिनिधी :** दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी सोनार समाजाचे आराध्यदैवत श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या जयंती निमित्ताने रविवार ३ ऑगस्ट रोजी महाअभिषेक, महापूजा या धार्मिक कार्यक्रमांसह अन्य भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत, अशी माहिती सोनार सेवा महासंघाचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत डहाळे यांनी दिली.

श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या मुर्तीवर रविवारी सकाळी ८ वाजता महाअभिषेक व महापूजेचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तर सकाळी ११ वाजता जिल्ह्याच्या पालकमंत्री सौ. मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली गुणवंत विद्यार्थी व खेळाडूंचा सत्कार सोहळा होणार आहे. या सोहळ्यास आमदार डॉ. राहुल पाटील, भाजपाच्या उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रमोद वाकोडकर, जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे, जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत. श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या नांदखेडा रस्त्यावरील मंदिराच्या सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे.

या व्यतिरिक्त जिल्हास्तरीय स्केटींग स्पर्धासुध्दा आयोजित करण्यात आल्या आहेत, अशी माहिती आयोजक चंद्रकांत डहाळे कार्याध्यक्ष रमेशराव शहाणे, जिल्हाध्यक्ष सुशील गवते, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सौ. अंबीका डहाळे, दीपक बोकन, एकनाथ घोडके, गुरुप्रसाद टाक, दीपक टाक, नाना मैड, सूर्यकांत डहाळे, अनिल डहाळे, विलास कटके, अनिल पोतदार, रामू सेट शहाणे, एम.एम. टाक, विलास शहाणे, मनोज डहाळे आदींनी दिली.

### लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमित्त १०५ फकीरा कादंबरीचे वितरण :

#### भाजपाच्या महानगर शाखेतर्फे उपक्रम

**परभणी,/प्रतिनिधी :** लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमित्त भारतीय जनता पार्टीच्य महानगर जिल्हा शाखेतर्फे नागरीकांना अण्णा भाऊ यांच्या फकीरा या कादंबरीच्या १०५ प्रती वितरित करण्यात आल्या.

शहरातील साठे यांच्या स्मारकासमोर पक्षाच्या वतीने शुक्रवारी (दि.०१) अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे यांनी साठे यांच्या प्रसिध्द फकीरा या कादंबरीच्या १०५ प्रती नागरीकांना वितरित केल्या. त्याद्वारे समाज प्रबोधन आणि साहित्य जागरातील साठे यांचे महत्वपूर्ण योगदान अधोरेखित करण्यात आले. यावेळी भालचंद्र गोरे, विजय दराडे, मधुसूदन जोशी, सुरज चोपडे आदी उपस्थित होते.

### स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीच्या दृष्टीने मोर्चेबांधणी सुरु

#### माजीमंत्री सुरेश वरपुडकर यांची माहिती : जिल्ह्यात समन्वयातून पक्ष कार्य

**परभणी,/प्रतिनिधी :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या दृष्टीने मोर्चेबांधणीस प्रारंभ करण्यात आला आहे, अशी माहिती ज्येष्ठ नेते माजी मंत्री सुरेश वरपुडकर यांनी दिली.

भारतीय जनता पार्टीत प्रवेश केल्यानंतर वरपुडकर हे शुक्रवारी सकाळी परभणीत दाखल झाले. त्या पाठोपाठ भारतीय जनता पार्टीच्या स्थानिक पातळीवरील ज्येष्ठ नेते, ज्येष्ठ कार्यकर्ते यांच्या वरपुडकर यांनी सदिच्छा भेटी सुरु केल्या. माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलतांना वरपुडकर यांनी आपण शहरासह जिल्ह्यातील सामान्य कार्यकर्त्यांबरोबर संपर्क करुन हितगुज करणार आहोत. विशेषतः आगामी निवडणूकीच्या दृष्टीनेही व्युहरचना आखणार आहोत. पक्षाद्वारे दिलेल्या आदेशाप्रमाणे काम करणार असून ज्या ज्या ठिकाणी पक्षाची ताकद आहे. त्या ठिकाणी स्वबळावर किंवा ज्या ठिकाणी महायुतीतील मित्र पक्षाची ताकद आहे.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.
**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५. ९२८४६६४४३०. ९२८४६९५५८३

# परभणीच्या बसस्थानकांत ऑटोरिक्षा आणि खाजगी वाहनांचा मोठा धुमाकूळ

## नागरिक हैराण- बसेसह प्रवाशांचे ये-जा करणे आता झाले अधिक मुश्कीलच

**मोहन धारासूरकर**
**परभणी /प्रतिनिधी-**

परभणी सारख्या जिल्हा मुख्यालय स्थानच्या बसस्थानकावर शेकडो ऑटोरिक्षा आणि दुचाकी, चारचाकी वाहनांचा मोठा धूमाकुळ सुरु आहे. त्यामुळे बसचालक अक्षरशः हैराण आहेत. तर बसेससह प्रवाशांना ये-जा करणे मुश्किल बनले आहे.

जिल्हा मुख्यालय स्थानचे नवीन बसस्थानक उशीरा का होईना कार्यान्वित झाले आहे. भव्य दिव्य आणि सुंदर अशा बसस्थानकाच्या या इमारतीने निश्चितच शहराच्या सौंदर्यात भर घातली आहे. दुर्देवाने या नवीन बसस्थानकावर सुध्दा मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार सुरु झाले आहेत. विशेषतः स्वच्छतेच्या नावाने मोठी बोंबाबोंब आहे. ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग, धूळीचे आणि दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. त्यातच आता ऑटोरिक्षांसह खाजगी दुचाकी व चारचाकी वाहनांचा थेट बसस्थानकातील वावरही डोकेदुखी ठरला आहे. पहाटेपासून



रात्री उशीरापर्यंत शेकडो ऑटोरिक्षा प्रवाशांना आकर्षित करण्याकरीता बसस्थानका अंतर्गत प्लॅटफॉर्मवरच उभ्या राहु लागल्या असून हे ऑटोरिक्षा चालक बसमधून उतरलेल्या प्रवाशांना स्वतःकडे खेचण्याकरीता अक्षरशः स्पर्धा करु लागले आहेत. त्यामुळे प्रवाशीही अक्षरशः गांगरले आहेत. ऑटोरिक्षांच्या या सुळसुळाटामुळे परिवहन महामंडळाच्या बसेसला या परिसरातून ये जा करणंसुध्दा जिकिरीचे बनले असून त्यामुळे दररोज वाद-विवाद, हमरी-तुमरी व भांडण-तंटेसुध्दा नित्याचेच झाले आहे.

वास्तविकतः या ऑटोरिक्षांकरीता बसस्थानकाच्या समोर पार्कींग झोन सुरु करुन देण्यात आले आहे. परंतु, या ऑटो झोनवर ऑटोरिक्षा उभे राहिनासे झाले आहेत. त्याऐवजी थेट प्रवाशांना खेचण्याकरीता बसस्थानकातच त्या धडकू लागल्या आहेत. या व्यतिरिक्त दुचाकी, तीनचाकी खाजगी वाहनांनीही बसस्थानकात धुमाकूळ सुरु केला आहे. त्यामुळे बसेससह प्रवाशांनासुध्दा ये जा करणे मुश्किल बनले आहे.

शहर वाहतूक पोलिस यंत्रणेच्या कर्मचाऱ्यांद्वारे या बसस्थानकाच्या परिसरात कोणत्याही उपाययोजना केल्या जात नाहीत. त्यामुळे बसस्थानकाच्या बाहेरसुध्दा ऑटोरिक्षा बेशिस्त पध्दतीने उभ्या राहु लागल्या आहेत. त्यामुळे अन्य प्रश्नही निर्माण झाले आहेत. शहर वाहतूक पोलिस यंत्रणेने किंवा राज्य परिवहन महामंडळाने या बेशिस्त वाहनांसह ऑटोरिक्षांच्या धुमाकुळा विरोधात कठोर भूमिका घ्यावी, असा सूर जाणकार नागरीकांमधून उमटत आहे.

### भारतीय जनता पार्टीची महानगर जिल्हा कार्यकारणी जाहीर

#### जम्बो कार्यकारणी : ५६ कार्यकर्त्यांना जबाबदाऱ्या

**परभणी,/प्रतिनिधी :** भारतीय जनता पार्टीची महानगर जिल्हा कार्यकारणी घोषित करण्यात आली असून या जम्बो कार्यकारणीत ५६ कार्यकर्त्यांना विविध पदांसह आघाड्यांच्या जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत.

महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे यांनी प्रस्तावित जिल्हा कार्यकारणी प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांना सादर केली. त्या पाठोपाठ प्रदेश पातळीवरुन कार्यकारणीस अधिकृत मान्यता मिळाल्यानंतर घोषणाही केली. ती कार्यकारणी पुढील प्रमाणे...महानगरअध्यक्ष शिवाजी भरोसे, उपाध्यक्ष मोकिंद खिल्लारे, ओंकार देशमुख, रितेश जैन, शेख निहाल, रुपाली ठाकरे, सुप्रिया मांडे, अक्षय डहाळे, उमेश शेळके, सरचिटणीसपदी ॲड. एन.डी. देशमुख, भालचंद्र गोरे, शंकर आजेगावकर, मंगल मुदगलकर, चिटणीसपदी विजय गायकवाड, अजिंक्य औंढेकर, आनंद वर्मा, मुकेश गाढे, बालिका सुरनर, सुकेशिनी चौधरी, उषा चव्हाण, डॉ. नम्रता पाटील, कोषाध्यक्षपदी ज्ञानेश्वर बोबडे, प्रसिध्दी प्रमुख गणेश रणेर, कार्यालयीन प्रमुख ओंकार दुधाटे, सोशल मिडीया प्रमुख माऊली कोपरे, महिला मोर्चा प्रमुख मनिषा जाधव, युवा मोर्चा प्रमुख अजिंक्य गौंढेस्वार, ओबीसी मोर्चा प्रमुख गणेश टाक, अल्पसंख्यांक मोर्चा प्रमुख हम्मु चाऊस, एसस्सी मोर्चा प्रमुख सुमीत भालेराव, एसटी मोर्चा प्रमुख ओम मुदीराज, किसान मोर्चा प्रमुख अच्युत रसाळ, अल्पसंख्यांक महिला मोर्चा प्रमुख छाया मोगले, ओबीसी महिला मोर्चा प्रमुख सुनीता घुगे, कायदा प्रकोष्ट प्रमुख ॲड. सुरेश शिंदे, प्रज्ञा प्रकोष्ट प्रमुख शिवाजी लोखंडे, वैद्यकीय प्रकोष्ट प्रमुख डॉ. मनोज पोरवाल, शिक्षण संस्थाचालक प्रकोष्ट प्रमुख लक्ष्मीकांत क्षीरसागर, शिक्षक प्रकोष्ट प्रमुख श्रीधर कोके, भटके विमुक्त प्रकोष्ट प्रमुख किसनसिंग टाक, अपंग विकास प्रकोष्ट प्रमुख रावसाहेब धरणे, ज्येष्ठ कार्यकर्ता प्रकोष्ट धनंजय बल्लाळ, झोपडपट्टी सेल प्रमुख महेंद्र धबाले, कामगार सेल प्रमुख एकनाथ चव्हाण, व्यापारी आघाडी प्रमुख सचिन अंबिलवादे, सहकार आघाडी प्रमुख नामदेवराव चव्हाण, उत्तर भारतीय आघाडी प्रमुख ऋषिसिंह ठाकूर, सांस्कृतिक आघाडी प्रमुख सोहम खिल्लारे, उद्योग आघाडी प्रमुख शंतनु सुभेदार, अध्यात्मिक आघाडी प्रमुख संजय ओझरकर, जैन प्रकोष्ट श्रीकांत आंभोरे, बेटी बचाओ बेटी पढाओ सेल प्रमुख नसरीन पठाण, माजी सैनिक आघाडी प्रमुख गंगाशंकर फुटाणे, पंचायतराज सेल प्रमुख भानुदास जवंजाळ, ट्रान्सपोर्ट सेल प्रमुख बंटी नवल, पदवीधर प्रकोष्ट मुकुंद वसंतराव चौधरी आदींच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.



**परभणी- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करताना परभणी शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी प्रा. रामेश्वर आवरगंड, शंकर भागवत, मा. नगर सेवक चांदुराम बोराडे, बबन मकासरे, सुरेंद्र रोडगे, विनोद कणकूटे, मनोहर गवारे, रामदास कदम, शेख इकबाल दावत, माही दांडगे आदी दिसत आहेत. छाया- शैलेश डहाळे, परभणी**

### सायकलस्वाराच्या मृत्यूनंतरही अतिक्रमणकर्ते वाहनांचा सुळसूळाट

**परभणी,/प्रतिनिधी-** येथील गंगाखेड नाक्यावर बुधवारी सायंकाळी पिकअप वाहनाने दिलेल्या धडकेत एका सायकलस्वाराचा मृत्यू झाल्यानंतरसुध्दा महापालिका व पोलिस प्रशासनाने या नाक्यावरील वाहतूकीच्या अभूतपूर्व कोंडीस कारणीभूत ठरणाऱ्या हातगाडेवाले, अतिक्रमणकर्ते व बेशिस्त वाहनांना हटविण्याचे सोयरसुतक दाखविले नाही.

गंगाखेड नाक्यावर बेसुमार अतिक्रमणे झाली आहेत. विशेषतः आसपासच्या विक्रेत्यांनी आपआपली दुकाने भर रस्त्यापर्यंत भिडविली आहेत. तर फळ व भाजी विक्रेत्या हातगाडेवाल्यांनी भर रस्त्यावर ठाण मांडले आहे. रस्त्याच्या दुतर्फाही विक्रेते रस्त्यावर बसून व्यवहार करीत आहेत. त्यातच रस्त्यावर वाहने उभी राहत असून त्यामुळे या भागात वाहतूकीची अभूतपूर्व कोंडी नित्याचीच झाली आहे. या पार्श्वभूमीवर सोपान मोरे नामक ५९ वर्षीय सायकलस्वाराचा पिकअप वाहनाने दिलेल्या धडकेत जागीच मृत्यू झाला. केवळ वाहतूकीच्या कोंडीमुळे या सायकलस्वाराचा मृत्यू होवूनसुध्दा महानगरपालिका व प्रशासनाने त्या भागातील या अतिक्रमणकर्त्यांना दुसऱ्या दिवशी हटविण्याचेही भान दाखविले नाही.

### खून प्रकरणातील फरार आरोपीचा मृतदेह आढळला;

**परभणी,/प्रतिनिधी :** मानवत येथील कोक्कर कॉलनीतील रहिवाशी ज्ञानेश्वर पवार यांच्या निर्घृण खून प्रकरणातील आरोपी मारोती चव्हाण यांचा शुक्रवारी (०१) दुपारी मानवत शिवारातील अंबेगाव नाका परिसरातील एका शेतातील विहिरीत मृतदेह आढळून आला.

सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप बोरकर, पोलिस उपनिरीक्षक प्रबोध देवकते यांच्यासह अन्य पोलिस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली असून त्या मृतदेहाची ओळख पटवून तो मृतदेह शवविच्छेदनाकरीता ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आला आहे.

### लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्याजयंती निमित्त अभिवादन

**परभणी,/प्रतिनिधी-** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त परभणी जिल्हा काँग्रेस कमिटीच्या आयोजित 'छत्रपती फुले शाहू आंबेडकर महोत्सव समिती' मार्फत अभिवादन करण्यात आले. काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



यावेळी सुहास पंडित, दिगंबर खरवडे, शजी अहमद खान यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले. याप्रसंगी सुहास पंडित यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांवर भाष्य करताना सांगितले की, ''अण्णाभाऊ साठे हे दलित, श्रमिक आणि वंचित घटकांसाठी प्रेरणास्थान होते. त्यांच्या लेखणीने सामाजिक अन्यायाविरुद्ध जनजागृती केली. आजच्या काळात त्यांचे विचार अधिकच महत्त्वाचे झाले आहेत.''

कार्यक्रमाचे आयोजन साधेपणाने आणि उत्साहात पार पडले. छत्रपती शिवाजी महाराज,शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा निर्धार या कार्यक्रमात घेण्यात आला.

## परभणीत स्थानिक निधी लेखा परिक्षा दिन उत्साहात साजरा

**परभणी,/प्रतिनिधी:** सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयात शासन निर्णयानुसार ''स्थानिक निधी लेखापरीक्षा दिन'' आज उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परभणी शहर महानगरपालिकाचे मुख्य लेखापरीक्षक श्रीरंग भुतडा तर प्रमुख पाहुणे म्हणुन मुख्य लेखा अधिकारी डॉ.प्रभाकर काळदाते, जिल्हा परिषद मुख्य लेखा व वित्त अधिकारी डॉ.प्रकाश दासे, जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. दत्ता भांगे, सेवानिवृत्त सहायक संचालक साईजलंदर मुराडी हे होते. प्रास्ताविकात सहायक संचालक किरण




मदन कोल्हे यांनी स्थानिक निधी लेखा परीक्षा दिन साजरा करण्यामागची भूमिका विषद केली, तसेच स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयाचे प्रशासकीय इमारत परिसरातील नवीन इमारतीत स्थलांतर होऊन नवीन जागेमध्ये कार्यालयाचे कामकाज सुरु झाल्याबाबत सर्वांना अवगत केले. श्रीरंग भुतडा यांनी लेखापरीक्षण करताना कोणत्या बाबींकडे लक्ष द्यावे, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये वित्तीय अनियमितता होऊ नये म्हणुन लेखापरीक्षकाने दक्ष राहावे, असे प्रतिपादन केले. प्रमुख पाहुणे डॉ. प्रकाश दासे, डॉ. दत्ता भांगे व साईजलंदर मुराडी यांनीही मनोगत व्यक्त केले व सेवाकाळातील आपले अनुभव कथन केले. कार्यक्रमाला स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालय, जिल्हा कोषागार कार्यालय व जिल्हा परिषद कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी, तसेच परभणी जिल्ह्यातील महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सर्व राजपत्रित अधिकारी उपस्थित होते. या प्रसंगी मान्यवरांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

सूत्रसंचलन श्रीकांत पांचाळ यांनी तर आभार प्रदर्शन किशोर पाईकराव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहायक लेखापरीक्षा अधिकारी दिलीप बेराड, जयसिंग सानप, दिपक भुसवर, वरिष्ठ लेखापरीक्षक राम चव्हाण, विकास माळी, कनिष्ठ लेखापरीक्षक संदिप कपाळे, सचिन ढेंबरे, संजय मुराडी, शिपाई शिवाजी जाधव, विनायक अवचार, सचिन अवचार यांनी विशेष परीश्रम घेतले.

## बिडकीनच्या तंटामुक्ती अध्यक्षपदी बबन ठाणगे यांची निवड



बिडकीन दि २९ ऑगस्ट - पैठण तालुक्यातील बिडकीन ग्रामपंचायत कार्यालयामध्ये दिनांक २९ रोजी सकाळी अकरा वाजता ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते सभेचे अध्यक्ष सरपंच अशोक धर्मे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत कार्यालय येथे ग्रामसभा घेण्यात आली. या ग्रामसभेमध्ये मागील सभेचा वृतांत वाचून मान्यता देणे बाबत, भूमी अभिलेख कार्यालयाकडून गावातील हद्द वाढ होणे बाबत, विविध योजनेअंतर्गत घरकुल पूर्ण करणेबाबत, बेटी बचाव बेटी पढाव, बालविवाह निर्मूलन कार्यक्रम राबविणे, प्रधानमंत्री आवास योजनेबाबत रजिस्ट्रेशन करणे, महात्मा गांधी तंटामुक्ती अभियानाअंतर्गत समितीची निवड करणे बाबत अशा विषयावर ग्रामसभेमध्ये चर्चा करून ठराव मंजूर करण्यात आले या ग्रामसभेमध्ये बिडकीन येथील तंटामुक्ती अध्यक्ष पद हे काही वर्षांपासून रिक्त असल्याने या पदा साठी आज दि २९ रोजी अध्यक्ष पदाची ग्रामपंचायत कार्यालय मधे मतदान घेऊन तंटामुक्ती अध्यक्ष पदी बबन नाना ठाणगे यांची बहुमताने निवड करण्यात आली. यावेळी सरपंच तथा ग्रामसभा अध्यक्ष अशोक धर्मे, ग्रामविकास अधिकारी व ग्रामपंचायत सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली शांततेत पार पडली.यावेळी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात रेड रिबन क्लबचे उदघाटन



सोयगाव,दि.२९ ऑगस्ट - अजिंठा शिक्षण संस्था संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या अंतर्गत रेड रिबन क्लब ची स्थापना करण्यात आली.रेड रिबन क्लबचे उदघाटन ग्रामीण रुग्णालय सोयगाव येथील समुपदेशक सुनील वानखेडे यांच्या हस्ते करण्यात आले.त्यांनी विद्यार्थ्यांना एचआयव्ही बद्दल माहिती सांगितली.तसेच विद्यार्थ्यांचे एचआयव्ही बद्दलचे गैरसमज दूर केले. तसेच विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त एड्स बाबदची व तंबाखू मुक्तीची शपथ देण्यात आली.त्यांच्या समवेत समुपदेशक अतुल मुळे यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार,उपप्राचार्य डॉ.आर.के.बारोटे,कनिष्ठ विभाग प्रमुख डॉ. उल्हास पाटील,डॉ.सुभाष पाटील,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.पंकज गावीत,महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. निलेश गावडे यांनी केले तर डॉ.सुनील चौधरे यांनी या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, कार्यक्रमाधिकारी डॉ.निलेश गावडे,डॉ.पंकज गावित,डॉ. सुनील चौधरे व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## जेबीएलने सणासुदीचा उत्साह वाढवला

पुणे - भारतात बहुप्रतिक्षित सणासुदीचा हंगाम सुरू होत असताना, जेबीएल इंडियाने आपली ३६०-डिग्री मार्केटिंग मोहीम - साउंड ऑफ सेलिब्रेशन्स सादर केली आहे. या मोहिमेत प्रादेशिक संगीताचा आनंद साजरा करणारे एक खास गाणे आणि दमदार नवीन उत्पादनांची श्रेणी सादर केली आहे, ज्यात जेबीएल पार्टीबॉक्स एन्कोर २, पार्टीबॉक्स एन्कोर इसेन्शियल २, पार्टीबॉक्स ५२०, चार्ज ६, फ्लिप ७, आणि जेबीएल बार १३०० यांचा समावेश आहे. ही उत्पादने रिटेल, डिजिटल आणि सांस्कृतिक स्तरांवर आवाज, भावना आणि नवनिर्मिती यांचे मिश्रण घडवून आणतात.

## महिलांसाठी सर्वात मोठा ऑनलाइन पदवीदान समारंभ

मुंबई : महिलांना नवीन कौशल्ये शिकवून त्यांना स्वावलंबी बनवणाऱ्या हुनर ऑनलाइन कोर्सेस या स्किल-टेक प्लॅटफॉर्मने भारतातील आतापर्यंतचा सर्वात मोठा वर्चुअल पदवीदान समारंभ आयोजित केला. या ऐतिहासिक सोहळ्यात देशभरातील २८ राज्यांमधून १०,००० पेक्षा जास्त हुनर विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. भारतीय गृहिणी, युवती व कामकाजी महिलांच्या कौशल्याचा गौरव करण्याचा हा एक विशेष उपक्रम ठरला. या ऑनलाइन सोहळ्याचे देशभरातून १९,०००+ प्रेक्षकांनी दर्शन घेतले. ६,०००+ कमेंट्स आणि १४,०००+ रिॲक्शन्सद्वारे प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला. अनेक महिलांनी या कार्यक्रमातून प्रेरणा घेऊन हुनरसह आपला शिक्षण प्रवास सुरू करण्याचा संकल्प केला.

## 'उफ्फ ये लव है मुश्किल ...' मालिकेत रिद्धिमा पंडितची ग्लॅमरस एंट्री

सोनी सबवरील 'उफ्फ ये लव है मुश्किल ...' मध्ये नवीन दमदार एंट्रीमुळे कथेतील रोमांच वाढला असून युग (शब्बीर अहलूवालिया) आणि कैरी (आशी सिंह) यांच्या विश्वातदेखील खळबळ माजली आहे. अभिनेत्री ऋद्धिमा पंडित लताच्या भूमिकेत मालिकेत दाखल होत आहे. ही अशी व्यक्तिरेखा आहे जिला एक भूतकाळ आहे आणि जिच्या मोहक अदांमध्ये आणि रहस्यमयतेत मित्र आणि शत्रू यांच्यातील रेष धूसर होते.

## नूव्या भूमिकेत संजय चौधरी यांचे पुनरागमन!

एड टीव्हीवरील मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मध्ये कमलेशच्या भूमिकेत प्रेक्षकांचे मन जिंकलेले संजय चौधरी नवीन अवतारामध्ये परतले आहेत, जेथे ते मालिकेमध्ये कमलेशचा जुळा भाऊ सोनूची भूमिका साकारणर आहेत. निष्काळजीपणे वागणाऱ्या भावाच्या तुलनेत सोनू प्रामाणिक, साधा व मितभाषी आहे, जो प्रकाशझोतात येण्यापासून दूर राहतो. धमाल ट्विस्टची भर करत सोनू गुपचूप धाडसी व नीडर मलायकावर (सोनल पनवार) प्रेम करत असतो. ती त्याच्याकडे दुर्लक्ष करत असली तरी त्याला तिच्या नीडर व्यक्तिमत्त्वामधून प्रेरणा मिळते. ही नवीन भूमिका साकारण्याबाबत आनंद व्यक्त करत संजय म्हणाले, मी मालिकेमध्ये परतल्यापासून चाहत्यांनी केलेला प्रेमाचा वर्षाव पाहून मी खूप आनंदित झालो आहे.-

## 'पुष्पा २' चा प्रीमिअरअनमोल सिनेमावर

सुकुमार दिग्दर्शित 'पुष्पा २' मध्ये अल्लू अर्जुन एक जबरदस्त भूमिकेत दिसतो, ज्याने देशभरातील प्रेक्षकांच्या मनाला थेट स्पर्श केला आहे. त्याचे दमदार डायलॉग्स जसे की पुष्पा नाव सुनकर फ्लॉवर समझे क्या? असो किंवा किस्सिक या गाण्यातील च्या अफलातून मूव्हस, या चित्रपटाने खऱ्या अर्थाने जनसामान्यांशी नाते जोडले आहे. त्याच्यासोबत रश्मिका मंदाना आणि फहाद फासिल यांच्या दमदार भूमिका, नाट्य, भावना आणि ताकदीने भरलेली परफॉर्मन्सेस या भव्य चित्रपटाला आणखी प्रभावी बनवतात. 'पुष्पा २' च्या भव्य प्रीमिअरमध्ये अनमोल सिनेमावर, रविवार ३१ ऑगस्ट, सायंकाळी ७ वाजता.इस बार रूल करेगा पुष्पा!

## महा मोदक अभियानाचे अनावरण

छत्रपती संभाजीनगर : स्टार युनियन दाई-इची लाइफ इन्शुरन्स (एसयूडी लाईफ) ने पुण्यात सुरू असलेल्या गणेशोत्सवानिमित्त आपले नवे अभियान एसयूडी लाईफ महा मोदक सुरू केले आहे. या उपक्रमाचा उद्देश राज्यातील सर्वात मोठ्या उत्सवासोबत सांस्कृतिक नाळ मजबूत करून कुटुंबांचे संरक्षण व जीवन समृद्ध करण्याच्या ब्रँडच्या मूलभूत मूल्यांना अधोरेखित करणे तसेच प्रादेशिक स्तरावरील बांधिलकी अधिक दृढ करणे हा आहे. ३० ऑगस्ट २०२५ ते ५ सप्टेंबर २०२५ या कालावधीत, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक राजधानीत महा मोदकच्या माध्यमातून समाजाशी अर्थपूर्ण संवाद साधला जाणार आहे. या उपक्रमाद्वारे एसयूडी लाईफच्या उपाययोजनांबद्दल जनजागृती केली जाईल, इच्छुक सल्लागारांसाठी करिअरच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातील तसेच पर्यावरणीय जबाबदारीचे महत्त्वही अधोरेखित केले जाईल.

### पंचायत समिती सिल्लोड व अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड छत्रपती संभाजीनगर डेपो यांच्या संयुक्त विद्यमाने

## मेरा गांव मेरी पहचान या विषयावर सर्व सरपंच यांची एक दिवसीय कार्यशाळा संपन्न



सिल्लोड : दिनांक २५ ऑगस्ट २०२५ सोमवार रोजी पंचायत समिती सिल्लोड व अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड छत्रपती संभाजीनगर डेपो यांच्या संयुक्त विद्यमाने सिल्लोड तालुक्यातील सर्व सरपंच यांची एक दिवसीय कार्यशाळा यांची मेरा गाव-मेरी पहचान या विषयावर घेण्यात आली. सदर कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विश्वास दाभाडे हे होते तर गटविकास अधिकारी पंचायत समिती सिल्लोड रत्नकार पगार यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यशाळा घेण्यात आली .

यावेळी गटविकास अधिकारी रत्नाकर पगार यांनी उपस्थित सर्व सरपंच यांना मार्गदर्शन केले गावाचा सर्वांगीन विकास करायचा असेल तर गावे ही जलसमृद्ध झाली पाहीजे या साठी मनरेगा च्या माध्यमातून शेत फिल्ड बंधाऱ्याचे जास्तीत जास्त कामे हाती घेऊन प्रस्ताव भरून घ्यावे व गावे जलसमृद्ध करावी यासाठी महिला सरपंच यांनी पुढाकर घ्यावा असे आवाहन केले.

यावेळी प्रातिनिधिक स्वरुपात सरपंच व महिला सरपंच यांचा सत्कार करण्यात आला.अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड चे हरीश देशपांडे यांनी शासकीय इमारतीच्या छतावरील पडणाऱ्या पावसाचे पुनर्भरण करणे बाबत मार्गदर्शन केले व कंपनीच्या प्रोडक्ट चे प्रदर्शन व प्रात्यशीक करुन दाखविले.

यावेळी दामु अण्णा गव्हाणे ,अल्ट्राटेक टेरी टेरी सेल्स हेड हरीश देशपांडे,अजय काळे,विजय चव्हाण, शरयु सोळंके,उपअभियंता बांधकाम अशोक शाखावार,विस्तार अधिकारी पंचायत साहेबराव शेळके,अण्णासाहेब गाडेकर,स्वच्छ भारत मिशन ग्रामीण गट समन्वयक केशवकांत बुलबुले तसेच सर्व विभाग प्रमुख, अधिकारी,कर्मचारी व तालुक्यातील सरपंच मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सिल्लोड येथे महिलांनी उत्पादन केलेल्या श्री गणेश मूर्ती विक्री केंद्राचे उद्घाटन



उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान अंतर्गत सिल्लोड तालुक्यातील स्वयंसहायता महिला समूह यांनी तयार केलेल्या गणेश मूर्ती विक्री केंद्राचे दिनांक २५/०८/२०२५ सोमवार रोजी सिल्लोड पंचायत समिती परिसर येथे गटविकास अधिकारी वर्ग- १ पंचायत समिती सिल्लोडरत्नाकर पगार , कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती विश्वासराव दाभाडे यांच्या शुभहस्ते उत्साहात उद्घाटन करण्यात आले.

तालुक्यातील कानिफनाथ महिला शिंदेफळ,जय भवानी महिला स्वयंसहायता समूह वांगी या समूहाचे तालुका स्तरावरील विक्री केंद्र सुरू करण्यात आले, तसेच सिल्लोड तालुक्यात एकूण १२ गणेश मूर्ती विक्री केंद्रयाची आजपासून सुरुवात करण्यात आली.

तालुक्यातील बाजारपेठ असलेल्या मोठ्या गावामध्ये इतर ठिकाणी पण बचत गटाचे स्टॉल आहेत त्या ठिकाणी पण खरेदी करावी. गरिबातील गरीब महिलांचे उत्पादन केलेल्या मूर्तींची खरेदी करून त्याचा उत्साह वाढवावा. असे आवाहन गटविकास अधिकारी वर्ग-१ पंचायत समिती सिल्लोड रत्नाकर पगार यांनी केले.

गटविकास अधिकारी रत्नाकर पगार यांनी सर्व कर्मचारी महिला बचत गटामार्फत असलेल्या स्टॉल मधूनच खरेदी करावी..सर्व कर्मचारी यांनी आप आपल्या विभागामध्ये प्रचार प्रसिद्धी करावी.आणि खरेदी करून आपली स्वतःची सेल्फी पं. स.ग्रुप वर सेंड करावी .

तालुक्यामध्ये एकूण ४८ समूहांनी ४४१३८ एवढ्या गणेश मूर्ती तयार केलेल्या आहेत तरी महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी व समुहातील महिला लखपती दिदी व्हावी या उद्देशाने सर्व सिल्लोड तालुका वासियांनी महिला स्वयंसहायता समूहांनी तयार केलेल्या मूर्ती खरेदी करावे व तसेच सर्व शासकीय अधिकारी कर्मचारी यांनी सुद्धा समूहांकडूनच बाप्पाची मूर्ती खरेदी करावी,असे नम्र आवाहन तालुका अभियान व्यवस्थापक श्री संदीप कापसे यांनी केले.यावेळी उमेद तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष,छठङच् सिल्लोड सर्व टीम तसेच पंचायत समिती अंतर्गत सर्व अधिकारी कर्मचारी आणि तालुक्यातील महिला उद्घाटन सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आ. विलास बाप्पू भुमरे यांच्या हस्ते विविध कामांचे भूमिपूजन तथा लोकार्पण




तभा वृत्तसेवा

पैठण दि २९ :- खासदार संदीपान भुमरे यांच्या मार्गर्शनाखाली पैठण शहरात आमदार विलास बाप्पु भुमरे यांच्या शुभहस्ते विविध विकास कामांचे भूमिपूजन तथा लोकार्पण करण्यात आले. यात प्रामुख्याने अन्नपूर्णा नगर येथील महादेव मंदिराचे लोकार्पण, नाथमंदिर कावसनकर स्टेडियम जवळील भव्य प्रवेशद्वार, महावीर चौकातील प्रवेश कमान, भाऊसाहेब नगर व अन्नपुर्णा नगर येथे मोकळ्या जागेवर संरक्षण भिंत, गार्डन सुशोभीकरण कामांचा समावेश आहे. यावेळी बोलतांना आमदार विलास बाप्पु भुमरे म्हणाले की पैठण शहरात नवीन पाणीपुरवठा योजना, पथदिवे, नाथ मंदिर विकास, संत ज्ञानेश्वर उद्यानात अनेक विकास कामे केली जात असून यामुळे पर्यटन भूमी पैठण नगरीचा विकासात भर पडणार आहे.

या प्रसंगी मुख्याधिकारी डॉ. पल्लवी अंभोरे, राज्य दूध महासंघाचे संचालक नंदलाल काळे,शहरप्रमुख तुषार पाटील, सरपंच किशोर चौधरी,माजी नगराध्यक्ष राजू गायकवाड, माजी नगराध्यक्ष सोमनाथ परदेशी,पुष्पाताई गव्हाणे,ज्योती काकडे,नप बांधकाम अभियंता पंकज पवार,नगरसेवक अजित पगारे, बादशहा परळकर,ईश्वर दगडे, कृष्णा मापारी, बाळू माने,युवा उद्योजक किशोर तावरे, सरपंच आबा गिरगे,मनोज गायके, अमोल पाटील जाधव, भंडारी कन्ट्रक्शनचे संजय भंडारी, राजेश मानधने,संदीप मडके संजय कस्तुरे, सुनील हिंगे, संतोष बोथे, राजू मापारी,रमेश वीर, गजू ईच्छय्या,बाबा घटे,गणेश पंजावाले,बत्ती गिरे, देविदास शेळके, अक्षय सपकाळ, विकी खांडेकर सह मोठया संख्येने शिवसैनिक तथा नागरिक उपस्थित होते.

## स्व. इंदरचंद राठोड स्मृतिदिनानिमित्त यशस्वी माजी विद्यार्थ्यांचा सन्मान



तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.२९ ऑगस्ट - कै. गुरुदयालसिंग राठोड मागासवर्गीय शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. इंदरचंद राठोड यांच्या चौदाव्या पुण्यतिथीनिमित्त शाळेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

तळागाळातील ऊसतोड कामगारांच्या मुलांना शिक्षण प्रवाहात आणण्याचे स्वप्न पाहणाऱ्या राठोड यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. शाळेच्या ३१ वर्षांच्या प्रवासातील यशस्वी माजी विद्यार्थ्यांचा सन्मान यावेळी करण्यात आला.

शाळेची गौरवगाथा सांगणाऱ्या आठवणींची शब्दफुले या स्मरणिकेचे प्रकाशन तसेच मराठी भाषा साहित्य संवर्धन मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. या मंडळाच्या वतीने मराठी भाषा गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून संजना जाधव उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत योग्य वर्तन, शिक्षकांचा सन्मान आणि ग्रामीण भागातील शिक्षणाचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले. यावेळी अकरावीतील विद्यार्थिनी सृष्टी सुनिल राठोड हिची खडठज भेटीसाठी निवड झाल्याबद्दल तिचा विशेष सन्मान करण्यात आला.

संस्थेच्या अध्यक्षा हिराबाई राठोड यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला.सूत्रसंचालन अनिता चव्हाण यांनी केले यावेळी संस्थेचे पदाधिकारी, माजी विद्यार्थी, पालक, शिक्षक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्वातंत्र्य सेनानी स्व. बाबुरावजी काळे यांची जन्मशताब्दी साजरी

### अनाड शाळेतील विद्यार्थ्यांना केले शालेय साहित्याचे वाटप



तभा वृत्तसेवा :

अजिंठा दि, २९ ऑगस्ट-दि. २५- ०८-२०२५ , बाबुरावजी काळे महाविद्यालय अजिंठा यांच्या वतीने स्वातंत्र्य सेनानी बाबुरावजी काळे उर्फ आप्पासाहेब यांच्या जन्मशताब्दी वर्षा निमित्ताने

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील उपक्रमशील जि.प. शाळा अनाड येथे शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून आप्पासाहेब यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना वही,पेन,टॉय, बेल्ट,पाण्याची बॉटल आदी शालेय साहित्य वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून अजिंठा येथील स्थानिक इतिहास संशोधक विजय पगारे यांनी स्व. बाबुरावजी काळे यांच्या जीवन व कार्यावर प्रकाश टाकला. तर महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ.गणेश वाघ यांनी आप्पा साहेबांचे शैक्षणिक कार्याचे महत्त्व विशद केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अजिंठा केंद्राचे केंद्रप्रमुख अनिल परसे हे होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक भास्कर चौधरी यांनी केले.त्यांनी बाबूराव काळे यांच्या आठवणींनां उजाळा दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल गुप्ता यांनी केले.आभार प्रदर्शन अनाड़ शाळेचे मुख्याध्यापक शेख बशीर यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन योगेश निकुंभ, संतोष दौंड व लता खरात यांनी केले. याप्रसंगी उपसरपंच प्रवीण जाधव, शालेय समिती अध्यक्ष अशोक पवार, जेष्ठ नागरिक मंसाराम पाचिंगे, विनायक पाचिंगे,गजानन पाचिंगे,दिपक बिरारे महाविद्यालयाचे प्रा. डॉ. सुरडकर , प्रा.आगवाल प्रा. प्रकाश बावस्कर डॉ. काकासाहेब वराडे, डॉ. दत्तात्रय पिसे प्रा.पी.के.गावंडे प्रा.जुगलसिंग ठाकुर निवृत्ती बारोटे तसेच प्राध्यापक शुभम सिंग ठाकूर इत्यादी उपस्थित होते.

## फर्दापूर ग्रामपंचायत ने घेतला घेतला ठराव प्रत्येक चौकाला दिले महापुरुषांचे नाव

फर्दापूर दि २९- फर्दापूर ग्रामपंचायत मध्ये एकमताने ठराव मंजूर करण्यात आला आणि प्रत्येक चौकाला महापुरुषांचे नाव देण्यात येणार छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर प्रत्येक चौकाला महापुरुषांचे नाव देण्याचे आदर्श ग्रामपंचायत यांनी एकमताने ठराव मंजूर करण्यात आला यावेळी तोंडातून फाटा छत्रपती शिवाजी महाराज चौक, राजीव गांधी नगर रस्ता क्रांतीवीर बिरसा मुंडा चौक,ठाणा फाटा डॉ अब्दुल कलाम आझाद चौक, सोयगाव फाटा संत सेवा लाल महाराज चौक अशा प्रकारे थोर विचारवंत महापुरुषांचे नाव देण्याचा ठराव मंजूर करण्यात आला यावेळी फिरोज पठाण यांनी हा ठराव मांडला यास भिमराव बोराडे शेख जाकेर शेख हुसेन यांनी अनुमोदन दिले असून हा ठराव ग्रामसभेत सर्वानुमते मंजूर करण्यात आला आहे या चौकाच्या महापुरुषांची नावांच्या नामफलक यांचे लोकार्पण १७ सप्टेंबर २०२५ करण्यात येणार आहे .

## 'अभंग तुकाराम' चित्रपटात जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या भूमिकेत योगेश सोमण

छत्रपतीसंभाजीनगर - जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या अमृतरुपी अभंगाचे साक्षीदार होत श्री क्षेत्र देहू येथे संत तुकाराम महाराज यांचे सगुण साकार रूप प्रत्यक्ष अवतरलं. निमित्त होतं 'अभंग तुकाराम' चित्रपटातील कलाकारांच्या देहू भेटीचं. . डोक्यावर वारकरी पगडी, कपाळावर टिळा, गळ्यात माळा आणि हातात चिपळ्या असा वेष परिधान करून ज्येष्ठ अभिनेते योगेश सोमण यांनी संत तुकाराम महाराज यांच्या भूमिकेच्या रूपातील दर्शन यावेळी दिलं. 'अभंग तुकाराम' चित्रपटात प्रसिद्ध अभिनेते योगेश सोमण जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांची भूमिका साकारणार असून त्यांच्या पत्नीच्या आवलीच्या भूमिकेत अभिनेत्री स्मिता शेवाळे दिसणार आहे.

**तहसिल कार्यालय गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर**

मध्यवर्ती प्रशासकीय भवन, सर्व्हे नं. २८१/अ, गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

भुसुधार/कुळ/प्र.क्र.-१३/कावी ९८ दिनांक - २८/०८/२०२५

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. विनायक शंकर शेजवळ रा. आपेगाव ता. गगापूर यांनी या कार्यालयात विनंती अर्ज सादर करुन त्यांच्या मालकीच्या मौजे. आपेगाव मधील गट नं ४१ या जमीनीच्या ७/१२ अभिलेखाच्या इतर अधिकारातील नोंद / कुळ स.कु. किसन शेकू हे नांवे कमी करणे बाबत विनंती केलेली आहे.

तेव्हा सदरचे नांव कमी करण्यास कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार असल्यास सदर जाहीर पगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात या कार्यालयास अभिलेखासह सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप / उजर /तक्रार प्राप्त न झाल्यास सदरच्या व्यवहारास कोणाचाही आक्षेप/उजर/तक्रार नाही असे गृहीत धरुन सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप / उजर / तक्रार दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

तहसिलदार गंगापूर

**उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, छत्रपती संभाजीनगर**

जाक २०२५/संकीर्ण/जमृअ/सीआर-१७१/कावि- दिनांक १८/०८/२०२५

## -: जाहीर प्रगटन (शुध्दीपत्रक) :-

अर्जदारः- बंन्सी आश्रुबा नायवळ

विरुध्द

गैरअर्जदारः उपनिबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग, महानगर पालिका, छत्रपती संभाजीनगर

विषयः- जन्म मृत्यु अधिनियम १९६९ सुधारीत अधिनियम २००० चे कलम १३ (३) अन्वये अर्ज

संदर्भः- श्री/श्रीमती. वंन्सी आश्रुबा नायवळ, रा. गल्ली नं.बी २. संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर यांचा अर्ज दिनांक १७.०६.२०२५

विषयाकीत प्रकरणी अर्जदार यांनी ॲड. यांचेमार्फत या न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम १९६९ चे सुधारीत अधिनियम २००० चे कलम १३ (३) अन्वये अर्जदार यांचे मुलगा नामे कलावतीबाई आश्रुबा नायबळयांचा दिनांक १७.११.२०२१ रोजी राहते घरी-रा. गल्ली नं. बी-२, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर येथे मृत्यू झालेला असून मृत्यू नोंद मृत्यू नोंदवहीत घेण्यासाठी या न्यायालयाचे आदेश मिळण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे.

अर्जदार यांचे मुलंगा नामे कलावतीबाई आश्रुबा नायबळ यांची मृत्यू नोंद नसल्याबाबत उपनिबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग, महानगर पालिका, छत्रपती संभाजीनगर यांचा दाखला सादर केलेला आहे.

सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व गैरअर्जदार व जनतेस सुचित करण्यात येते की, अर्जदाराचे मुलगा नामे कलावतीबाई आश्रुबा नायबळ यांचा मृत्यू दिनांक १७.११.२०२१ रोजी राहते घरी-रा. गल्ली नं.बी-२, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर येथे झाला असून अर्जदार यांचे मुलगा यांचे मृत्यू प्रमाणपत्र जारी करण्यास जर कुणाचा काही उजर/आक्षेप/हरकत / तक्रार असेल तर त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर/आक्षेप/ हरकत/तक्रार मुळ कागदपत्रांसह उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय, आलमगीर कॉलनी, जिल्हाधिकारी कार्यालय परीसर, छत्रपती संभाजीनगर येथे नांव, संपूर्ण पत्ता व संपर्क क्रमांक स्पष्ट नमुद करुन लेखी स्वरुपात नोंदवावा. मुदतीनंतर आलेला उजर / आक्षेप / हरकत/तक्रार ग्राहय धरली जाणार नाही तसेच अर्जदारांचे मृत्यू प्रमाणपत्रासाठीचा आदेश नियमाप्रमाणे देण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

सदर जाहीर प्रगट्न माझ्या सही व शिक्क्यानिशी दिनांक / / २०२५ रोजी देण्यात आले.

दिनांक: १८/०८/२०२५ उप विभागीय अधिकारी,

ठिकाण :- छत्रपती संभाजीनगर. छत्रपती संभाजीनगर करीता

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायधिश क. स्तर न्यायालय गंगापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर**

दि.कि.अर्ज क्र. ५८०/२०२५

अर्जदार - १) मदनलाल पि. घनशाम जैस्वाल, वय ६० वर्षे, धंदा व्यवसाय, २) कांचनबाई भ्र, रामगोपाल जैस्वाल, वय ६० वर्षे, धंदा गृहीणी, ३) पवन पि. रामगोपाल जैस्वाल वय ४० वर्षे, धंदा व्यवसाय ४) सागर पि. रामगोपाल जैस्वाल, वय ३६ वर्षे, धंदा व्यवसाय, वरील सर्व रा. हरसुल, लासुर स्टेशन, ता. गंगापूर जि. छ. संभाजीनगर ५) सौ, सारीका संतोष जैस्वाल, वय ४२ वर्षे, धंदा गृहीणी, रा. जुना रिसोड नाका, वाशिमता, व जि. वाशिम ६) सौ. शिवकन्या श्रावण जैस्वाल वय-५८ वर्षे, धंदा-गृहीणी रा. अदिलाबाद ता. व. जि. अदिलाबाद राज्य- तेलंगणा (पुर्वीचे आंध्रप्रदेश) ७) सौ. कुष्णा भ्र. पुथ्वीपाल जैस्वाल वय ६८ वर्षे, धंदा गृहीणी रा. साईनगर, आमरावती ता. व जि. अमरावती विरुध्द

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण -वारस प्रमाणपत्र (सक्सेशन सर्टीफिकेट) मिळणेबाबत..

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी विधिज्ञ एम. बी. गुडदे यांचेमार्फत अर्ज सादर केला की, घनशामलाल बक्तावरलाल जैस्वाल हे दि. ०९/०२/२०२० रोजी मयत झालेले आहेत, तसेच मयत घनशाम बक्तावरलाल जैस्वाल यांची पत्नी नामे शारदा हया दि. १०/११/२०१६ रोजी मयत झालेल्या आहेत, तसेच मयत घनशामलाल बक्तावरलाल जैस्वाल यांची आई नामे सरस्वती हयासन १९६५ साली तर व वडील बक्तावरलाल हे सन १९७०साली मयत झालेले आहेत. त्यामूळे वरील अर्जदारांशिवाय मयत घनशामलाल बक्तावरलाल जैस्वाल यांना कोणीही वारस नाही, अर्जदार हेच एकमेव कायदेशीर वारस आहे. मयत घनशामलाल बक्तावरलाल जैस्वाल यांच्या पश्चात त्यांच्या नावे असलेल्या लाकडाची वखार (सॉमिल) अर्जदार नं. १ यांच्या नावे करणे कामी, तसेच शासकीय-निमशासकीय बाबींचा लाभ अर्जदारांचा मिळावा म्हणून तसेच भविष्यात काही अडचण येवू नये म्हणून अर्जदार नं. १ यास मयत घनशामलाल बक्तावरलाल जैस्वाल यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र हवे आहे. करीता अर्जदारांनी मयत घनशामलाल बक्तावरलाल जैस्वाल यांचे वारस असल्याबाबतचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र अर्जदार नं. १ च्या नावे देणेकामी विनंती हया न्यायालयास केली आहे.

त्याअर्थी वरील अर्जदार नं. १ च्या नावे मयत घनशामलाल बक्तावरलाल जैस्वाल यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र (सक्सेशन सर्टीफिकेट) देण्यास कोणाचीही हरकत/आक्षेप असेल तर त्यांनी सदर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत स्वतः किंवा त्यांच्या विधिज्ञामार्फत हजर होवून आपले आक्षेप/हरकत मांडावे नसता कुणाचीही हरकत/आक्षेप नाही असे समजून वरील अर्जदार हे मयत घनशामलाल बक्तावरलाल जैस्वाल यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारसाप्रमाणपत्र देण्यात येईल.

करीता आज दिनांक २९/०८/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी देण्यात येत आहे.

कनिष्ठ लिपिक सहाय्यक अधिक्षक,

दिवाणी न्यायालय गंगापूर

## अग्रलेख...

# मंदी, संधी आणि बुद्धी

बुद्धी आणि संधी यांचा योग्य वेळी योग्य वापर केला गेला नाही, तर या दोन्ही बाबी वाया जातात. त्यांना गंज चढतो आणि एकदा या दोन्ही बाबी हातातून निसटल्या, तर पुन्हा त्या केव्हा समोर येऊन उभ्या राहतील, हे कोणासच सांगता येत नाही.या दोन्ही बाबींची अचूक वेळ साधणे व त्यानुसार निर्णय घेणे गरजेचे असते. याचे अनेक दाखले भूतकाळाने समाजासमोर ठेवलेले आहेत. बुद्धी व संधीचा योग्य वेळी योग्य वापर करण्याचा शहाणपणा समाजास यावा यासाठी काही धडे देऊन ठेवलेले आहेत. ते धडे वारंवार गिरविण्याची प्रामाणिक इच्छा असेल, तर या दोन्ही बाबी हात जोडून समोर उभ्या राहतात. त्यांची भाषा ओळखण्याची एक मेख असते. ती साधली, तर बुद्धीचे आणि संधीचेही सोने होते. अशी भाषा जाणणाऱ्यांना संकटातही संधी दिसते; ती साधण्याचा शहाणपणाही सुचतो. मंदी ही अशीच एक संधी असते. कोविड काळात धास्तावलेले जग जेव्हा भविष्याच्या काळजीने काळवंडलेले होते, तेव्हा संकटाचे संधीत रूपांतर करून घेण्याची बुद्धी भारतास सुचली आणि मंदीच्या काळातही संधी साधून भारताने अवघे जग आपलेसे केले. कोविड महामारीचे हे संकट तर तेव्हा नवखेच होते. त्याच्याशी कसा सामना करावयाचा, त्यास तोंड कसे द्यावयाचे आणि ते परतवून लावण्यासाठी कोणती बुद्धी पणाला लावावयाची, याची काहीच कल्पना नसल्याने जग अंधारात चाचपडत असताना, अनिश्चित भविष्यास सामोरे जायचेच, असा विचार बहुधा एकट्या भारतानेच तेव्हा केला आणि संकटाचे संधीत रूपांतर करून जगाच्या पटलावर आपले स्थान भक्कम करून घेतले. हा केवळ योगायोग नव्हता, तर बुद्धी आणि संधी या दोन्हीचा वापर करण्याची हीच वेळ आहे, हे ओळखल्यामुळेच ते साध्य झाले होते. कदाचित संकटाच्या रूपानेदेखील संधी समोर येऊन उभ्या राहतात, हेच त्यावेळी ओळखण्याकरिता बुद्धी पणाला लावली गेली. संधीनेही त्यास साथ देऊन स्वतःचेच सोने करून घेतले. अशा वेळा वारंवार येत नाहीत हे खरे असतेच तसेच प्रत्येक संकटात संधी दडलेली असतेच असे नाही, पण तशी संधी नसेलच अशा समजुतीने प्रत्येक संकटात संधी शोधणेच सोडून दिले, तर ते संकट सरल्यानंतर त्यातील संधीची जाणीव होऊन पश्चात्तापाचीही वेळ येते. म्हणून संधी शोधावी लागते, तिचे सोने करण्याचा शहाणपणा दाखवावा लागतो. अलिकडच्या काळातील काही निर्णयांकडे आणि विशिष्ट राजकीय भूमिकांकडे पाहताना, केंद्र सरकारने कोणत्याही संकटाकडे संधी म्हणूनच पाहावयाचे ठरविलेले दिसते आणि त्या संधीचे सोने करण्याकरिता पुरेपूर प्रयत्न करण्याची भूमिकादेखील दिसते.

वर्तमानातील जागतिक परिस्थिती, भू-अर्थशास्त्र यांच्या संदर्भात जगाकडे पाहिल्यास, भारताच्या अर्थव्यवस्थेच्या आलेखाची उत्तरेकडे सुरू असलेली वाटचाल पाहून जग अचंबा व्यक्त करत आहे, ही बाब नाकारता येणार नाही. आज भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे, यावर वित्त क्षेत्रातील जागतिक संस्थांनी शिक्कामोर्तब केले आहे. लवकरच देश जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होईल, याविषयीही आता फारसे दुमत राहिलेले नाही. जागतिक विकासात भारताचे योगदान २० टक्क्यांहून अधिक राहील तसेच गेल्या दशकातील संकटावर मात करून त्यामध्ये दडलेल्या संधीचे सोने केल्यामुळेच प्रगतीच्या वाटचालीचा हा वेग कायम राखता आला, हेही आता स्पष्ट झाले आहे. यामुळेच देशात महिन्यागणीक परदेशी गुंतवणुकीचा वाढता ओघ सुरू असून भांडवली बाजाराने परदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित केले आहे. अर्थव्यवस्थेचे सर्व घटक आणि आर्थिक स्थितीचा पाया मजबूत असल्याचीच ही एक प्रकारची हमी असल्याने, त्याचे परिणाम सर्वत्र दिसू लागले आहेत. गेल्या १५ ऑगस्ट रोजी, स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून देशाला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणातूनही याचेच संकेत मिळाले होते. संकटातून संधी शोधण्याच्या आणि संधीचे सोने करण्याच्या उमेदीची ती पायाभरणी ठरली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर लादलेल्या ५० टक्के अतिरिक्त करांच्या बोजाचे ओझे स्वीकारण्याची मानसिक तयारी भारताच्या कृतीत आणि धोरणातही प्रतिबिंबित झालेली दिसते. अमेरिका ही जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असल्याने, जगावर आर्थिक सत्ता लादण्याचा या देशाचा इरादा आता ट्रम्प यांच्या धोरणाच्या रूपाने उघड झाला आहे. अशा स्थितीत जगातील सर्वात मोठी आणि भक्कम लोकशाही असलेल्या भारताने सर्वात मोठ्या अर्थसत्तेसमोर गुडघे टेकावेत का, या प्रश्नाचे होकारार्थी उत्तर देणे कोणासही रुचणारे नाही. त्यामुळेच अशा काहीशा कठीण काळाने समोर आणून ठेवलेल्या संधीचे सोने करण्याची भारताची भूमिका जगाला नवा मार्ग दाखविणारी ठरणार आहे.

ट्रम्प यांच्या टॅरिफ बॉम्बच्या संकटात संधी दडलेली आहे, याचे संकेत देणारी परिस्थिती आपली अनुकूलता दर्शवित आहे. जागतिक पत बाजारात भारताच्या मानांकनाचा दर्जा उंचावल्याची बातमी आठवडाभरापूर्वी हाच दिलासा देऊन गेली. संधी समोर आली आणि आपण त्याकडे दुर्लक्ष करून ती वाया घालविली तर तो करंटेपणा ठरेल, हे ओळखून स्वदेशी आणि आत्मनिर्भरतेच्या जुन्या सिद्धांतांस नवी झळाळी येऊ पाहात आहे. ट्रम्प यांच्या निर्बंधांच्या आक्रमणास तोंड देण्यासाठी केवळ सरकारची धोरणे पुरेशी नाहीत. त्यासाठी देशातील जनतेची एकमुखी साथ आणि संधी साधण्याच्या प्रयत्नांत हातात हात असणेही गरजेचे आहे. स्वदेशीचा वापर हा आपल्या देशाच्या आर्थिक स्वावलंबनाचा जुनाच संदेश आहे. आत्मनिर्भर भारत ही मोदी सरकारने सत्तेवर आल्यानंतर केलेली घोषणा एव्हाना देशाच्या कानाकोपऱ्यात भिनलेली आहेच; आता ट्रम्प टॅरिफच्या संकटाला सामोरे जाण्यासाठी हा मंत्र आणि याच घोषणा नव्या संधी घेऊन समोर दाखल झाल्या आहेत. याआधी आलेल्या अशा अनेक संधी गमावल्यामुळे भारताचा आत्मनिर्भरतेचा मार्ग दुर्लक्षित राहिला आणि भारताची जीवनव्यवस्था आयातकेंद्रित झाली. कोणतीही अत्याधुनिक गोष्ट प्रगत देशांनी विकसित करावयाची आणि भारताच्या बाजारपेठेत त्याचा व्यापार करावयाचा, हीच आजपर्यंतची रीत होती. जेव्हा कोणत्याही गोष्टीची गरज पडेल, तेव्हा जगाच्या बाजारपेठेतून ती आयात करावी या आयातकेंद्री धोरणामुळे अत्याधुनिक तंत्रज्ञान विकसित करण्याची गरज भारताला वाटलीच नाही. असे तंत्रज्ञान आपण विकसित करू शकतो, याची जाणीव भारतास झालीच नाही. संधी गमावण्याचाच हा परिणाम होता, हे आता मागे वळून पाहिल्याने लक्षात येऊ लागले आहे. ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणास तोंड देताना भूतकाळातील ही चूक सुधारून संकटाच्या रूपाने समोर उभ्या राहिलेल्या संधीचा मागोवा घेण्याची उमेदही निर्माण झाली आहे. सेमीकंडक्टरच्या निर्मितीचे गेल्या पाच-सहा दशकांपासून रखडलेले भारताचे स्वप्न आता साकार होण्याच्या मार्गावर आहे, हे त्याचेच उदाहरण आहे. अंतराळ संशोधन क्षेत्रातील भारताच्या अंतरिक्ष वैज्ञानिकांनी दाखविलेली कर्तबगारी त्याच जाणिवांचे रूप आहे. सामाजिक सुधारणांच्या वाटांवरील काटे दूर करण्यासाठी अनावश्यक कायद्यांचे विसर्जन, नव्या समाजाभिमुख कायद्यांची निर्मिती आणि भाररतीयत्वाच्या भावनेस बळ देणाऱ्या धोरणाची अंमलबजावणी त्याच भावनेचे प्रतिबिंब आहे.

अलिकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताच्या आत्मनिर्भरतेच्या भावनेस नवी साद घातली आहे. स्वदेशीचा नारा नव्याने दिला आहे. ट्रम्प यांची भारताची कोंडी करण्याची आडमुठी भूमिका दिवसागणीक अधिक स्पष्ट होत असताना, कोणत्याही स्थितीत अमेरिकेसमोर नाक घासण्याची वेळ येऊ नये यासाठी स्वदेशी व आत्मनिर्भरतेची पंतप्रधानांनी दिलेली हाक ही भारताच्या भविष्यातील परिवर्तनाची नांदी ठरू शकते. आता हातपाय गाळून चालणार नाही, तर या परिस्थितीचा फायदा घेऊन संपूर्ण जगाला मंद वाढीच्या टप्प्यातून बाहेर काढण्यासाठी भारत सक्षम होत आहे, हा मोदी यांचा विश्वास पाहता, जनतेच्या सहभागाच्या विश्वासावरच मोदी सरकारने संधीचे सोने करण्याचे साहस केले आहे, हे स्पष्ट होते. आता अमेरिकेच्या तालावर नाचायचे, आत्मनिर्भरतेच्या सुरांनी भारावून जायचे हे ठरविण्याची वेळ आली आहे. आपण किनाऱ्यावर बसून पाण्यात दगड मारावेत आणि उमटणारे तरंग न्याहाळत स्वस्थ बसावे ही स्थिती आता चालणार नाही, तर वाहत्या प्रवाहास बांध घालून त्याला आपल्याला हव्या त्या दिशेला वळविण्याची ताकद आपल्याकडे आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान मोदी यांनी केले होते. ट्रम्प आणि अमेरिकेच्या टॅरिफ बॉम्बला निकामी ठरविण्यासाठी हे सामर्थ्य वापरण्याची भारताची उमेद यशस्वी ठरली, तर जागतिक राजकारणातील ती ऐतिहासिक घटना ठरेल, यात शंका नाही.

## तंत्रवेध

डॉ. दीपक शिकारपूर

# एआयच्या माध्यमातून सायबर गुन्हेगारी

'एआय' ही मानवी जीवनातील एक क्रांतिकारी शक्ती आहे, जी अनेक क्षेत्रांमध्ये बदल घडवून आणेल. तंत्रज्ञान हे एक शक्तिशाली साधन आहे. त्याचा वापर मानवजातीच्या कल्याणासाठी केला पाहिजे. झटपट अर्थार्जन करण्यासाठी काही अनुभवी संगणकतज्ज्ञ सायबर गुन्हेगारीचा मार्ग पत्करत आहेत. सायबर गुन्हेगार नवीन तंत्रज्ञानाचा दुरुपयोग करून गुन्हे करण्याच्या नवनवीन युक्त्या शोधतात. संगणक प्रणाली 'हॅक' करून माहिती चोरण्याची तर इतकी विविध तंत्रे आहेत की बस्स. त्यांना या बाबतीत काही तज्ज्ञ हॅकर्स आणि गुन्हेगार मार्गदर्शनही करीत आहेत. आता यात भर पडली आहे कृत्रिम बुद्धिमत्तेची. सुरक्षिततेच्या दृष्टीने डिजिटल युग अत्यंत धोकादायक ठरत आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे अनेक सोयी उपलब्ध झाल्या असल्या, तरी सायबर गुन्हेगारांनाही आधुनिक साधनांचा वापर करून गुन्हे करणे सोपे झाले आहे. सायबर गुन्हेगारी म्हणजे इंटरनेट, संगणक, मोबाईल किंवा इतर डिजिटल साधनांचा वापर करून कायद्याच्या विरोधात केले जाणारे कृत्य. यात डेटा चोरी, बँकिंग घोटाळे, ओळख चोरी, खंडणीसाठी मालवेअर, बनावट वेबसाईट्स, सोशल मीडिया फसवणूक आदींचा समावेश होतो.

सायबर गुन्हेगार फिशिंग आणि स्पूफिंगसाठी एआयचा वापर करतात. एआय वापरून अगदी खरीखुरी वाटावीत अशा ईमेल्स, एसएमएस किंवा वेबसाईट्स तयार केल्या जातात. हे संदेश बँक, सरकारी संस्था किंवा प्रसिद्ध कंपन्यांच्या नावाने येतात. एआय आणि मशीन लर्निंग अल्गोरिदमचा वापर करून गुन्हेगार एखाद्या व्यक्तीच्या सोशल मीडिया प्रोफाईल, ई-मेल आणि इतर ऑनलाईन माहितीचे विश्लेषण करतात. या माहितीच्या आधारे ते व्यक्तीच्या आवडीनिवडी, नोकरी आणि सामाजिक संबंधांनुसार अत्यंत विश्वसनीय फिशिंग ई-मेल तयार करतात. उदाहरणार्थ, तुम्ही एखाद्या बँकेचे ग्राहक असाल तर तुम्हाला त्याच बँकेसारखा दिसणारा ई-मेल येऊ शकतो. 'आपले बँक खाते बंद होणार आहे. कृपया लगेच लॉगिन करा.' त्यातील लिंकवर क्लिक करताच बनावट वेबसाईटवर वापरकर्त्याचे लॉगिन व पासवर्ड घेतले जातात. एआय अर्थात कृत्रिम प्रज्ञेच्या मदतीने अशा संदेशांची भाषाशैली, लोगो, लेआऊट हे सर्व खरे वाटावे असे तयार केले जाते. हल्ली बरेचदा डीपफेक तंत्रज्ञानाचाही वापर केला जातो. डीपफेक म्हणजे एआयच्या सहाय्याने बनवलेले बनावट व्हिडीओ किंवा ऑडिओ क्लिप्स. उदाहरणार्थ कंपनीच्या सीईओचा बनावट व्हिडीओ तयार करून कर्मचाऱ्यांना पैसे दुसऱ्या खात्यात ट्रान्सफर करायला सांगणे किंवा एखाद्या व्यक्तीचा आवाज वापरून त्याच्या नातेवाईकांना फसवणे. यासाठी डेटा विश्लेषण करून लक्ष्य निवडले जाते. एआयच्या मदतीने सोशल मीडिया, वेबसाईट्स, ॲप्सवरून लोकांचा वैयक्तिक डेटा गोळा केला जातो. यासाठी एआय मदत करते.



सर्वसाधारणतः ऑनलाईन कोण जास्त सक्रिय असतात, कोण आर्थिकदृष्ट्या सक्षम वाटतात, कोण सोशल इंजिनीअरिंगला बळी पडण्याची शक्यता जास्त आहे, याबाबत एआय सोशल मीडिया प्रोफाईल विश्लेषण करून संभाव्य सावज शोधून देते. एआय आधारित बॉट्स वापरूनही मोठ्या प्रमाणावर फसवणूक केली जाते. उदाहरणार्थ हजारो फेक अकाऊंट्स तयार करणे, सोशल मीडियावर बनावट प्रचार करणे. एका क्षणात हजारो फिशिंग ई-मेल्स पाठविणे असे प्रकार केले जातात. बरेचदा रॅन्समवेअर वापरले जाते. हे एक प्रकारचे मालवेअर असते. ते संगणकातील संपूर्ण डेटा गायब (डिलीट) करून टाकते. यानंतर डेटा परत मिळविण्यासाठी पैसे मागितले जातात. व्हॉईस स्कॅम्स हा फसवणुकीचा आणखी एक हुकमी प्रकार. एआयच्या मदतीने कोणाच्याही आवाजाची हुबेहुब नदकल केली जाऊ शकते. एखाद्याच्या आईचा आवाज वापरून 'मी अडचणीत आहे, पैसे पाठव' असे सांगणारा कॉल करणे. ओळख चोरी हा असाच एक प्रकार. डीपफेक तंत्रज्ञानाचा वापर करून गुन्हेगार मंडळी बनावट ओळखपत्रे, जसे की आधार कार्ड किंवा पॅन कार्ड तयार करू शकतात. यामुळे आर्थिक सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो. अलिकडे तर तंत्रज्ञानाची झेप स्वयंचलित हल्ल्यांपर्यंतही गेली आहे. मशीन लर्निंगचा वापर करून सायबर गुन्हेगार स्वयंचलित हल्ले करू शकतात, जे मानवी हस्तक्षेपाशिवाय चालतात. पासवर्ड क्रॅकिंग आणि क्रिप्टोग्राफीचा गैरवापर करून फसवणुकीचे प्रकार अंमलात आणले जातात. पारंपरिक पद्धतीने पासवर्ड क्रॅक करण्यासाठी खूप वेळ लागतो. एआयमुळे हे काम खूप सोपे झाले आहे.

फसवणुकीच्या शृंखलेतील ताजा प्रकार म्हणजे अनुमानित पासवर्ड हल्ला. अल्गोरिदम मोठ्या प्रमाणात लीक झालेल्या पासवर्ड डेटाबेसचे विश्लेषण करतात आणि वापरकर्ते सामान्यतः कोणते पासवर्ड वापरतात, याचा अंदाज घेतात. यामुळे ते पासवर्ड क्रॅक करण्यासाठी संभाव्य कॉम्बिनेशन्स तयार करतात आणि मोठ्या प्रमाणात हल्ले करतात. स्टेगानोग्राफी हे तंत्रज्ञान एका फाईलमध्ये दुसरी फाईल लपवण्याचे काम करते. सायबर गुन्हेगार एआयचा वापर करून मालवेअर किंवा गोपनीय डेटा फोटो किंवा ऑडिओ फाईलमध्ये लपवतात. यामुळे तो सामान्य तपासणीत सापडत नाही. सायबर गुन्ह्यांशी लढण्यासाठी ठोस उपाययोजना आवश्यक ठरते. सायबर गुन्हेगार एआयचा वापर करत असले, तरी त्याच तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांच्याशी लढता येते. एआय आधारित सुरक्षा प्रणाली हा एक महत्त्वाचा उपाय. सायबर सुरक्षा कंपन्या आता एआय सक्षम सुरक्षा प्रणाली विकसित करत आहेत, ज्या संशयास्पद वर्तन ओळखतात आणि धोक्यांचा अंदाज घेतात. या प्रणाली स्वयंचलितपणे धोके रोखतात. सायबर जागरूकता हा आणखी एक महत्त्वाचा मार्ग. एआय आधारित फसवणुकीपासून वाचण्यासाठी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे महत्त्वाचे आहे. अनोळखी कॉल, ई-मेल किंवा संदेशांवर विश्वास ठेवण्यापूर्वी त्यांची पडताळणी करणे आवश्यक आहे. मजबूत सायबर सुरक्षा धोरण आखणे हा आणखी एक उपाय आहे. कंपन्यांनी मजबूत सायबर सुरक्षा धोरणे, जसे की मल्टी-फॅक्टर ऑथेंटिकेशन आणि नियमित सुरक्षा ऑडिट्स लागू करणे महत्त्वाचे ठरते.

सायबर गुन्हेगारी ही एक झपाट्याने वाढणारी आणि अत्यंत गुंतागुंतीची समस्या आहे. एआय आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग जसा सकारात्मक कामांसाठी होतो, तसाच गुन्हेगारही त्याचा गैरवापर करीत आहेत. सावज निवडण्यासाठी आणि फसवणूक घडवून आणण्यासाठी हे तंत्रज्ञान प्रभावी ठरते. म्हणूनच समाजातील प्रत्येकाने डिजिटल साक्षरता आत्मसात करणे, सावधगिरी बाळगणे आणि तंत्रज्ञानाचे भान ठेवणे आवश्यक आहे. यामुळेच आपण स्वतःला आणि इतरांनाही सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित ठेवू शकतो. त्यासाठीच शाळा महाविद्यालयांमध्ये संगणक-स्मार्टफोनचे दुष्परिणाम या विषयावर प्रबोधन होणे बंधनकारक व्हायला हवे. नागरिकशास्त्र या विषयात या तंत्राचा समावेश व्हायची हीच वेळ आहे. आधुनिक तंत्रज्ञान योग्य प्रकारे वापरणे म्हणजे सायबर संस्कार. सायबर संस्कार प्रशिक्षणात स्मार्टफोनचा हुकमी वापर, सोशल मीडियावर सावधपणे माहिती पोस्ट करणे, मर्यादित सेल्फी, योग्य चलत चित्रण, सायबर गुन्हेगारी, स्वतःला सायबर सुरक्षित ठेवण्याचे उपाय, सायबर कायदे आणि गुन्हेगारांना झालेल्या शिक्षा याबाबत रितसर प्रशिक्षण देणे ही काळाची गरज बनली आहे. पूर्वी सुरक्षा ही फक्त भौतिक गोष्टींची गणली जायची. आता सर्व संगणकीय भांडवलाची आणि माहितीची सुरक्षा ही एक अत्यावश्यक बाब बनली आहे. कुंपण, पहारेकरी, कड्या-कुलूप, तिजोरी, शिस्त हे सर्व पर्याय पारंपरिक भौतिक जगातील व्यवसायांसाठी ठीक आहेत, पण डिजिटल युगात ते कुचकामी ठरतात. त्यासाठी वेगळे सायबर नियम अत्यावश्यक आहेत.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

प्रफुल्ल क. व्यास

# काहीही खा हो, पण...!

महाराष्ट्रातील खाद्य संस्कृती जगात प्रसिद्ध आहे. इथल्या पुरणपोळीला तोड नाही. अगदी, मिरचीचा ठेचा आणि भाकरीची चवही अवर्णनीय असते. गावखेड्यात फोडणीला तेल नसेल तर तिखटावर पाणी टाकून भाकर गोड मानणारेही आहेत. एरवी उपवास करीत दिवस काढणारे आणि संधी मिळताच मांसाहारावर तुटून पडणारेही याच समाजात आहेत. सणवार, दिवस, काळ पाहून वर्ज्य करणारेही आहेत. काळवेळ, दिवस, सणवार न पाळता आपल्याला काही बंधन नाही, असे सांगणारेही याच समाजात आहेत. अशात शरद पवारांच्या सुकन्या सुप्रिया सुळे यांनी 'मी मटन खाल्लेले माझ्या पांडुरंगाला चालते. मी 'रामकृष्णहरी' वाली आहे, फक्त माळ घालत नाही. कधी- कधी खाते, तुम्हाला काय प्रॉब्लेम?' असा प्रश्न विचारला. त्यांनी विचारलेला प्रश्न अगदी बरोबर आहे. पण, त्यामागील भाव हा काही नेम-नियम पाळणाऱ्यांच्या श्रद्धेवर आघात करणारा आहे. कुणी काय खावे, यावर समाजाचे कोणतेही नियंत्रण नसते. त्याची गरजही नाही. भारत हा खाद्यवैविध्य असलेला देश आहे. तरीही इतरांच्या खाद्यविषयक भावनांचा आदर करण्याची रीत आपल्या देशात आहे. सुप्रियाताईसारख्या लोकप्रतिनिधी असलेल्या व्यक्तीने जाहीरपणे अशी भाषा करणे योग्य नाही. राजकारण्यांनी नेहमी सांभाळूनच बोलले पाहिजे. कारण त्यांचा थेट समाजासोबत संपर्क येतो आणि समाजाच्या डोक्यात सणक गेली तर एखाद्याचा करेक्ट कार्यक्रम कधीही, कसाही होऊ शकतो. सुप्रियाताईंनी किमान हे लक्षात ठेवायला हवे होते की, ज्या विठ्ठलाचे नाव घेऊन त्यांनी उपरोदत शब्द उच्चारले, त्या विठ्ठलाचे निस्सीम भक्त म्हणजे वारकरी मंडळी गळ्यात तुळशीची माळ घालतात. त्यांना मांसाहाराचा शाब्दिक उल्लेखदेखील चालत नाही. परंतु, सध्या धर्माची, श्रद्धेची टवाळी करणारी एक जमातच तयार झाली आहे. सुप्रिया सुळे या एरवी समंजस बोलतात, पण त्यांच्या या प्रश्नामुळे आता त्यांचीही नोंद अशा टवाळी करणाऱ्यांच्या रांगेत झाली आहे. त्यांना हे कळायला हवे की, वारकरी संप्रदाय म्हणजे साधेपणा, सात्त्विकता आणि निस्सीम भक्ती. वारकरी पंढरीला जाताना कांद्यालाही हात लावत नाहीत. काही लोक तर वर्षभर असे काही ना काही नेम पाळतात. विठ्ठलाच्या भक्तीपोटी लौकिकातल्या अनेक आमिषांपासून दूर राहतात. तो त्यांच्या श्रद्धेचा भाग आहे. साध्या भात-भाजीवर समाधानी होणारा वारकरी विठोबाच्या नामस्मरणात तृप्त होतो. तरीही सुप्रियाताईंनी मांसाहाराच्या संदर्भात विठोबाचेच नाव घेतले, हा प्रकार आक्षेपार्ह आहे. एकीकडे सर्वधर्मसमभावाची झूल पांघरायची आणि दुसरीकडे केवळ व्यापक हिंदू समाजाच्या श्रद्धास्थानांचे नाव घेऊन अशी टिप्पणी करायची, हे सुप्रियाताईंना शोभत नाही. त्यांना दुसऱ्या कोणत्याच धर्मातील दैवताचे नाव आठवले नाही, हे नवल नाही. कारण ही कृती त्यांनी जाणीवपूर्वक केलेली आहे. स्वातंत्र्यदिनी मटनाची दुकाने बंद ठेवण्याचा आग्रह सत्ताधाऱ्यांनी केला असल्याच्या पृष्ठभूमीवर त्या बोलल्या. आपण आधुनिक, उदारमतवादी आहोत, हे दाखवण्यासाठी त्यांनी असे म्हटले असावे. त्यांची आधुनिकता त्यांना लखलाभ होवो. पण, महाराष्ट्राशी नाते असलेल्या सुप्रियाताईंना हे कळायलाच हवे की, पांडुरंगाला फक्त भक्ती चालते. बाकी कशाचाही तो भुकेला नाही. तो केवळ भावनांचा भुकेला आहे. सुप्रियाताईंना एवढेच सांगावेसे वाटते की, त्यांना जे काही आवडते, ते सारे त्यांनी खावे. पण, असे वेडेवाकडे बोलून वारकऱ्यांचा तळतळाट घेऊ नये. समस्त वारकरी वर्ग चांद्यापासून बांद्यापर्यंत एक आहे. विठ्ठलाच्या बाबतीत तो अतिशय भावनाशील, संवेदनशील आहे. एरवी कुणाच्याही वाटेला न जाणारा हा वर्ग आहे. अशा वर्गाच्या भावनांवर आघात करणे वेदनादायक आहे. सुप्रियाताईंच्या माहितीसाठी हे सांगितले पाहिजे की, हिंदू धर्म आधीपासूनच उदारमतवादी आहे. या परंपरेच्या खऱ्या पाईकांनी कधीही कोणत्याही वैविध्यावर आक्षेप घेतला नाही. हा धर्म कोणत्याही पक्क्या नियमांनी बांधलेला नाही. विशिष्ट उपासना पद्धतीचा त्यात आग्रह नाही. हा धर्म भेदाभेद करीत नाही. जी उदारमतवादिता सुप्रियाताई सुळे यांच्यासारखे लोक आता मिरवितात, ती हिंदू धर्माची प्राचीन परंपरा आहे. त्याच परंपरेचा वारसा चालविणारे वारकरी संप्रदायातील लोक सोशिक, समंजस आहेत. त्यामुळे ते यावर प्रतिक्रिया देणार नाहीतच. तरीही सुप्रियाताई आणि त्यांच्यासारख्या अन्य मंडळींना हे समजावून सांगितले पाहिजे की, अशा प्रकारची वक्तव्ये करून ते उदारमतवादी ठरत नाहीत. उदारमतवाद इतका उठवळ नसतो. जो स्वतःचे मत मांडताना आणि स्वतःच्या श्रद्धांचा सन्मान करताना इतरांच्याही मतांचा आदर करतो आणि इतरांच्या श्रद्धांचाही सन्मान करतो, तो खरा उदारमतवादी असतो. ज्यांचे वर्तन याहून वेगळे असते, ते उदारमतवादी असूच शकत नाहीत.

९८८१९०३७६५

## प्रासंगिक

प्रा. धन्यकुमार बिराजदार, सोलापूर

# खेळाचे महत्त्व करिअरच्या नव्या क्षितिजाकडे

आजच्या युगात खेळ केवळ विरंगुळा, मनोरंजन, शारीरिक तंदुरुस्ती साधण्याचे साधन राहिलेले नाहीत, तर ते एक आशादायी आणि उज्ज्वल करिअरचे क्षेत्र बनले आहे. पूर्वी खेळाकडे छंद म्हणून पाहिले जात असे, परंतु आज खेळाडूंना केवळ देश-विदेशात फक्त नावच होईल असे नाही, तर आर्थिक स्थैर्य, सामाजिक सन्मान आणि व्यावसायिक संधीही विपुल प्रमाणात उपलब्ध होऊ लागल्या आहेत. अनेकदा ८०-९० वर्षीय वयोवृद्धांचे शारीरिक व मानसिक आरोग्य संपन्न असल्याचे वृत्त वाचतो. हे शक्य आहे का असा प्रश्न निर्माण होतो, खेळाडू खेळाचे महत्त्व ओळखून असतो.

**''आरोग्यं परमं भाग्यं, स्वास्थ्यं सर्वार्थसाधनम।**
**आरोग्येणैव साध्यं हि सर्वं सर्वत्र मानवैः।।''**

आरोग्य उत्तम असणे म्हणजे सर्वात मोठे भाग्य आहे. कारण चांगल्या आरोग्यामुळेच चार पुरुषार्थ प्राप्त करू शकतो, सर्व कार्य यशस्वी होऊ शकतात. कोरोना सारख्या कठीण काळानंतर सुद्धा अनेकांचे आरोग्य उत्तम कसे, हा प्रश्न मनात असेल पण व्यायाम हेच त्याचे उत्तर आहे. खेळामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक संतुलन आणि सहनशीलतेचा विकास होतो. एवढेच नव्हे तर व्यावसायिक खेळाडूंमध्ये शिस्तबद्ध जीवनशैली, ताणतणावावर मात करण्याची क्षमता आणि संघभावना ही गुणवैशिष्ट्ये नैसर्गिकरीत्या विकसित होतात, जी कोणत्याही क्षेत्रात अत्यंत महत्त्वाची असतात.

वृत्तपत्र असो किंवा टीव्ही चॅनेल असो प्रत्येकामध्ये खेळाच्या बातम्या असतात. याचाच अर्थ खेळाची व्याप्ती आज वाढली आहे. खेळाच्या क्षेत्रात केवळ खेळाडू म्हणूनच नव्हे, तर प्रशिक्षक, फिटनेस ट्रेनर, फिजिओथेरपिस्ट, स्पोर्ट्स जर्नालिस्ट, क्रीडा व्यवस्थापक, विश्लेषक आणि पंच अशा विविध व्यवसायांची संधी सुद्धा उपलब्ध झाली आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा, लीग सामने, तसेच खाजगी अकॅडमीमुळे करिअरच्या असंख्य वाटा खुल्या झाल्या आहेत. खेळाडूंना आज केवळ पदके किंवा ट्रॉफी मिळत नाहीत, तर प्रायोजकत्व, ब्रँड अँबॅसडरशिप, जाहिराती आणि सरकारी नोकरी अशा अनेक सुविधा उपलब्ध होतात. त्यांच्या यशामुळे समाजात आदर्श निर्माण होतो आणि तरुण पिढीला प्रेरणा मिळते. सरकारकडून खेळाडूंना शिष्यवृत्ती, शासकीय योजना, पुरस्कार व सवलती दिल्या जातात. खाजगी उद्योगसंस्थाही विविध लीग किंवा स्पर्धांद्वारे खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देतात. या पाठबळामुळे खेळ क्षेत्रात दीर्घकालीन करिअर करणे शक्य झाले आहे.

खेळाडूंना जागतिक पातळीवर स्पर्धांमध्ये सहभाग घेण्याची संधी मिळत आहे. यामुळे फक्त व्यक्तिगत प्रगतीच होत नाही, तर देशाचे नावही उज्ज्वल होते. क्रिकेट मध्ये रवी शास्त्री, सुनील गावस्कर, सचिन तेंडुलकर, विराट कोहली, एम. एस. धोनी, हॉकीमध्ये मेजर ध्यानचंद, धनराज पिल्लै, सरदार सिंग, रूपिंदर पाल सिंग, बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू, सायना नेहवाल, कुस्तीपटू सुशील कुमार, विनेश फोगाट तर पी. टी. उषा, महेश भूपती, सानिया मिर्झा यांनी इतर अनेक खेळामध्ये देशाची किर्ती वाढवली आहे. त्यांना राष्ट्रीय पातळीवर गौरवण्यात आले. आजच्या स्पर्धात्मक जगात खेळ हे केवळ छंद न राहता एक सशक्त करिअरचा मार्ग बनले आहे. यासाठी योग्य प्रशिक्षण, चिकाटी आणि सातत्य आवश्यक आहे. खेळाडू केवळ मैदानात नव्हे तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होऊ शकतो. खेळातून मिळालेली शिस्त, सांघिक शक्ती, संघर्षाची तयारी, निर्णय क्षमता आणि जिंकण्याची जिद्द म्हणजेच जीवनशिक्षण आहे. सरकारने २०२० च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात खेळाडूंना अनेक सवलती दिल्या आहेत. याचा विद्यार्थ्यांनी नक्की लाभ घेतला तर जीवनात यशस्वी होणे सहज शक्य आहे यात शंका नाही.

९४२३३३०७३७

## आत्मसाधनेचे महापर्व म्हणजे दशलक्षण-पर्युषण महापर्व

भारतामध्ये अनेक जाती-धर्मांचे लोक आनंदाने राहतात. प्रत्येक धर्माचे सण-उत्सव आपापल्या पद्धतीने साजरे केले जातात. युगारंभाच्यावेळी संवत्सरी पर्व मोठ्या उत्साहाने सर्वत्र साजरा केला जातो. यालाच जैन दर्शनामध्ये पर्युषण महापर्व-दशलक्षण महापर्व असे म्हटले जाते. हा सण प्रत्येक वर्षी भाद्रपद शुक्ल पंचमीपासून चतुर्दशीपर्यंत भारतातच नाही, तर जगभरात साजरा केला जातो. पर्युषण म्हणजे परि+उषण=पर्युषण. सतत आत्म्याजवळ राहणे. आत्म्याचे ध्यान करणे. हा आत्मचिंतनाचा पर्व होय. दश म्हणजे दहा प्रकारे आत्म गुणांची आराधना करणे होय. भौतिक पंचेंद्रिय विषय जनित सुख सोडून आत्मिक सुखाकडे वाटचाल करणे, हा या सणाचा उद्देश आहे. क्रोध, मान, माया, लोभ हे कषाय नाहीसे करून उत्तम क्षमा-मार्दव-आर्जव-शौच (पवित्रता) या गुणांच्या अभिव्यक्तीचा हा पर्व आहे. क्रोध, अहंकार, कपट, हव्यास यांना व्यवहारामध्ये वाईट मानले जाते. हिंसा, असत्य, चोरी, कुशील व परिग्रह ही पाच पाप मानली आहेत. याउलट संयम, सत्य, त्याग, ब्रह्मचर्य, आकिंचन्य या आत्मिक गुणाद्वारे आत्म्याच्या विकासाचा हा महापर्व आहे. संसार दुःखातून काढून आध्यात्मिक सुखाकडे नेणारा हा पर्व आहे.



आजच्या धावपळिच्या युगात स्वतःसाठी जगण्याची प्रेरणा देणारा हा पर्व आहे. भोगापेक्षा त्यागाचा कानमंत्र देणारा असा हा पर्व आहे. उत्तम क्षमा धारण केल्याने क्रोध, वैर नष्ट होतो. संपूर्ण जगात शांतता येईल. 'क्षमा वीरस्य भूषणम्' क्षमा करणे हे वीर पुरुषाचे लक्षण आहे. क्रोध हा आत्म्याचा विभाव आहे तर क्षमा हा मूळ स्वभाव आहे. मृदुता, कोमलता, पवित्रता, सत्य, संयम, तप, त्याग या गुणांमुळे आत्मिक सौंदर्य वाढते. ब्रह्मचर्य तत्त्वाने ज्ञानवृद्धी होते तसेच सर्व माता, भगिनी यांची रक्षा होईल. विश्वातील संपूर्ण प्राणिमात्राच्या कल्याणाची भावना या पर्वात केली जाते.

## वाचक पत्रे

दशलक्षण-पर्युषण महापर्वाच्या शुभेच्छा.

**सुनील बेलोकर शास्त्री**/८३०८१२३४९८

## वाहतूक पोलिसांचे अभिनंदन!

नागपूर शहरात वाहतुकीची समस्या विक्राळ रूप घेताना दिसत आहे. आरटीओच्या माहितीनुसार २० लाखांच्यावर दोनचाकी व ५ लाखांच्यावर चारचाकी वाहने शहरात धावतात. राज्य शासनाच्या वाहनांबरोबर खाजगी वाहनांची होत असते. मात्र खाजगी बसेसच्या मनमानीची तक्रार नेहमीच होत आहे. खाजगी बसेसकडून प्रवाशांना त्रास होतो. निर्धारित जागा सोडून वाट्टेल तेथून सवारी घेणे हा महत्त्वाचा मुद्दा आहे. त्यातल्या त्यात गुंड प्रवृत्तीच्या एजंटचे वर्चस्व अनुभवास येते. जबरदस्ती करणे, वेळांचे पालन न करणे, धाक दाखवून प्रवाशांना आपल्या वाहनांत बसण्यास प्रवृत्त करणे, महाराष्ट्र शासनाच्या बसथांब्यावर दोन-चार बसेस उभ्या करून प्रवाशांची व शासनाच्या बसेसची गैरसोय करणे या सर्व गोष्टी अतिशय साधारण झालेल्या आहेत, ज्यामुळे एसटी बसेस तिथे न थांबता सरळ पुढे जाण्यास प्रवृत्त होतात. ज्येष्ठ नागरिक, अपंगांना असलेल्या सवलती एसटी बसेस उपलब्ध न झाल्यामुळे खाजगी बसेसचे पूर्ण भाडे घेण्यास प्रवृत्त करतात. जर एखाद्याने विरोध केला तर त्या स्थानकांवर पुन्हा न दिसण्याच्या गंभीर धमक्याही दिल्या जातात. खाजगी बसेसच्या या त्रासापासून आणि त्यांच्या तक्रारीपासून नागपूर शहर वाहतूक विभागातर्फे घेतले गेलेले पाऊल खरंच कौतुकास्पद आहे. १२ ऑगस्ट २०२५ पासून नागपूर वाहतूक पोलिसांतर्फे केलेल्या आदेशानुसार प्रायोगिक स्तरावर एक महिना खाजगी बसेस आपल्या निर्धारित स्थानकांव्यतिरिक्त विशिष्ट वेळेकरिता प्रवासी घेणे व उतरविणे करू शकणार नाही. याकरिता वाहतूक पोलिसांतर्फे विशेष पथक याबद्दल काळजी घेत असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या खाजगी बसेसवर दंड व योग्य कारवाई करतील. वाहतूक पोलिसाचे याबद्दल अभिनंदन!

**लक्ष्मीकांत शिरास**/९७६६१७८१९७

## गणेशोत्सवात अश्लीलता टाळा

विद्येचा गणनायक गणपती बाप्पाचे आगमन झाले. सगळीकडे प्रचंड उत्साहाचे वातावरण आहे. घरगुती गणेशोत्सव ५-७ दिवसांचा असतो तर सार्वजनिक उत्सव १० दिवस असतो. या उत्साहात आजकाल अतिप्रमाणात नवनवीन धांगडधिंगा होत असल्याने उत्सवाचे वातावरण बिघडून जाते. विशेषतः जी गाणी लावली जातात, ती हिडीस प्रकारची असतात. यामुळे कार्यक्रमात तारतम्य राहत नाही. उत्साही कार्यकर्त्यांनी असल्या प्रकारची गाणी बंद करावी व गणेश स्तोत्र, विघ्नहर्ताची गाणी, देवाधिकांची गाणी, भावगीते, भक्तिगीते लावावी. गणेशोत्सवाचे पावित्र्य राखावे, आरतीचे स्वरूप भक्तिमय असावे.

**शिरीश बने**/९२२४२९९२३०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१**
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# गौरी सणाच्या तयारीसाठी महिलांची बाजारपेठेत मोठी लगबग

## आकर्षक मुखवटे, दागिने, मखरांची खरेदी : सुबक प्रतिकृतींनाही मागणी




**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ ऑगस्ट**

गौरी अर्थात महालक्ष्मीचा सण उद्या रविवारी (दि.३१) आहे. त्याची उत्सुकता जाणवत असून, शहरातील बाजारपेठांमध्ये गौरी सणाच्या तयारीची महिलावर्गात लगबग आतापासूनच दिसत आहे. मुखवटे, मखर, हार, तोरणे, कृत्रिम फुले, वॉल हँगिंग्ज, रंगीबेरंगी कपड्यांचे सेट आणि सजावटीच्या साहित्याने दुकाने खचाखच भरली आहेत.

गौरी सजावटीत यंदा विविधतेचा ट्रेंड दिसत आहे. डेकोरेटिव्ह मखर आणि आकर्षक थाळी डिझाइन्स यांना महिलावर्गाची अधिक पसंती आहे. पारंपरिक हार, रांगोळी डिझाइन्ससह थीम आकर्षक मुखवट्यांसह पूर्णाकृती प्रतिकृतींनाही मागणी लग्न होऊन गेलेल्या मुलींना गौरी (लक्ष्मी मुखवटे) भेट दिले जातात; तसेच स्थलांतर झाल्यानंतर नवीन घरी गौरी सणासाठीदेखील महालक्ष्मीचे मुखवटे लागतात. त्यामुळे बाजारात मुखवट्यांची मागणी वाढली आहे. विविध आकर्षक मुखवट्यांसह पूर्णाकृती प्रतिकृतीदेखील विक्रीसाठी आल्या आहेत.



## श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२९ ऑगस्ट**

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त व दहिहंडी उत्सवा निमित्त मुलांचा बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला.


याविषयी सविस्तर वृत्त असे की तालुक्यातील ग्रामीण भागात अल्पावधीतच नावारूपाला आलेल्या व इंग्रजी माध्यमाचे उत्कृष्ट दर्जाचे शिक्षण देणाऱ्या श्री संस्कार एज्युकेशन ग्रुपच्या श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये मागे होवुन गेलेल्या स्वातंत्र्य दिनानिमित्त व दहिहंडी उत्सवा निमित्त मुलांचा बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला.



यावेळी सर्व प्रथम मान्यवरांच्या हस्ते रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, स्त्री शिक्षणाच्या शिल्पकार क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले, विद्या देवता माता सरस्वती चे पुजन व दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर मा. रमेश भिसे साहेब, सचिव जनविकास सेवा भावी संस्था केज, संजीवनी राऊत, काकासाहेब कोल्हे सर यांनी श्री संस्कार एज्युकेशन ग्रुप च्या पुढील वाटचालीसाठी गौरवोद्गार काढून शुभेच्छा दिल्या. त्यानंतर श्री संस्कार इंग्लिश स्कूल च्या विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिनानिमित्त भाषणे व श्री कृष्ण चरित्र गीते, गवळणी व देश भक्ती पर गीतांवर बहारदार नृत्य सादर केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. रमेश भिसे साहेब सचिव जनविकास सेवा भावी संस्था केज हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच सौ. रोहिणीताई सुनील देशमुख, कैलास पाटील सरपंच साळेगांव, रब्बानी सर, अध्यक्ष जिनीयस इंग्लिश स्कूल, ह.भ.प. आबा महाराज मेहरकर, काकासाहेब कोल्हे सर, संजीवनी राऊत, सुनील बापू देशमुख, ग्रामपंचायत सदस्य बालाजी राऊत, रामभाऊ गलांडे, शहाजी अप्पा गलांडे, रजनी देशमुख मॅडम, बापुराव तोंडे, ज्ञानेश्वर भांगे, पत्रकार ज्योतीराम सावंत, रामदास सपाटे, अमोल कापरे, अतुल देशमुख, श्री संस्कार इंग्लिश स्कूल चे अध्यक्ष अनिल गलांडे हे होते. या कार्यक्रमाला परिसरातील नागरिक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रिन्सीपल सीमा काळे, व त्यांच्या शिक्षक टिमने परिश्रम घेतले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष अनिल गलांडे यांनी केले तर सूत्रसंचालन आरती आचार्य मॅडम व सीमा काळे मॅडम यांनी केले.

## आयुष ग्लोबल इंग्लिश स्कूल मध्ये गणपती बाप्पा चे उत्साहात आगमन



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२९ ऑगस्ट**

आयुष ग्लोबल इंग्लिश स्कूल मध्ये गणपती बाप्पा चे ढोल ताशाच्या गजरात उत्साहात आगमन झाले. देशाच्या सीमेवर रक्षण करणारे जवान व जगाचा पोशिंदा शेतकऱ्याची प्रतिकृती जय जवान जय किसान साकरण्यात आली व बाप्पा कडे देशाचा जवान व जगाचा पोशिंदा सुखाने व गुण्यागोविंदाने नादावा यासाठी गणपती बाप्पा कडे साकडे घालण्यात आले.

शाळेमध्ये विविध नृत्य लेझीम नृत्य सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमासाठी उपस्थित शाळेचे अध्यक्ष सागर करवा, संचालक-भाग्यश्री करवा तसेच प्रमुख पाहुणे म्हणून थॉमस राजन आणि आयुष डिजिटल प्ले स्कूल व आयुष ग्लोबल इंग्लिश स्कूल चे सर्व शिक्षकवृंद यांनी उत्तम रित्या कार्यक्रम पार पाडण्यास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विवेक पवार यांनी केले.



डॉ.हेडगेवार सार्वजनिक वाचनालय बीडे येथे श्री गणपतीची प्रतिष्ठापना उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी वाचनालयाचे कार्यवाह नंदकिशोर झरीकर प्रमोद कुलकर्णी शशिकांत पसरकर रमाकांत शेरकर सुरेश झाडे तसेच वाचक सभासद मोठ्या प्रमाणात उपस्थित होते

## भगवान विद्यालयात शिवकुमार स्वामी यांच्या हस्ते बक्षीस वितरण



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ ऑगस्ट**

भगवान विद्या प्रसारक मंडळ बीड संचलित भगवान विद्यालयात ७९ व्या भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या अमृत महोत्सवानिमित्त स्वातंत्र्य दिनी एमकेसीएल द्वारा प्रश्नमंजुषा कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयात करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे बक्षीस वितरण शिवकुमार स्वामी निवासी उपजिल्हाधिकारी बीड यांच्या शुभहस्ते व संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष गो.गो. मिसाळ सर,MKCL DIST.Co-ordinetor विठ्ठल पांचाळ सर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री विठ्ठल पांचाळ एमकेसीएल बीड जिल्हा कॉर्डिनेटर यांनी केले.

मुंडे नंदिनी रोहिदास व ढाकणे ज्ञानेश्वर भागवत यांनी प्रथम मानांकन ट्रॉफी व प्रमाणपत्र मिळवले. बांगर तुषार राजेश व कुडके धनश्री गणपत यांना द्वितीय क्रमांकासह ट्रॉफी व प्रमाणपत्र प्राप्त केले.तर देवडकर आदित्य अंगद व झारगड उमेश बाजीराव यांनी तृतीय क्रमांकासह मेडल व प्रमाणपत्र मिळवले. मान्यवरांच्या शुभहस्ते सर्व विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.अनेक स्पर्धेत सहभागी होऊन विद्यार्थ्यांनी नावलौकिक मिळवून विद्यालयाचे नाव उज्वल करावे व आई-वडिलांचे स्वप्नही पूर्ण करावे असे गौरवोद्गार कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी श्री स्वामी साहेब यांनी मनोगतातून व्यक्त करून अनमोल मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपातून शाळेचे मुख्याध्यापक आघाव सरांनी एमकेसीएलचे स्वातंत्र्य दिनी आयोजित केलेल्या प्रश्नमंजुषा कार्यक्रमाबद्दल आभार मानून यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी.पी.डोळे सर यांनी केले. उपस्थितांचे आभार एमकेसीएलचे संचालक देशमुख सर यांनी मानले.कार्यक्रमासाठी शाळेचे उपमुख्याध्यापक श्री गर्जे सर, एमकेसीएलचे कॉर्डिनेटर भागवत ढाकणे सर, लाड सर, खेडकर सर, देशमुख सर, श्रीमती चोले मॅडम यांनी कठोर परिश्रम घेतले.


# देवस्थान जमीन घोटाळ्यावर प्रशासनाचे मौन
# धार्मिक स्थळाच्या मालमत्ता धोक्यात

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ ऑगस्ट**

बीड जिल्ह्यातील देवस्थान जमिनींच्या बेकायदेशीर हस्तांतरणास आळा घालण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दिनांक ३० जुलै २०१०, २९ जून २०११, १३ एप्रिल २०१६, २० जून २०१८ तसेच ०६ नोव्हेंबर २०१८ रोजी परिपत्रके निर्गमित केली होती. या परिपत्रकांद्वारे संबंधित महसूल प्राधिकाऱ्यांना स्पष्टपणे आदेश देण्यात आले होते की, देवस्थान जमिनींच्या बेकायदेशीर विक्री-खरेदीचे व्यवहार रद्द करून ती जमीन पुन्हा देवस्थानच्या नावे नोंदवावी.

मात्र पंधरा वर्ष उलटूनही या परिपत्रकांची अंमलबजावणी झालेली नाही. जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडून ना समितीची स्थापना करण्यात आली, ना चौकशीची प्रक्रिया राबविण्यात आली. परिणामी शासन परिपत्रके

**शासन परिपत्रके व उच्च न्यायालयाचा आदेश बंद फाईलीत जमा - भाविकात संताप**



केवळ कागदापुरती मर्यादित राहिली असून बेकायदेशीर जमिनींचे व्यवहार सुरूच असल्याचे निदर्शनास येत आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडील रिट पिटीशन क्र. १३४८८/२०१७ मधील आदेशालाही प्रशासनाने केराची टोपली दाखवली आहे. उच्च न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिल्यानंतरही त्याची अंमलबजावणी न करणे ही केवळ न्यायालयाचा अवमान नव्हे तर भाविकांच्या धार्मिक आणि सामाजिक हक्कांवर घाला आहे, असे मत व्यक्त होत आहे.

देवस्थान जमीन घोटाळ्याची कार्यवाही शांत राहिल्यामुळे हजारो भाविकांच्या श्रद्धास्थानांशी निगडित जमिनी आजही खाजगी व्यक्तींच्या ताब्यात आहेत. यातून भाविकांचा हक्क, धार्मिक परंपरा आणि सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण या तिन्ही बाबी धोक्यात आल्या आहेत.

स्थानिक नागरिकांचा ठाम आरोप आहे की, शासन परिपत्रके व न्यायालयीन आदेश असूनही जर प्रशासनाने कोणतीही कारवाई केली नाही, तर हे जनहिताशी सरळ प्रतारणा ठरते.भाविक समाज, सामाजिक संघटना आणि स्थानिक नागरिकांनी शासनाने तात्काळ हस्तक्षेप करून देवस्थान जमिनींचे संरक्षण करण्याची मागणी केली आहे. अन्यथा या प्रकरणी जनहित याचिका दाखल करण्याशिवाय पर्याय शिल्लक राहणार नाही, असे मत व्यक्त केले जात आहे.

## आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर आदर्श शिक्षक पुरस्कार ज्ञानेश मातेकर यांना जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२९ ऑगस्ट**

लाल बहादूर शास्त्री विद्यालय उदगीर येथील उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर यांना दैनिक समर्थ राजयोगच्या वतीने वर्धापन दिनाचे औचित्य साधून शिक्षक दिनी शुक्रवार दिनांक ५ सप्टेंबर २०२५ रोजी आश्रम शाळेसह दुर्गम भागातील आणि माध्यम क्षेत्राशी निगडित आदर्श शिक्षकांना राज्यस्तरीय पुरस्काराने मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्काराचे पहिल्या टप्प्यातील सहा शिक्षकांचे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. निवड केलेल्या शिक्षकांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

दैनिक समर्थ राजयोगच्या वतीने प्रतिवर्षी वर्धापन दिन हा विविध क्षेत्रातील आदर्श गुणवंत शिक्षकांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन साजरा करण्यात येतो. यावर्षी आश्रम शाळेतील शिक्षकांसह जिल्हा परिषद, खाजगी शैक्षणिक संस्था, माध्यम क्षेत्राशी निगडित शिक्षकांना विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. यामध्ये



आश्रम शाळेतील शिक्षकांना १५० व्या जयंतीनिमित्त भगवान बिरसा मुंडा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ या नावाने पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच जिल्हा परिषद, खाजगी शिक्षण संस्था अंतर्गत शिक्षकांना देखील आदर्श पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे. तर माध्यमांची निगडित शिक्षकांना आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात येणार आहे.माध्यम क्षेत्राशी निगडित असलेल्या पुरस्कारामध्ये यावर्षी अंबाजोगाई येथील रहिवासी तथा उदगीर येथील लाल बहादूर शास्त्री विद्यालयाचे उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर,आष्टी येथील सहशिक्षक राजेंद्र लाड,माजलगाव येथील प्रा. सुदर्शन स्वामी, परळी वैजनाथ येथील सहशिक्षक अनुप कुसुमकर, केज तालुक्यातील सहशिक्षक नरहरी काकडे आणि पाटोदा येथील प्राचार्य तुकाराम तुपे या गुणवंत सहा शिक्षकांना आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ जाहीर करण्यात आला आहे. निवड केलेल्या शिक्षकांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. येणाऱ्या ५ सप्टेंबर रोजी निवड केलेल्या आदर्श शिक्षकांना संत महंत, लोकप्रतिनिधी, संपादक पत्रकार, आणि प्रशासकीय अधिकारी तसेच समाजसेवक यांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. या आगळ्यावेगळ्या आदर्श उपक्रमाला आणि कार्यक्रमाला शिक्षणप्रेमी नागरिकांनी तसेच दैनिक समर्थ राजयोग परिवारावर प्रेम करणाऱ्या तमाम वाचक, जाहिरातदार, प्रतिनिधी, नागरिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची उंची आणि शोभा वाढवावी असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी यांनी केले आहे.

# दीनदयाळ बँकेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२९ ऑगस्ट**

दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई ची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, गोपीनाथराव मुंडे सभागृह, खोलेश्वर महाविद्यालयात नुकतीच रविवार, दिनांक २४ ऑगस्ट रोजी उत्साहात संपन्न झाली.

सभेच्या सुरूवातीला दीनदयाळ नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालकांनी प्रतिमांचे पुजन केले प्रार्थना घेण्यात आली. सभेस उपस्थितांचे स्वागत प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले. सभेत अहवाल वर्षातील जे थोर नेते, संशोधक, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, लेखक, साहित्यिक, कलावंत, शिक्षणतज्ज्ञ, भारतमातेचे रक्षण करताना शहिद झालेले सैनिक, सामाजिक कार्यकर्ते, बँकेचे आजी माजी सभासद, खातेदार, हितचिंतक, ज्ञात व अज्ञात अशा ज्या व्यक्तींचे निधन झाले, तसेच पहेलगाम येथील आतंकवादी हल्यात मृत्युमुखी पडलेले हिंदु पर्यटक, ऑपरेशन सिंदुरसाठी शहीद झालेले भारतीय जवान, पद्मभुषण भारतीय प्रसिध्द तबला वादक झाकीर हुसेन व भारतीय उद्योगपती रतन टाटा तसेच बँकेचे कर्मचारी यांच्या कुटुंबातील निधन झालेले व्यक्ती या सर्वांच्या दुःखात दीनदयाळ बँक परीवार सहभागी आहे. अशा सर्वांना नम्रतापूर्वक श्रध्दांजली अर्पण करण्यात आली व शांती मंत्राचे पठण संचालिका सौ.शरयुताई हेबाळकर यांनी केले. सभेच्या सुरूवातीस 'सायबर सेक्युरीटी' बाबत संगणक विभागाने माहिती दिली. बँकेतील वसुलीचे काम करणारे कर्मचारी यांना प्रशस्तीपत्र देण्यात येवून त्यांचा यथोचित गौरव करण्यात आला. बँकेच्या अध्यक्षांच्या अनुमतीने सभेस सुरूवात करण्यात आली. सभेत दिलेल्या विषयांवर चर्चा करण्यात आली. सर्व विषय हे संचालक यांनी सभेत मांडले. बँकेच्या अध्यक्षांनी सन २०२४-२५ सालासाठी ४ टक्के लाभांश वाटपाची घोषणा केली. सभेत अचानक उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांना बँकेच्या अध्यक्ष व संचालक यांनी सकारात्मक उत्तरे दिली. बँकेचे उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख यांनी अहवालाचे वाचन केले, तर मागील सभेचे वाचन संचालक जयकरण सुरेशकांबळे यांनी केले. अलेखापरिक्षीत ताळेबंद व नफातोटा पत्रकाचे वाचन संचालक मकरंद कुलकर्णी यांनी केले. अंदाजपत्रकातील खर्चात कमी जास्त झालेल्या खर्चास सभेत संचालक डॉ.विवेक दंडे यांनी वाचन केले. नफा वाटणी पत्रकाचे वाचन संचालक अशोकराव लोमटे यांनी केले. २०२५-२६ सालासाठी केलेल्या अंदाजपत्रकाचे वाचन संचालक किसन पवार यांनी केले. रूपये ३.०० लाखांवरील भांडवली



खर्चाचे वाचन संचालक ॲड.अशोकराव कुलकर्णी यांनी केले. बँकेच्या उपविधीतील दुरूस्तीचे वाचन संचालक बाळासाहेब देशपांडे यांनी केले. वैधानिक लेखापरिक्षणाचे वाचन संचालक जयकरण सुरेशकांबळे यांनी केले, संचालक मंडळ सदस्य व नातेवाईकांना दिलेल्या कर्जासंबंधी घोषणा पत्र संचालक मकरंद कुलकर्णी यांनी केले. सतत समावर्ती लेखापरिक्षकांची नेमणुकी बाबतचा ठरावाचे वाचन संचालक अशोकराव लोमटे यांनी केले. तर वैधानिक लेखापरिक्षकांच्या नियुक्तीसाठी केलेल्या शिफारशीचे वाचन संचालक डॉ.विवेक दंडे यांनी केले. एकमुस्त कर्ज भरणा तडजोड योजनेस अनुसरून २०२४-२५ या आर्थिक वर्षात अनुप्त्पादक कर्ज खात्यास मान्यते बाबत ठरावाचे वाचन संचालक बाळासाहेब देशपांडे यांनी केले. १०० टक्के तरतुद असलेल्या बुडीत व संशयीत कर्जखात्याचा वसुलीचा हक्क अबाधित ठेवून खाते निर्लेखित करण्यास मंजुरी बाबतचा ठराव संचालक मकरंद कुलकर्णी यांनी मांडला. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात अदा न झालेला लाभांशाची रक्कम राखीव निधीस वर्ग करण्यास मान्यतेचा ठराव संचालक ॲड.अशोकराव कुलकर्णी यांनी मोडला. रिझर्व बँक अ.क्र. ७.४ या निकषांस अनुसरून मुख्य कार्यकारी अधिकारी नियुक्ती संदर्भात माहिती सादर करणे ठरावाचे वाचन संचालक ॲड.अशोकराव कुलकर्णी यांनी केले. कायदा कलम २६ (२) अ च्या परंतुकान्वये बँकेच्या २९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहु न शकलेल्या सभासदांची रजा मान्य करून सभासदांना क्षमापित करणे बाबतचा ठराव संचालक किसन पवार यांनी मांडला. सभेच्या समारोप प्रसंगी अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की यांनी मार्गदर्शन केले. तर आभार उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख यांनी मानले. तर सभा समाप्तीची अध्यक्षीय घोषणा व सभा समाप्तीनंतर उपस्थितांना भोजनाचा आस्वाद घेण्यात यावा बाबत सुचना प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी महेश शेळके यांनी केले. सभा हसत- खेळत वातावरणात पार पडली. सभेस मोठ्या प्रमाणात सभासदांची उपस्थिती होती. तसेच सर्व शाखेचे व मुख्यालयाचे अधिकारी, कर्मचारी व सेवक वर्ग उपस्थित होता.

# वसमत, औंढा, कळमनुरीत पुन्हा पाऊस, पिकांचे नुकसान

## सहायक जिल्हाधिकारी योगेशकुमार मीना यांची नुकसानग्रस्त भागास भेट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ ऑगस्ट**

जिल्ह्यातील वसमत, औंढा नागनाथ आणि कळमनुरी या भागात गुरूवार आणि शुक्रवारी पुन्हा एकदा काही ठिकाणी अतिवृष्टी झाली असून सहायक जिल्हाधिकारी योगेशकुमार मीना यांनी कळमनुरी भागातील अतिवृष्टी झालेल्या भागात नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली तसेच शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेतले. नुकसानीचे पंचनामे करून अहवाल सादर करण्याच्या सूचना त्यांनी मंडळ अधिकारी व तलाठी यांना दिल्या आहेत.

हिंगोली जिल्ह्यात मागील चोवीस तासात हलका ते जोरदार पाऊस झाला आहे. विशेषत: कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापूर, वारंगा, डोंगरकडा या मंडळात अतिवृष्टी झाली आहे. याशिवाय तालुक्यातील इतर गावांमध्येही पुरस्थितीमुळे नुकसान झाले आहे. अतिवृष्टी व पूरस्थितीमुळे सोयाबीन, कापूस, तूर, उडीद, मुग, ज्वारी या पिकांचे प्रंचड नुकसान झाले आहे.

दि २९ ऑगस्ट रोजी सहायक जिल्हाधिकारी योगेश कुमार मीना, उपविभागीय अधिकारी प्रतिक्षा भूते, तहसीलदार जीवककुमार कांबळे यांनी चुंचा, जवळापांचाळ, पिंपरीखुर्द, आडा या गावासह परिसरात भेट देऊन पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांचे म्हणणे ऐकून घेतले.

वसमत तालुक्यातही मागील पंधरवाड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक शेतकऱ्योंच मोठ्या प्रमाणावर शेती पिकांचे नुकसान झाले आहे. या पीक नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करण्याच्या सूचना तहसीलदार शारदा दळवी यांनी गुरूवारी दिल्या आहेत.

वसमत तहसील कार्यालयात तहसीलदार शारदा दळवी यांनी तलाठी, मंडळ अधिकारी, कृषी सेवक, कृषी पर्यवेक्षक यांची बैठक झाली. यावेळी तालुका कृषी अधिकारी सुनील भिसे यांची उपस्थिती होती. वसमत तालुक्यात अतिवृष्टीमुळे पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. नदी नाल्यांना पूर आल्यामुळे शेतात पाणी शिरल्याने जमीनी खरडून गेल्या असून काही ठिकाणी पिकेही वाहून गेली आहेत. शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास अतिवृष्टीने हिरावून घेतला आहे. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी पीक नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार पंचनामे सुरू करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर घेण्यात आलेल्या बैठकीत तहसीलदार दळवी यांनी मार्गदर्शन केले. पीक नुसानीबाबत स्थानिक पातळीवर शेतकऱ्यांनी तक्रारीही केल्या आहेत. कापूस, हळद, तुर आदी पिकांचे नुकसान झाले आहे. नुकसानीचे पंचनामे करावे एकही शेतकरी नुकसानीचया पंचनाम्यापासून वंचीत राहता कामा नये तसेच तालुक्यातील पीक नुकसानीच्या शेतकरी निहाय याद्या सादर कराव्यात. पीक नुकसानीच्या पंचनामा बाबत शेतकऱ्यांकडून तक्रारी येता कामा नये याकडे लक्ष देण्याच्या सूचनाही तहसीलदार दळवी यांनी दिल्या.

# राष्ट्रीय आरोग्य अभियान कंत्राटी कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकाऱ्यावर मोर्चा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ ऑगस्ट**

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी अधिकारी, कर्मचारी यांचा बेमुदत आंदोलनाच्या दहाव्या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून निवेदन सादर करण्यात आले आहे. भरपावसातही अकराव्या दिवशी आरोग्य कर्मचाऱ्यांचे जिल्हा परिषदेसमोर आंदोलन सुरूच आहे. दि २८ ऑगस्ट रोजी उबाठा शिवसेनेचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेत त्यांच्याशी संवाद साधला आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी अधिकारी, कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घ्यावे, समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांना एकत्रित ४० हजार रूपये मानधन द्यावे आदी मागण्यांसाठी जिल्ह्यातील सुमारे ५५० आरोग्य कर्मचारी बेमुदत कामबंद आंदोलनात सहभागी झाले आहेत. या आंदोलनामुळ आरोग्य सेवा विस्कळीत झाली असून समुदाय आरोग्य अधिकारीदेखील या आंदोलनात सहभागी झाल्यामुळे ग्रामीण भागातील आरोग्य उपकेंद्रांचे कामकाज ठप्प पडले आहे.

दि २८ ऑगस्ट रोजी आरोग्य कर्मचाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूतळ्यापासून हा मोर्चा काढण्यात आला. शासनाच्या विरोधोत घोषणाबाजी करीत शासनाच्या विरोधातील फलके हाती घेऊन काढण्यात आलेला मोर्चा शहरातील प्रमुख मार्गावरून जिल्हाधिकारी कार्यालयावर आल्यानंतर निवासी उपजिल्हाधिकारी समाधान घुटुकडे यांना निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नावर शासन दरबारी पाठपुराव करणार असल्याचे आश्वासन दिले. तसेच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांची भेट घेणार असल्याचेही आश्वासन दिले. त्यानंतर जिल्हा परिषद प्रशासनाकडेही मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी शंकर तावडे, श्रीपाद गारूडी, पी एस गिरी, प्रसाद कुलकर्णी आदींची उपस्थिती होती.

# एचआयव्ही, एड्स सहजीवन जगणाऱ्यांना मुख्य प्रवाहात आणावे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ ऑगस्ट**

जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय हिंगोली यांच्या तर्फे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ नितीन तडस यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील विविध विभागातील अधिकारी यांची बैठक डापकू कार्यालयात पार पडली.

यावेळी जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्री ज्ञानेश्वर चौधरी यांनी जिल्ह्यातील एचआयव्ही/एड्स कार्यक्रमाविषयी सखोल माहिती देऊन सर्व एचआयव्ही/एड्स सह जीवन जगणाऱ्या व्यक्तींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्वच विभागांनी मदत करून त्यांना सामाजिक लाभाच्या योजना देण्यात येणाऱ्या अडचणी काय आहेत व त्या दूर करण्यासाठी काय करता येईल यावर चर्चा करून प्राधान्याने त्यांना संबंधित योजना मिळवून देण्याची विनंती सर्वांना केली तसेच एचआयव्ही एड्सचा २०१७ चा कायदा काय आहे याबद्दल सविस्तर माहिती दिली.

यावेळी वकील संघाचे जिल्हाध्यक्ष ॲड.सुनील भुक्तर, समाज कल्याण कार्यालयाचे पोपळघट एच बी, महिला व बाल संरक्षण अधिकारी श्रीमती सरस्वती कोरडे, रामप्रसाद मुडे, श्रीमती अलका रणवीर, श्री इरफान कुरैशी तसेच इतर विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी संजय पवार, श्रीमती टीना कुंदनानी व आशिष पाटील यांनी सहकार्य केले.



**हिंगोली– येथील नवसाला पावणारा गणपती श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपतीच्या दर्शनासाठी शुक्रवारी ज्योती फडणवीस हिंगोली येथे आल्या होत्या. यावेळी विघ्नहर्ता चिंतामणीचे दर्शन घेऊन विधीवत पूजा केल्यानंतर संस्थानच्यावतीने त्यांचा प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष माजी आ. गजाननराव घुगे, युवा जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे, पवन उपाध्ये, संजय ढोके, संस्थानचे पदाधिकारी दिलीप बांगर, तसीश लोहीया, मनोज दावनगिरे, पवन मुंदडा आदी. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### भजन कौर सेठी यांचे निधन



हिंगोली– शहरातील तोफखाना भागातील रहिवासी तथा सेवानिवृत्त शिक्षिका भजन कौर इंद्रपालसिंग सेठी (वय ७८) यांचे बुधवार दिनांक २७ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. भजन कौर सेठी ह्या हिंगोली शहरातील जिल्हा परिषद शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत होत्या. काही वर्षांपूर्वी त्या सेवानिवृत्त झाल्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर कयाधूधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे. इंग्रजी पत्रकार हरपालसिंग सेठी यांच्या त्या मातोश्री होत.

### अन्न सुरक्षा नियमांचे पालन करावे

हिंगोली– गणेशोत्सव तसेच दिवाळीपर्यंत होणाऱ्या विविध सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने नागरिक व गणेश मंडळांना अन्नसुरक्षेची विशेष काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. गणेश मंडळांनी प्रसाद तयार करताना स्वच्छतेचे नियम पाळावेत, प्रसाद झाकून ठेवावा, शिळे अन्न वाटू नये, प्रसाद बनविणाऱ्या व्यक्तींनी हातमोजे, मास्क, ॲप्रन वापरावा तसेच संसर्गजन्य आजार असलेल्या व्यक्तींनी प्रसाद हाताळू नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. प्रसाद वाटपासाठी मंडळांनी अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अंतर्गत संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे. नागरिकांनी मिठाई व अन्नपदार्थ खरेदी करताना ताजेपणा, परवाना/नोंदणीधारक दुकाने, बॅच नंबर, बेस्ट बिफोर व एक्सपायरी दिनांक तपासावेत. उघड्यावरचे अन्न व भडक खाद्यरंग असलेली मिठाई खरेदी टाळावी, तर खवा-माव्याची मिठाई २४ तासांच्या आतच सेवन करावी. नागरिकांना कोणतीही शंका असल्यास अन्न व औषध प्रशासन, परभणी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन सहायक आयुक्त (अन्न) श्री. अ.ए. चौधरी यांनी केले आहे.

### हिंगोलीत गुरूवारी सरासरी १० मिमी पाऊस

हिंगोली– जिल्ह्यात गेल्या २४ तासात सरासरी १० मिलीमीटर पावसाची नोंद झाली असून, वसमत तालुक्यात सर्वात जास्त १८.३ मि.मी. पाऊस झाला आहे. तर हिंगोली तालुक्यात सर्वात कमी ३.५ मि.मी. पाऊस पडला आहे. जिल्ह्यात आज सकाळपर्यंत नोंदला गेलेला तालुकानिहाय सरासरी पाऊस पुढीलप्रमाणे असून कंसातील आकडेवारी १ जूनपासून आजपर्यंत झालेल्या पावसाची आहे. हिंगोली ३.५ (६०६.५), कळमनुरी १२.१ (७२९.४), वसमत १८.३ (६९८), औंढा नागनाथ (७२०.५) आणि सेनगाव तालुक्यात ४.२ (६३५.७) मि. मी. पाऊस पडला आहे. सर्व आकडेवारी मिलीमीटर परिमाणात आहे. हिंगोली जिल्ह्यात दिनांक १ जून २०२५ ते २८ ऑगस्ट, २०२५ पर्यंत सरासरी ६७३.७ मिलीमीटर पाऊस पडला आहे. त्याची टक्केवारी १०९.१ अशी आहे.

# ग्रामसेवकाच्या बदलीसाठी पंचायत समितीमध्ये ठिय्या आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ ऑगस्ट**

औंढा नागनाथ तालुक्यातील केळी व केळी तांडा या ग्रुप ग्रामपंचायतचे ग्रामसेवक हे ग्रामस्थांना शासकीय व निमशासकीय कागदपत्राची आवश्यकता असल्यास देण्यास टाळाटाळ करतात, गावात कोणतीही ग्रामसभा घेत नाहीत, याबाबत विचारले असता उध्दटपणे बोलतात, त्यामुळे सदरील ग्रामसेवकाची तात्काळ बदली करावी, यासाठी ग्रामस्थांनी पंचायत समिती कार्यालयात निवेदन देत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे औंढा नागनाथ तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर उर्फ माऊली झटे यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी (ता .२८) रोजी सकाळी आकरा वाजल्यापासून औंढा नागनाथ पंचायत समिती कार्यालयात गटविकास अधिकारी गोपाळ कल्हारे यांच्या दालनासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. दरम्यान जोपर्यंत त्या ग्रामसेवकाची बदली होऊन दुसऱ्या ग्रामसेवकाची नेमणूक मिळत नाही तोपर्यंत ठिय्या आंदोलन सोडणार नसल्याचेही ग्रामस्थांनी पवित्रा घेतला आहे. यावेळी ठिय्या आंदोलनात श्रीराम जाधव, विलास राठोड, विलास जाधव, सुधाकर मुंडे, संदीप मुंडे, रंगनाथ जाधव दिगंबर राठोड, विजय जाधव यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थांची उपस्थिती होती.

# आदर्श महाविद्यालयात राष्ट्रीय क्रिडा दिनानिमित्त कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ ऑगस्ट**

मेजर ध्यानचंद यांच्या जन्म दिनानिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिनाचे आयोजन आदर्श महाविद्यालय हिंगोली येथे करण्यात आले. हॉकी खेळाचे जादूगार म्हणून ओळख असलेले मेजर ध्यानचंद यांना ओळखले जाते. भारतीय हॉकी संघास मेजर ध्यानचंद यांनी ऑलिंपिक स्पर्धेत गोल्ड मेडल मिळवून दिली. अशा या महान खेळाडूच्या जन्मदिनानिमित्त संपूर्ण भारतात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जातो. त्यानिमित्त आदर्श महाविद्यालय हिंगोली येथे राष्ट्रीय क्रीडा दिनाचे आयोजन करण्यात आले प्रसंगी मेजर ध्यानचंद यांच्या संपूर्ण जीवनातील खेळ प्रवासातील आठवणींना उजाळा देण्यात आला व आदर्श महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विलास आघाव यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी क्रीडा विभाग प्रमुख डॉ आनंद भट्ट, स्टाफ सचिव डॉ सचिन हटकर, डॉ विलास पवार, प्रा नरेंद्र रायलवार, विद्यापीठ खेळाडू सुनील अंभोरे व इतर आदर्श महाविद्यालयीन खेळाडू उपस्थित होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विलास आघाव यांनी खेळाडूंना व क्रीडा विभागाला शुभेच्छा दिल्या.

# जनप्रहार कामगार संघटनेचे विविध मागण्यांसाठी ढोल बजाओ आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ ऑगस्ट**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळ कार्यालयातील मनमानी करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या विरोधात शुक्रवार दि २९ ऑगस्ट रोजी ढोल बजाओ आंदोलन करण्यात आले तसेच मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

हिंगोली येथील कामगार कार्यालयातील कंत्राटी कर्मचारी मनमानी कारभार करीत असून त्यांना तत्काळ निलंबीत करण्यात यावे, कल्याणकारी मंडळाचे सोशल ऑडीट लागू करावे, केंद्र शासनाच्या निर्णयानुसार ई-प्रशासन धोरण लागू करावे, बांधकाम कामगारांचे कायद्यांतर्गत नोंदणीसाठी व लाभासाठीचे प्रस्ताव ट्रेड युनीयन ॲक्ट नुसार नोंदणीकृत संघटनेकडून दाखल करून घेण्याबाबत शासन आदेशाची अंमलबजावणी करावी, हिंगोली जिल्ह्यातील कामगारांचे नोंदणी, नूतनीकरण व लाभाचे अर्ज केलेले प्रस्ताव तत्काळ निकाली काढावेत या मागण्यांसाठी जनप्रहार कामगार संधटनेच्यावतीने ढोल बजाओ आंदोलन करण्यात आले. यावेळी संस्थापन अध्यक्ष नितीन दवंडे, सिध्दार्थ दवंडे, सिध्दार्थ घनसावंत, अनिता गायकवाड, गजानन गायकवाड सविता इंगळे, विष्णु मुटकुळे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# स्वयंसिध्दा नारी मंचकडून गणेश अथर्व शीर्षचे सामूहीक वाचन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली २९ ऑगस्ट**

शहरातील श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती मंदिराच्या उत्सवाला प्रारंभ झाला असुन श्री स्थापनेच्या दुसऱ्या दिवशी २८ ऑगस्टला स्वयंसिध्दा नारी मंचच्या शेकडो महिलांनी श्री गणेश अर्थशीर्षचे सामुहिक वाचन केले.

हिंगोली शहरातील प्रसिद्ध श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती मंदिर हे अनेक राज्यामध्ये मोदकोत्सवामुळे सर्व दूर प्रसिद्ध आहे. त्या निमित्त २७ ऑगस्ट रोजी पासुन उत्सवाला सुरूवात झाली आहे. स्वयंसिध्दा नारी मंच यांच्यावतीने २८ ऑगस्टला सकाळी ७ वाजता गणेश अथर्वशिर्ष सामुहिक पठणाचे आयोजन केले होते. त्या निमित्ताने शेकडो महिलांची उपस्थिती होती. यावेळी महिलांचे २१ आवर्तने झाली. यावेळी भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

# उच्च पातळी बंधारे ८५ टक्केपेक्षा जास्त भरले

## जायकवाडी, खडकपुर्णा आणि निम्न दुधना धरणातुन विसर्ग सुरु

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

यंदा जालना जिल्ह्यात ऑगस्ट अखेरपर्यंत समाधानकारक पाऊस असून, ७ मध्यम प्रकल्पांपैकी २ तर लघु प्रकल्पापैकी २३ प्रकल्प ओव्हरफ्लो झाले आहेत. सोबतच जालना जिल्ह्यासाठी महत्वाचे स्त्रोत असलेले जायकवाडी, खडकपुर्णा आणि निम्न दुधना प्रकल्प ८० के क्षमतेने भरल्याने पाण्याचा विसर्ग सुरु रण्यात आला आहे.

यंदा सुरुवातीलाच पावसाने जोरदार हजेरी वल्यानंतर मध्यंतरी दडी मारली होती. मुळे गंभीर टंचाई निर्माण होण्याची क्यता व्यक्त केली जात होती. मात्र, गत दिवसात पावसाने समाधानकारक हजेरी लावल्यामुळे धरणातील पाणीसाठ्याचे चित्र पुर्णतः बदलले असून, सर्वत्र पाणीच पाणी दिसुन येत आहे. त्यात मुख्याने जिल्ह्यातील ७ मध्यम प्रकल्पांपैकी जाफ्राबाद तालुक्यातील जिवरेखा आणि बदनापुर तालुक्यातील अप्पर दुधना मध्यम कल्प पूर्ण क्षमतेने भरल्याने ओव्हरफ्लो ले आहेत. केवळ एका प्रकल्पात जोत्याच्या खाली पाणी पातळी असून, एका प्रकल्पात २५ टक्केपेक्षा कमी तर २ मध्यम प्रकल्पात ७५ टक्केपेक्षा जास्त पाणी साठले आहे. त्याचप्रमाणे एकुण ५८ लघु प्रकल्पापैकी २३ प्रकल्प ओव्हरफ्लो झाले असून, १२ प्रकल्पातील पाणी पातळी जोत्याच्या खाली आहे.


जालना जिल्ह्यातील उच्च पातळीचे बंधारेही पुर्ण क्षमतेने भरण्याच्या मार्गावर असून, घनसावंगी तालुक्यातील राजाटाकळी बंधारा ९०.५४ टक्के, मंगरुळ बंधारा ८८.२० टक्के, जोगलादेवी बंधारा ८४.७६ टक्के, अंबड तालुक्यातील पाथरवाला बंधारा १०० टक्के तर परतुर तालुक्यातील लोणी सावंगी बंधारा ८५.८ टक्के भरला आहे.

दरम्यान, दि. ३० आणि ३१ ऑगस्ट रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि विजेच्या कडकडाटासह हलका पाऊस य पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तविल्याची माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणने कळविली आहे.



## संक्षिप्त

### पंडीत दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानव दर्शन हिरक महोत्सवाविषयी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी घेतली बैठक



तभा वृत्तसेवा
जालना/ प्रतिनिधी

पंडीत दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानव दर्शन हिरक महोत्सवातंर्गत पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांचे कार्य, विचारप्रणाली व एकात्म मानव दर्शन शालेय विद्यार्थी, शिक्षक, महिला इत्यादी घटकांपर्यंत पोहचविण्यासाठी दि. २८ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली समितीची बैठक पार पडली. बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, शिक्षणाधिकारी बाळासाहेब खरात, उपशिक्षणाधिकारी रवि जोशी, उपशिक्षणाधिकारी विनया वडजे, जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण अधिकारी अतुल केसकर, समिती सदस्य तथा ऋषी विद्या स्कुलच्या व्यवस्थापकीय संचालक शितल भाला, श्रीमती दानकुंवर हिंदी कन्या विद्यालयाचे कोषाध्यक्ष संजय अग्रवाल यांची प्रमुख उपस्थिती होती.गुरुवार दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती असून त्यानिमित्ताने पंडीत दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानव दर्शन हिरक महोत्सवातर्गत पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांचे कार्य, विचारप्रणाली व एकात्म मानवदर्शन जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी ग्राम पातळीवर विविध कार्यक्रम, युवा तरूण, तरूणी विद्यार्थ्यासाठी निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वाद– विवाद स्पर्धा इत्यादी स्पर्धेचे आयोजन करण्यात यावे. तसेच उत्कृष्ट सहभागासाठी पारितोषिक देवून गौरविण्याबाबत कार्यक्रम आयोजित करण्यात यावा. असे निर्देशही जिल्हाधिकारी मित्तल यांनी संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांना यावेळी दिले.

### भाजपाच्या जालना ग्रामीण जिल्हा प्रसिध्दीप्रमुख पदी बाबासाहेब कोलते यांची फेर निवड

तभा वृत्तसेवा
जालना /प्रतिनिधी



भारतीय जनता पार्टी जालना ग्रामीण जिल्हा कार्यकारिणीच्या जिल्हा प्रसिध्दीप्रमुख पदी बाबासाहेब कचरु कोलते यांची सातव्यांदा फेर निवड भाजपा चे जिल्हाध्यक्ष आ. नारायण कुचे यांनी एका पत्राद्वारे केली आहे. या निवडीचे माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, पालकमंत्री पंकजाताई मुंढे, माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर, आ. नारायण कुचे, आ. संतोष पाटील दानवे, माजी आ. कैलास गोरंटयाल, मा. आ. विलास बापु खरात, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर (आबा) दानवे, सतिष घाडगे, रामेश्वर पाटील भांदरगे, अशोक पांगारकर, राजेश राऊत, बद्रीनाथ पठाडे, अनिलराव कोलते, गणेश बापू फुके, शिवाजीराव थोटे, देविदासराव कुचे, विमलताई आगलावे, संध्याताई देठे, विजय कामड, मुकेश चिने, पदमाकर जऱ्हाड, वसंतराव जगताप, भगवान मात्रे, विष्णु ठोंबरे, सुदाम बोचरे, दिलीप कोलते, विजय आहेर, सतिष जाधव, नामदेव तिडके, मनोज तोडावत, रामलाल चव्हाण, भाऊसाहेब भुजंग, मोहीनीराज मापारी, सांडू वाघ, आदीसह भाजपा जालना ग्रामीण जिल्हयातील पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

### पावसात तुंबलेल्या गटाऱ्या, रस्त्यावर घाण पाणी!

#### बदनापूर शहर दुर्गंधीने त्रस्त; नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर संकट



तभा वृत्तसेवा
बदनापूर/प्रतिनिधी

बदनापूर शहरातील छत्रपती संभाजीनगर – जालना महामार्गालगतच्या गटाऱ्या वर्षानुवर्षे स्वच्छ न झाल्याने पावसाळ्यातील प्रत्येक पावसानंतर रस्त्यावर घाण पाणी वाहू लागते. त्यामुळे शहरात सर्वत्र दुर्गंधीचे साम्राज्य पसरते आणि प्रवासी, नागरिक तसेच व्यापाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागतो. गटारातील सांडपाणी रस्त्यावर आल्याने महामार्गावरील खड्डे वाहनधारकांच्या लक्षात न येता अपघातांचे प्रमाण वाढत आहे. दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता असून, शहराची प्रतिमा 'गलिच्छ' अशी बाहेरगावी जाणाऱ्या प्रवाशांच्या नजरेत उमटत आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, सन २००९ मध्ये महामार्गाचे रुंदीकरण करताना नाल्या बांधण्यात आल्या, मात्र तेव्हापासून आजपर्यंत त्यांची साफसफाई झालेली नाही. परिणामी पावसात गटाऱ्या तुंबून रस्त्यावर सांडपाणी येते. चार वर्षांपूर्वी आमदार नारायण कुचे यांनी जागतिक बँक प्रकल्प अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष गटारातील घाण दाखवून तातडीने स्वच्छता करण्याची सूचना केली होती. त्यानंतर उपअभियंता सूर्यवंशी व शाखा अभियंता जाधव यांच्यासह पाहणीही करण्यात आली. तरीसुद्धा आजवर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. दरम्यान, शहरात दोन टोल नाके असूनही रस्त्यावरील खड्डे व गटारींची दुरुस्ती न करता वाहनधारकांकडून टोल वसूल केला जात आहे. यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. नागरिकांचा प्रतिक्रिया
जागतिक बँक अधिकाऱ्यांनी व प्रशासनाने तातडीने गटारींची स्वच्छता करून महामार्गाची दुरुस्ती करावी. नागरिक कॉम्रेड प्रल्हाद हेकाडे

## परतुर भागातून सोलर केबल ची चोरी करणाऱ्या आरोपींना अटक

### केबल चोरीचे गुन्हे उघडकीस १,४०,०००/रुपयांचा मुद्देमाल जप्त

तभा वृत्तसेवा
परतुर / प्रतिनिधी



परतुर भागात सोलर प्लांट वर होणाऱ्या चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी माननीय पोलीस अधीक्षक बंसल यांनी आदेश करून सूचना केल्या होत्या. त्यावरून दिनांक २७/०८/२०२८ रोजी पोलीस ठाणे परतूरचे पोलीस निरीक्षक एस. पी.भागवत यांना माहिती मिळाली की, मोजे खांडवी तालुका परतुर येथे सोलर प्लांट वरील चोरी ही आरोपी नावे समीर काळे व याने त्याच्या साथीदारासह केली आहे अशी खात्रीशीर माहिती मिळाली होती. पोलीस ठाणे परतुर येथील अधिकारी आमदार यांनी संशयित आरोपी नामे समीर काळे यास ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने सदर चोरी त्याचे साथीदार नामे सय्यद असेफ व शेख गौस याच्यात यांच्यासह केल्याची कबुली दिली. त्यांच्याकडे इतर होण्याबाबत चौकशी केली असता त्यांनी त्यांनी इतर तीन गुन्हे मोजे मसाला येथील ढरींर डेश्ररी येथे केल्याचे कबुली केली आहे.सदर तिने आरोपी त्यांना अटक करून सदर तीनही आरोपींना वाटप करून त्यांच्याकडून गुन्ह्यातील चोरीस गेलेला माल तांब्याचे वायर किमती १,४०,०००/ रुपयांचे जप्त केले आहे. सदरचीकामगिरी मा.पोलीस अधीक्षक अजयकुमार बसंल, मा.अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. रामेश्वर रेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे परतुरचे पोलीस निरीक्षक एस.बी.भागवत, पल्लेवाड, पोउपनी, अंमलदार अशोक गाढवे, गजानन राठोड, ज्ञानेश्वर वाघ, नरेंद्र चव्हाण, राम हाडे, विजय जाधव, गोविंद पवार अच्युत चव्हाण, नितीन बोंडारे यांनी केलेली आहे.

## सरकारने विमुक्त जाती व भटक्या जमातील नागरिकांच्या सशक्तीकरणासाठी घेतलेल्या निर्णयाचे स्वागत – अविनाश राठोड


तभा वृत्तसेवा
तळणी / प्रतिनिधी

मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री सह इतर मंत्रिमंडळाच्या मंत्र्याने २६ ऑगस्ट २०२५ रोजी विमुक्त जाती व भटक्या जमातीतील लाभार्थ्यासाठी अनेक योजनांची कार्यपद्धती प्रभावीपणे राबवून जाती आणि जमाती मधील लोकांच्या सशक्तीकरण करण्यासाठी अनेक निर्णय घेतल्यामुळे मा. तालुका अध्यक्ष भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा अविनाश राठोड यांनी स्वागत केले आहे. त्याचप्रमाणे या निर्णयाचे विविध कार्यालयीन अधिकाऱ्याने, कर्मचारी किंवा इतराने यात लोकांचा सहभाग नोंदवून अंमलबजावणी करावी असे आव्हान राठोड यांनी केले आहे. या निर्णयामध्ये १) विमुक्त जाती (अ) मधील बंजारा, वाघरी, वडार ई जाती सह, २) भटक्या जमाती (ब) मधील गोसावी, बेलदार, लोहार सह इतर जमाती,३) भटक्या जमाती (क) मधील धनगर सह इतर जामाती आणि ४) भटक्या जमाती (ड) मधील वंजारी सह इतर जमातील लोकांना किंवा नागरिकांनाची तातडीने ओळखपत्र देण्यासाठी अंमलबजावणी करण्यासाठी निर्णय घेण्यात आला त्यात उदा. मतदान , आधार, पॅन, जॉब, किसान क्रेडिट, आयुष्यमान भारत, ईश्रम कार्ड इतर ओळखपत्राचा समावेश होतो. त्याचप्रमाणे नागरिकांना ताबडतोब शासकीय प्रमाणपत्रे देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यात उदा. जातीचे प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलियर, नॅशर्नेलिटी, डोमेसाईल, सातबारा, नमुना आठ ( होल्डिंग ), उत्पन्न ई हस्तावेजाचा समावेश होतो. या समाजातील लोकांना आवासा करिता प्रधानमंत्री, मोदी,अहिल्याबाई होळकर घरकुल यशवंतराव चव्हाण, इंदिरा आवास, शेतकऱ्या संदर्भात कल्याणकारी योजना, उच्च शिक्षीत विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, ई योजना आणि विविध विकास मंडळाची कार्यपद्धती प्रभावीपणे राबविण्यासाठी निर्णय घेण्यात आला. या जाती व जमातीतील लोकांची शहराच्या ठिकाणी ये –जा होऊ नये किंबहुना त्याची अवहेलना होऊ नये म्हणून गाव स्तरावर किंवा तालुक्या स्तरावर विविध योजनेचे ओळखपत्रे, प्रमाणपत्रे, वैयक्तिक प्रशासकीय आदेश देण्यासाठी शिबिराचे आयोजन करण्याचा यावे यासाठी निर्णय घेण्यात आला. या कार्यपद्धतीतील उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायत, तालुकास्तरीय ग्रामपंचायत, नगरपालिका / नगरपरिषद महानगरपालिका आणि जिल्हास्तरीय पुरस्काराचे वितरण करण्याचा सुद्धा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचप्रमाणे कार्यपद्धतिचा देख– रेखी साठी तालुकास्तरावर, जिल्हास्तरावर आणि राज्यस्तरावर समितीची स्थापना करण्यात येणार आहे. आगामी काळात आपल्या गाव, तालुका आणि जिल्हास्तरावर होणाऱ्या शिबिराला सर्वांनी सहकार्य करावे असे आव्हान राठोड यांनी केले आहे.

## गाडेगवान पाटीजवळ कार ८० फुट विहीरीत कोसळली

### पाच जनांचा पाण्यात बुडुन मृत्यू , एक जन गंभीर जखमी

तभा वृत्तसेवा
जाफराबाद/प्रतिनिधी



जाफराबाद तालुक्यातील गाडेगवान पाटीजवळ शुक्रवारी सकाळी सहा वाजेच्या दरम्यान भरधाव कारने मॉर्निंग वॉक करणारे यांना वाचवण्याच्या प्रयत्नात एक जणाला धडक देऊन गंभीर जखमी करून कार रोड लगत असलेल्या ८० फुट विहिरीत जाऊन आदळली यामध्ये पाच जणांचा पाण्यात बुडुन मृत्यू झाला.ज्ञानेश्वर लक्ष्मण भांबिरे वय ५५ राहणार कोपर्डा तालुका भोकरदन
निर्मला सोपान डकले वय २५ राहणार गेवराई गुंगी तालुका फुलंब्री
ज्ञानेश्वर भाऊसाहेब डकले वय ४० राहणार गेवराई गुंगी तालुका फुलंब्री
पद्माबाई लक्ष्मण भांबिरे वय ५५ राहणार कोपर्डा , अजीनाथ तुळशीराम भांबीरे वय ४० अशी मयताची नावे आहेत. तर गंभीर जखमी मध्ये भगवानराव साळुबा बनकर वय ५२ रा. गाडेगवान यांच्यावर जालना येथील हॉस्पिटल मध्ये उपचार सुरू आहे.याबात अपघाताची माहिती अशी की, गेवराई गुंगी येथील मयत ज्ञानेश्वर डकले हे भोकरदन तालुक्यातील कोपार्डा या गावातील पद्माबाई लक्ष्मण भांबीरे या नातेवाईकांना अर्धांग वायूच्या उपचारासाठी सुलतानपूर येथे घेवून जात असतांना ते राजुर टेंभुर्णी रोडवरील गाडेगवान पाठीवरील मॉर्निंग वॉक करणाऱ्या युवकांना वाचवण्याच्या प्रयत्नात एका जनाला जोराची धडक देऊन भरधाव कार रोड लगत असलेल्या पन्नास फुट अंतारावर असलेल्या विहिरीत जाऊन कोसळली.ही घटना सकाळी शुक्रवारी सहा वाजेच्या दरम्यान घडली. या घटनेमुळे संपूर्ण तालुका हादरा असुन या घटनेची माहिती टेंभुर्णी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास भारती, सपोनी बाबासाहेब खार्डे, हसनाबाद पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संजय आहीरे, यांनी आप आपल्या पोलिस कर्मचा–सह घटनास्थळी धाव घेऊन तात्काळ मदत कार्य सुरू केले. घटना स्थळी जालना येथील अग्नीशमन दल, रेस्क्यू टीम , महसूल यंत्रणा यांनी बचाव कार्य सुरू केले होते. पण विहिरीत ७० फूट पाणी असल्याने अडथळा निर्माण झाला होता. अखेर सात तासाच्या प्रयत्नानंतर मृत्यू देह विहिरीतून बाहेर काढण्यात यश आले. अपघातग्रस्ताना मदत करण्यासाठी देळेगव्हाण, गाडेगव्हाण येथील नागरिकांनी बचाव कार्यास मदत केली होती. या घटनेची माहिती मिळताच जालना पोलीस उपाधीक्षक आयुष नोपानी, भोकरदन येथील उपविभागीय पोलीस अधिकारी, डॉक्टर नितीन कटेकर, नायब तहसीलदार मंगेश साबळे व महसूल चे कर्मचारी, अग्निशामन दलाचे जालना येथील पान पाटील, उपस्थित होते.या घटनेने संपूर्ण तालुका हादरा आहे.या अपघात मृत्यू देहाचे डॉ. तपासून शवविच्छेदन केले असून मृत्युदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला आहे.या घटनेची टेंभुर्णी पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.व तपास पोलीस निरीक्षक कैलास भारती, सपोनी बाबासाहेब खार्डे व पोलीस कर्मचारी करीत आहे.

## जालना गणेश फेस्टिवलचे ना. संजय सिरसाठ यांच्या हस्ते उद्घाटन

तभा वृत्तसेवा
जालना /प्रतिनीधी

रौप्य महोत्सवी वर्षातील जालना गणेश फेस्टीवलचे उद्घाटन माझ्या हस्ते झाले, हे आपण आपले भाग्य समजतो. गेल्या पंचवीस वर्षापासून हा फेस्टीवल सुरु असल्याने आता या फेस्टीवलची व्याप्ती वाढवायला पाहिजे, असे मत महाराष्ट्राचे सामाजिक न्याय मंत्री ना. संजय सिरसाठ यांनी व्यक्त केले आहे. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पा. दानवे हे होते. तर या उद्घाटन सोहळ्यास व्यासपीठावर अंदाज समितीचे अध्यक्ष तथा जालन्याचे आ. अर्जुनराव खोतकर, या कार्यक्रमाचे खास आकर्षण प्रसिध्द सिने अभिनेत्री तेजस्वीनी लोणारी, माजी आ. कैलास गोरंट्याल, शिवसेनेचे (उबाठा) जिल्हाध्यक्ष भास्करराव अंबेकर, भाजपाचे जिल्हाध्यक्ष भास्करराव दानवे, बद्री पठाडे, शिवसेनेचे (शिंदे गट) ए. जे. बोराडे, जालना जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक अजयकुमार बंसल, संभाजीनगरचे माजी महापौर विकास जैन, अभिमन्यू खोतकर, विष्णू पाचफुले, उद्योजक विनय साहनी, उद्योगपती कैलास लोया, ॲड. संजय काळबांडे, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, अर्जुन गेही, सिध्दीविनायक मुळे, राहूल भुरेवाल, अमोल ठाकुर आदींची उपस्थिती होती.

प्रारंभी मान्यवरांचा फेस्टीवलतर्फे भगवा दुपट्टा आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. पुढे बोलतांना सिरसाठ म्हणाले की, जालना गणेश फेस्टिवलच्या उद्घाटनाला मला बोलावलं त्याबद्दल आयोजकांचे आभार! गंमतीचा भाग सांगून ते म्हणाले की, हे शहर लोखंडाचं पाणी करणारं आहे. लोकांनी या शहरांकडे पाहायला यायला पाहिजे. मी संभाजीनगरचा पालकमंत्री झालो. आणि पाच– सहा हजार लोकांची अतिक्रमणं



हटवली, आता कसं संभाजीनगर मोकळं– मोकळं वाटू लागलं आहे. तसेच जालना शहर सुध्दा आता शहर राहिलं नाही. संभाजीनगर– जालना सुध्दा एक झालं आहे. व्याप्ती वाढली पाहिजे. या फेस्टीवल सुध्दा व्याप्ती वाढली पाहिजे, असेही ना. सिरसाठ यांनी यावेळी सांगितले. जालना गणेश फेस्टिवलच्या उद्घाटनानंतर फेस्टीवलचे विद्यमान अध्यक्ष अशोकराव आगलावे यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले की, फेस्टीवलचे हे रौप्य महोत्सवी वर्ष असून यामध्ये होणाऱ्या विविध सांस्कृतिक आणि समाज प्रबोधनपर कार्यक्रमास आपणासह सर्व जालनेकर निमंत्रित आहेत, असे सांगून श्री. आगलावे म्हणाले की, गणेश फेस्टीव्हल २०२५ मोठ्या धुमधडाक्यात साजरा होणार आहे. अनेक राष्ट्रीय कलाकारांनी या मंचावर हजेरी लावली आहे. त्यात मग किर्तनकार, सिने कलाकार, नाटककार असतील किंवा अन्य कलावंत असतील. या फेस्टीवलला रसिकांनी भरभरुन प्रसिसाद दिला आहे. त्यामुळेच हा फेस्टीवल पुण्यानंतर दुसरा क्रमांकाचा ठरला असल्याचेही श्री. आगलावे यांनी सांगितले. यानंतर प्रमुख मान्यवरांचीही समयोचित भाषणे झाली. यावेळी फेस्टीवलचे कार्याध्यक्ष भाऊसाहेब घुगे, कोषाध्यक्ष रवींद्र हुसे तसेच संयोजन समितीचे दिनेश फलके, माजी अध्यक्ष राजेंद्र गोरे, राजेंद्र राख, सुभाषराव कोळकर, शरद देशमुख, अशोकराव उबाळे, चंद्रशेखर वाळिंबे, किरण गरड, ज्ञानेश्वर कदम, सुरेशराव मुळे, प्रा. राजेंद्र भोसले, अजिंक्य घोगरे, सुरेशराव मुळे, प्रसाद वाढेकर, राजेश काळे तसेच अवनिश गरड, संजय देशमुख, धन्नू काबलिये, जगत घुगे, हरिहर शिंदे, विमलताई आगलावे आदींची उपस्थिती होती. या उद्घाटन सोहळ्याचे सुत्रसंचालन प्रा. राजेंद्र भोसले यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार फेस्टीवलचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय लाखे पाटील यांनी केले. महाराष्ट्राची लोकगाणी उद्घाटनानंतर शाहीर रामानंद उगले प्रस्तुत महाराष्ट्राची लोकगाणी हा बहारदार कार्यक्रम झाला. प्रारंभीच त्यांनी आपल्या पहाडी आवाजात सादर केलेला गण हा उपस्थितांची मने जिंकली.

# पावसामुळं नांदेडातील जनजीवन विस्कळीत

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २९ ऑगस्ट -**

मागील आठ दिवसापासून जिल्ह्यातील विविध भागात कोसळत असलेल्या मुसळधार पावसाचे कहर केला असतानाच आता नांदेड शहरात पहाटे साडेचार ते सहा वाजेपर्यंत झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसामुळे अनेक सखल भागात पाणी साचले आहे. शेकडो घरांमध्ये पावसाचे पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळीत झाले असून जिल्ह्यातील सर्व शाळांना सुट्टी देण्यात आली आहे. तसेच विष्णुपुरी धरणाचे ८ दरवाजे उघडले असून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने नदीकाठच्या लोकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

नांदेड जिल्ह्यातील मुखेड, देगलूर, बिलोली, धर्माबाद, नायगाव, कंधार, लोहा या तालुक्यांना पुराच्या पाण्याचा सर्वाधिक फटका बसला आहे. अशातच शुक्रवारी पहाटे साडेचार वाजता नांदेड शहरात या ढगफुटी सदृश्य पावसामुळे सखल भागामध्ये



पाणी साचले. सिडको परिसरातील घराघरात पावसाचे पाणी घुसले असून संसार उपयोगी साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

शहरातील सिडको, हडको, वसरणी, लालवाडी, श्रीनगर, सरपंच नगर, वजिराबाद, महावीर चौक, सांगवी, जयभीमनगर, श्रावस्तीनगर, फुले नगर, आनंदनगर भागातील ही घरात मोठ्या प्रमाणात पाणी शिरले आहे. याशिवाय देगलूर नाका परिसरातील अनेक घरांमध्ये पाणी शिरल्यामुळे नागरिकांची अक्षरशः तारांबळ उडाली आहे. तसेच नांदे-नरसी मार्गावर अनेक ठिकाणी रस्त्यावर पाणी साचल्याने या भागावरील वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे.

**विष्णुपुरी धरणाचे ८ दरवाजे उघडले**

विष्णुपुरी धरणात येणाऱ्या पाण्याची आवक लक्षात घेता धरणाच्या आठ दरवाजातून गोदावरी नदी पात्रात ८८ हजार १४३ पाण्याचा विसर्ग केला जात आहे. यामुळे नदी धोक्याची पातळी ओलांडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे नदीकाठच्या लोकांना सदर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**लष्कराला केले पाचारण**

नांदेड शहरातील पूर परिस्थिती लक्षात घेता संभाव्य मदतीच्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी लष्कराला पाचारण केले आहे. नांदेड शहरातील पूर परिस्थिती हाताळण्यासाठी एनडीआरएफ, एसडीआरएफ, अग्निशमन दल आणि लष्कर संयुक्तरीत्या मदत करतील अशी माहितीही जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली आहे.

**सतर्क राहण्याच्या सूचना**

नांदेड जिल्हा आणि शहरात होत असलेल्या अतिवृष्टीमुळे नागरिकांनी सतर्क राहावे. सखल भागात पाणी शिरत असल्याने या भागातील नागरिकांनी सुरक्षित स्थळी त्वरित स्थलांतरित व्हावे. गरज पडल्यास महानगरपालिका प्रशासन आणि जिल्हा प्रशासनाकडे तातडीने संपर्क करावा. कोणत्याही प्रकारची जीवितहानी होणार नाही यासाठी नागरिकांनी ही काळजी घ्यावी असे आवाहनही जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## सिडकोतील घरात पाणी शिरून संसार उपयोगी वस्तूंची नासाडी; तहसीलदार वारकड यांच्याकडून पहाणी

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २८ ऑगस्ट -**

सिडको येथील एनडी ४१ के-१ व गुरूवार बाजार या भागातील घरांमध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या पावसाचे पाणी घुसून घरे जलमय झाली व संसार उपयोगी वस्तूंची नाजदूष होऊन ते पाण्याने वाहून गेले. यावेळी तहसीलदार संजय वारकड व वाघाळा तलाठी सज्जाचे तलाठी संजय वानोळे यांनी पूरग्रस्त घरांची पाहणी करून नाव नोंदणी करण्यात आली आहे .



सिडको येथील एनडी ४१ के-१ हा भाग व गुरूवार बाजार हा भाग सकल भागात असल्याने व मनपाच्या धोरणात्मक नाल्या नसल्यामुळे तसेच असलेल्या नाल्यांचा गाळ उपसा नसल्याने पावसाचे पाणी बाहेर जाण्यासाठी मार्गच नाही. त्यामुळे या भागातील घरांमध्ये पाणी शिरून दोन फूट एवढे पाणी साचले आहे. त्यामुळे घरातील अन्नधान्य, कपडेलते, व इतर महत्त्वाच्या संसार उपयोगी वस्तूंची मोठ्या प्रमाणात नाजदूस होऊन पाण्याने वाहून गेले आहेत. याला मनपा प्रशासन जबाबदार आहे यावर्षी मनापाने या भागातील एकही नाल्यांचे काम केले नसेल मुळे नागरिकांच्या घरात पाणी शिरले आहे. यावेळी प्रशासनाने दखल घेऊन तात्काळ तहसीलदार संजय वारकड, सचिन वडाल्ल ,वाघाळा तलाठी सज्जाचे तलाठी संजय वानोळे व खाजगी कर्मचारी व्यंकट इंगळे यांनी पूरग्रस्त भागाची पाहणी करून घरात पाणी शिरलेल्या घरांचे सर्वे करून नाव नोंदणी करण्यात आली आहे.

### संक्षिप्त वृत्त

**भोकरच्या विश्वकर्मा नगर भागात सूविधांचा आभाव**

**भोकर**-शहरातील विश्वकर्मा नगर येथील सर्वांगीण विकासाकडे न.प प्रशासनाचे दुर्लक्ष असुन या भागातील नाली व रस्ते नसल्याने नागरीकांना यांचा मोठा त्रास सहन करावा लागत असल्याने नगरपरिषदेने निवडणुकीच्या अगोदर या समस्याचे निवारण न केल्यास या वार्डातील नागरीकांनी मोठ्या संख्येने आंदोलन छेडण्याचा इशारा सामाजीक कार्यकर्ते चंद्रकांत स्वामी मुस्तापुरे यांनी निवेदनाद्वारे नगर परिषदेला दिला आहे. म्हैसा रोडवरील विश्वकर्मा नगरमध्ये मागील अनेक वर्षांपासून सांडपाणी जाण्यासाठी विश्वकर्मा नगरमध्ये नाली नसल्याने ते पाणी मुख्य रस्त्यावरुन वाहत आहे. त्यामुळे रस्त्याने चालणे मूश्किल झाले आहे.कारण या वार्डात अद्याप सि.सि.रस्ता व नाली नाही.त्यामुळे शाळकरी मुले, महिला,वृद्ध यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.या नगरा लगत असलेल्या एम.आय.डी.सी च्या मोकळ्या जागेत कचरा व मृत जनावर टाकत असल्याने याचा उग्र वास येत आहे.लहान मुलं आजारी पडत आहेत.

## पावसामुळे हदगाव तालुक्यातील हजारो हेक्टर पिकांचे नुकसान

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २८ ऑगस्ट -**

दि. २८ ऑगस्ट रोजी हदगाव तालुक्यात सर्वदुर मुसळधार पावसाने शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे अतोनात नुकसान झाले असून हजारो हेक्टर खरीप पिकामध्ये पाणी गेल्याने तर काही ठिकाणी पिकासह माती वाहून गेल्याने शेतकऱ्यावर संकट कोसळले आहे. २८ ऑगस्ट रोजी रात्रभर तर शुक्रवारी २८ ऑगस्ट रोजी सकाळी २ तास जोरदार पाऊस झाल्याने तालुक्यातील नद्या आणि नाले तुडुंब भरून वाहत असल्यामुळे अनेक गावांचा संपर्क काही वेळा साठी तुटला होता.



परिणामी हदगाव तालुक्यातील संपूर्ण जनजीवन मुसळधार पडलेल्या पावसाने विस्कळीत झाले आहे. तालुक्यात अनेक गावातील पुलांची उंची कमी असल्यामुळे जनतेची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. मनाठा येथील तलाव संपूर्ण भरल्याने मनाठा तसेच शिवदरा गावातही पाणी शिरले. गौरी गणपतीचा उत्सव सुरू असल्यामुळे ग्रामीण भागातून सणासुदीच्या खरेदीसाठी येणाऱ्या - जाणाऱ्या नागरिक व महिलांसह शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय झाली. तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील पिकात पाणी शिरल्यामुळे सोयाबीन, उडीद ही पिके धोक्यात आली असून काढणीसाठी आलेल्या मुगाचे पीक हातातून निसटले आहे. दोन दिवसापासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीची कृषी विभाग आणि महसूल विभागाने तातडीने पाहणी करून नुकसानीचे पंचनामे करावेत आणि शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

**वर्धा-यवतमाळ-नांदेड रेल्वे मार्गाच्या भरावामुळे शेतकऱ्यांचे पिकांचे नुकसान**

नागपूर ते नांदेड रेल्वे मार्गाचे काम सध्या सुरू असताना, २९ रोजी झालेल्या पावसामुळे बामणी फाटा परीसर तसेच चिंचगव्हान परिसरातील शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. रेल्वेच्या भरावाच्या कामाचे योग्य नियोजन नसल्याने पाणी निचरा हा शेतातून होत असून ३ ते ४ एकरातील चांगले उभे असलेले पीक या पाण्याने वाहून जाऊन शेत खरडल्या गेले आहे. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, रेल्वेने संपादन केलेल्या जमिनींसाठी कमी मोबदला दिला असून, संपादन न केलेल्या शेतातील पिकात भरावाचे पाणी वाहत असल्याने हानी झाली आहे. यामुळे शेतकरी हवालदिल झाले असून, त्यांनी शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी होत आहे.

## शिक्षकाची बदली थांबवण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. २८ ऑगस्ट -**

किनवट तालुक्यातील इस्लापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षक इर्शाद इब्राहिम पांडे , यांची नुकतीच बदली देवाची वाडी , येथे झाल्याने इस्लापूर येथील गावकरी तसेच शाळा व्यवस्थापनचे पदाधिकारी यांनी सदरील शिक्षकाची बदली थांबवावी अशी मागणी मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड , यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे .

सविस्तर वृत्त असे की इस्लापूर सावरकरनगर येथील जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक पांडे , यांची बदली देवाची वाडी , ता . कंधार 'येथे झाली असून यांची बदली थांबवणे कारण गेल्या दोन वर्षापासून येथील विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेच्या स्पर्धेत राष्ट्रीय पातळीवर यश मिळवून दिले व शाळेची पटसंख्या दुपटीने वाढ केली तसेच शाळेची गुणवत्ता पाहता लोकसभागातून शाळेचा कायापालट केला इंग्रजी माध्यमातून मुलाचे मराठी शाळेत प्रवेश केले . सदरील शिक्षकाने जिल्हा परिषद शाळेविषयी लोकांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन विकसित केला आहे . तरी या शिक्षकांमुळे येथील शाळेची गुणवत्ता सुद्धा चांगली आहे . सदरील शिक्षकाची बदली झाल्यास विद्यार्थ्यांचे व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे अतोनात नुकसान होईल . सदरील शिक्षकाची बदली न थांबवल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात सदरील शिक्षकासाठी पालक व विद्यार्थ्यासह उपोषण करू असा ईशारा येथील माजी सरपंच सूर्यकांत बोधनकर ' पालक जगदीप हानवते , गौरव कदम , राम लंगोटे ,आदी पालकांनी निवेदनाद्वारे दिला आहे .

सदरील शिक्षक यांची कपल मध्ये कंधार तालुक्यात बदली झाली आहे .त्यांच्या पत्नीसह त्या दोघांची बदली किनवट तालुक्यामध्ये व्हावी असेही निवेदनात मागणी आहे.

## मुदखेड येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्रवेश प्रमुखाचा मनमानी कारभार

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २८ ऑगस्ट -**

मुदखेड शहरातील बंदा बैरागी( बंदा सिंघजी बहादुर) औद्योगिक प्रशिक्षण संस्था ही मराठवाड्यात प्रवेश मध्ये खालून दोन नंबर वर आहे तरी सुद्धा प्रवेश प्रमुख विद्यार्थ्यांना उडवाउडवीचे उत्तरे देत असतात असे विद्यार्थ्याकडून ऐकावयास मिळत आहे.

दि. २८ ऑगस्ट रोजी पासून संस्था स्तरीय फेरी चालू आहे. विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रमुख सुनील ननवरे (गट निदेशक) यांना फोन करून ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी माहिती विचारली असता त्यांनी ऑनलाइन करून घ्या असे सांगितले परंतु ऑनलाईन प्रक्रिया होत नसल्यामुळे विद्यार्थ्यांनी त्यांना पुन्हा फोन केले असता त्यांनी फोनच उचलला नाही त्यामुळे भर पावसात ॲडमिशन साठी आलेल्या विद्यार्थ्यांना परत जावे लागले आहे.

संस्थेचे प्रवेश प्रमुख यांच्या मनमानी कारभारामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. ते नांदेड वरून ये-जा करित असतात आय टि आय च्या वेळेनुसार न येता केव्हाही येतात आणि केव्हाही जातात यामुळे विद्यार्थ्यांना ॲडमिशन साठी वाट पहावी लागत आहे. प्रवेश प्रमुख यांच्या मनमानी कारभारामुळे विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. औद्योगीक प्रशिक्षण संस्थेचे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी नांदेड यांनी प्रवेश प्रमुख यांच्या मनमानी कारभाराला आळा घालतील का ? याकडे सर्व विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे.

## जे.के.जोंधळे यांना सामाजिक पुरस्कार जाहीर

**तभा वृतसेवा**
**मुखेड, दि. २९ ऑगस्ट -**

उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी तत्पर, सामाजिक धार्मिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारे जे.के. नावाने सुपरिचित व्यक्तिमत्त्व, वंचित बहुजन आघाडीचे ज्येष्ठ सल्लागार तथा आंबेडकरी चळवळीचे प्रेरणास्त्रोत मुखेड तालुक्यातील मौजे मोटरगा येथील भूमिपुत्र जेष्ठ नेते जे. के. जोंधळे यांना अकोला जिल्हा कलावंत समितीच्या वतीने महाकवी वामनदादा कर्डक, स्वरसम्राट प्रल्हाद शिंदे, महाकवी प्रतापसिंग बोदडे यांच्या संयुक्त जयंती उत्सवात सामाजिक व आंबेडकरी चळवळीच्या योगदानासंदर्भात प्रतिष्ठेचा पुरस्कार समितीचे अध्यक्ष श्रीकृष्ण वानखेडे व अंतकला वानखेडे यांच्याकडून जाहीर झाला आहे.

## आ. हेमंत पाटील यांनी मुसळधार पावसात पूरग्रस्त भागाची केली पाहणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड , दि. २९ ऑगस्ट -**

मागील दोन दिवसांपासून नांदेड शहर व जिल्ह्यात मुसळधार पाऊस सुरू असल्याने नदी , नाले तुडूंब भरून वाहत आहेत.नांदेड दक्षिण मतदारसंघात सिडको-हडको, जुना नांदेड भागातील नावघाट,मिट्टीका शेर, वसरणी, खडकपुरा, लालवाडी,वसंतराव नाईक कॉलेज चा भाग, पक्कीचाळ, चौफाळा , माळी लक्ष्मीनगर, गाडीपुरा भागात नाल्याचे पाणी नागरिकांच्या घरात शिरल्याने दैनंदिन वापराच्या साहित्याची व अन्न धान्याची नासाडी झाली.पुरामुळे सगळीकडे भयावय परिस्थिती निर्माण झाली आहे.या पूरग्रस्त भागाची आमदार हेमंत पाटील यांनी आज ( दि. २९) पाहणी करून पुरग्रस्तांशी संवाद साधला व त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या.



आज ( दि.२९ ) रोजी पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसाने हाहाकार उडाला यामुळे नांदेड शहरातील जुन्या नांदेड व सिडको-हडको,जुना नांदेड भागातील नावघाट,मिट्टीका शेर, वसरणी, खडकपुरा, लालवाडी , वसंतराव नाईक कॉलेज चा भाग, पक्कीचाळ, चौफाळा , माळी लक्ष्मीनगर, गाडीपुराच्या, सखल भागात राहणाऱ्या नागरिकांच्या घरात नाल्यांचे पाणी शिरले त्यामुळे या भागातील सर्व जनजीवन विस्कळीत झाले .तर लातूरफाटा भागात राष्ट्रीय महामार्गावर पाणी साचल्याने वाहतूक बंद झाली होती. पुरामुळे नागरिकांचे अतोनात हाल झाले असून आमदार हेमंत पाटील यांनी सकाळी सुरु असलेल्या मुसळधार पावसात पूरग्रस्त भागाची नागरिकांसोबत पाहणी केली. जिल्हाधिकाऱ्यांशी फोनवर संपर्क साधून पूरग्रस्तांना तातडीने सुरक्षित स्थळी हलविण्यासाठी तात्काळ यंत्रणा कार्यान्वित करावी अश्या सूचना दिल्या .व पूरग्रस्तांना जीवनावश्यक गरजा तात्काळ पुरविण्यात याव्यात याबाबत निर्देश दिले.यावेळी आमदार आनंदराव बोंढारकर, जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे,शहर प्रमुख सुहास खराणे, अजीज खुरेशी, अशपाक पहलवान यांच्यासह आदी होते.

## सेवकाच्या पुत्रांची प्रतिकूल परिस्थितीवर मात करत पाच शासकीय नोकऱ्यांना गवसणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड , दि. २९ ऑगस्ट -**

कंधार तालुक्यातील फुलवळ येथील रामराव स्वामी फुलवळकर हे पंचायत समिती कंधार येथे सेवक पदी कार्यरत होते.. ते २०१७ मध्ये सेवानिवृत्त झाले. अशा सेवकाचा मुलगा जेव्हा एक नाही दोन नाही तर तब्बल पाच सरकारी नौकरी मिळवतो तेव्हा त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होतो. अशाच एका होतकरु मुलाने जिद्द, चिकाटी व मेहनतीच्या जोरावर यश मिळवले आहे. तो सध्या लातूर जिल्ह्यातील उदयगिरी महाविद्यालय उदगीर येथे प्राध्यापक या पदावर नुकतीच या महिन्यात रुजू झाला आहे. त्याचे सर्वत स्तरातून कौतुक होत आहे.

श्री रामराव स्वामी फुलवळकर यांचा मुलगा शिवहार रामराव स्वामी याने अनुकूल परिस्थितीवर मात करत जिद्द व चिकाटीच्या जोरावर यश संपादन केलं आहे. दररोज अभ्यास हाच एक ध्यास मनाशी बाळगून त्याने यशाला गवसणी घातली आहे. यामुळे त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

शिवहार याने जिल्हा परिषद फुलवळ येथे प्राथमिक शिक्षण घेतले. तर माध्यमिक शिक्षण हे कंधार येथील गणपतराव मोरे विद्यालय व हायस्कूल कंधार येथून व उच्च माध्यमिक शिक्षण हे शिवाजी कॉलेज कंधार येथे झाले. त्यानंतर डीएड ला ॲडमिशन घेऊन चांगल्या मार्कांने डीएड पास झाला. त्यानंतर त्यांने गावातच राहून पुढील स्पर्धा परीक्षेचा अभ्यास तसेच गावातील लहान लेकरांना ट्युशनच्या माध्यमातून शिक्षण देऊ लागला. त्यासोबतच त्यांनी आपले पदवी व पदव्युत्तर शिक्षण मुक्त विद्यापीठातून पूर्ण केले.

सर्वप्रथम त्याने फुलवळ मध्ये २०१० साली केवळ ३ मुलांपासून खाजगी शिकवणी वर्ग सुरू केले होते. त्यानंतर त्यांनी पाठीमागे वळून कधीच पाहिले नाही गुणवत्तेच्या जोरावर फुलवळ व कंधार येथे स्पर्धा परीक्षेचे क्लास सुरू केले. जवळपास त्यांच्या मार्गदर्शनातून पोलीस भरती व सैन्य भरती मध्ये तालुक्यातील सुमारे ५० तरी विद्यार्थी सरकारी नोकरीवर लागले आहेत.. त्यांनतर क्लासची गुणवत्ता पाहून विद्यार्थी संख्या २०१५ पर्यंत २०० च्या वर झाली होती. २०१५ मध्ये MPSC मार्फत घेण्यात आलेल्या लिपिक टंकलेखक पदी निवड



झाली... परंतु त्यांनी त्या ठिकाणी न जाता क्लासेस वरच लक्ष केंद्रित केले... पुन्हा २०१८ साली डढ महामंडळ जामखेड आगार येथे लिपिक पदी निवड झाली. घरच्यांच्या आग्रहामुळे जामखेड आगारात जवळपास १८ महिने नोकरी केली... त्यानंतर २०१९ मध्ये पवित्र पोर्टल अंतर्गत सातारा जिल्हा परिषद येथे प्राथमिक शिक्षक निवड झाली. तेथे जवळपास ६ वर्ष नोकरी केली. त्यांनतर २०२२ साली घेण्यात आलेल्या शिक्षक अभियोग्यता चाचणी परीक्षेमध्ये १२८ गुण घेऊन पवित्र पोर्टल टप्पा क्र. १ मध्ये, रयत शिक्षण संस्था सातारा अंतर्गत माध्यमिक शिक्षक म्हणून निवड झाली.. परंतु त्या ठिकाणी रुजू होण्यासाठी अवधी घेतली होती... त्याच गुणांच्या आधारे टप्पा क्र. २ मध्ये उदयगिरी महाविद्यालय उदगीर येथे प्राध्यापक पदी निवड झाली.

शिवहार लहानपणापासूनच शिक्षणामध्ये आवड असलेला विद्यार्थी, त्याला आयुष्यात काहीतरी करून दाखवण्याची जिद्द होती. पुस्तकाच्या व्यतिरिक्त त्यांनी कुठल्याही गोष्टीसाठी हट्ट केला नाही. कुठलाही सण समारंभ कुटुंबासोबत साजरा न करता त्याने आपला सण समारंभ हा पुस्तकांसोबतच साजरा केला, यामुळे त्याला हे यश मिळाले असे त्याचे वडील सांगतात....

**'आयुष्यामध्ये संगत फार महत्त्वाची'**

आयुष्यामध्ये मित्र निवडत असताना चांगल्या सवयीचे असावेत असे म्हणले जाते याच गोष्टीला लक्षात ठेवून शिवहार याने अभ्यास करणारी इतर कुठलेही नाद नसलेल्या मित्रांसोबत त्यांनी संगत केली यामुळेच दररोज अभ्यास करण्यासाठी त्याला प्रेरित आई वडील, शिक्षक व मित्रपरिवार यांनी केल्यांचे शिवहार यांनी सांगितले. जिथे जिथे आयुष्यात अपयश मिळालं तिथे तिथे आई वडील शिक्षक गावकरी व मित्रपरिवार हे सर्व खंबीरपणे सोबत उभे राहिले ज्यामुळे आयुष्यात दुसऱ्या कोणत्या मोटिवेशन ची गरज लागली नसल्याचे शिवहार सांगतो...

## निसर्गाने केली अतिवृष्टी, प्रशासनाकडून होतेय वक्रदृष्टी

**तभा वृतसेवा**
**फुलवळ, दि. २८ ऑगस्ट -**

कांही दिवसांपूर्वीच फुलवळ महसूल मंडळात पावसाच्या हाहाकारामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून सर्वाधिक म्हणजेच १३३ मिमी पावसाची नोंद या भागात झालेली असतानाच आता आता कुठे दैनंदिन जीवनाची घडी सुधारत पटरिवर येताना पाहायला मिळत होती. पण पुन्हा काल रात्रीपासून फुलवळ सह परिसरात अतिवृष्टी चा जोर वाढल्यामुळे खरिपाच्या पिकांचे तर अतोनात नुकसान झालेच पण अतिपावसामुळे नदी , नाले तुडूंब भरून वाहत असल्याने बहुतांश ठिकाणी गावागावांचा संपर्क तुटल्याने जनजीवन विस्कळीत होऊन बसले आहे. मन्याड नदीही दुथडी भरून वाहत आहे. त्यातच सर्दी , ताप , खोकला अशा छोट्या मोठ्या आजारांनी डोके वर काढल्याने जन माणूस चिंतातुर झाला आहे. तेंव्हा तत्काळ या भागातील खरिपाच्या पिकांचे शेत पंचनामे करून आवश्यक ती मदत करण्यात यावी अशी मागणीही केली जात असतानाच निसर्गाने केली अतिवृष्टी , प्रशासनाकडून होतेय वक्रदृष्टी असे म्हणत अतिपावसाने खरिपातील पिके झाली मातीमोल , पण प्रशासनाकडून ना पंचनामे ना सहानुभूतीचे बोल. अशा भावना व्यक्त केलेल्या ऐकायला मिळत आहेत.

उन्हाळ्यात जीवाची लाही लाही सहन करत पेरणीपूर्व मशागतीची कामे आटोपून बळीराजा खरिपाच्या पेरणी ला सज्ज झाला असतानाच यंदा पाऊसच उशिरा झाल्यामुळे पेरणी ला विलंब झाला , ता.७ जून ला जरी मृग नक्षत्र प्रारंभ झाले असले तरी पेरण्या मात्र जवळपास ता.१५ - २० जून च्या नंतरच सुरू झाल्या. पिकांचा मोड बालवयातच असतांना फुलवळसह कंधार तालुक्यात यंदा पावसाने चांगलाच कहर घातला असल्याने अतिवृष्टी सदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून काही महसूल मंडळाची त्यात नोंदही झाल्याचे कळते त्यात फुलवळ महसूल मंडळात १३३ मिमी पावसाची नोंद झाली तरीपण अद्यापही प्रशासन आणि लोकप्रतिनिधी कडून मदती संदर्भात कोणतेच पाऊल उचलले नसल्याने शेतकऱ्यांसह सर्वसामान्य माणूस अडचणीत आला असून आता मदतीची धावा करत आहे.

गेले काही दिवसांपासून चालू असलेल्या सतंतधार पावसामुळे छोट्या मोठ्या तलावांच्या पाणी पातळीत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली असून ओढे , नाले , नद्या तुडुंब भरून वाहत असल्याने सर्वत्र पाणीच पाणी झाल्याचे चित्र पहावयास मिळते आहे. शेती पिकांचे नुकसान मोठ्या प्रमाणावर झाले असून फुलवळसह कंधार तालुक्यातील सर्वच भागात खरिपातील कापूस , सोयाबीन , ज्वारी , मूग , उडीद , तूर , तसेच हळद ही पिके आता हातची जातांना उघड्या डोळ्यांनी पाहावे लागत असून बालवयातच अति पावसामुळे तग सोडलेली पिके पुन्हा कसा जीव धरतील या चिंतेत असलेल्या शेतकऱ्यांच्या तोंडून ऐकायला मिळत असलेली प्रतिक्रिया म्हणजे मातीमोल झाला शेतशिवार तरीपण शासन व प्रशासन काही देईना आधार. शेतशिवारांचे पंचनामे करून शासन व प्रशासन शेतकऱ्यांना आधार देईल अशी आशा होती परंतु आजपर्यंत तरी तसे काही दिसून येत नसल्याने शेतकरी चिंतेत अडकला आहे तर शेती पिकांबरोबरच दैनंदिन मानवी जनजीवन ही विस्कळीत झाल्याचे पाहायला मिळते आहे. तर अतिपावसामुळे फुलवळ जुने गावठाण व नवीन गावठाण च्या मधोमध असलेल्या पुलावरून अधूनमधून पाण्याचा प्रवाह वाढत असल्याने नेहमीच संपर्क तुटत असतो तसेच कंधारेवाडी येथील पुलावरून पाणी वाहत असल्याने तिथल्या पण लोकांचा संपर्क तुटत आहे. शालेय विद्यार्थ्यांनाही याचा फटका बसत असून शालेय शैक्षणिक नुकसान होत आहे.

**माहूर नगर पंचायत, माहूर जि. नांदेड**

फोन न.-०२४६०२८६१७५ Email ID-mahurcogamil.com

जा. क्र. २०२५/नपंमा/वि.यो/टे-१/५६२ दिनांक-२८/०८/२०२५

**ई-निविदा सुचना क्रं.०४ सन.२०२५-२६**

माहूर नगर पंचायत कडून विशेष रस्ता अनुदान योजना व वैशिष्ट्यपूर्ण योजना या योजने अंतर्गत योग्य त्या खुला वर्गातील कंत्राटदाराकडून कामांची ई-निविदा बी-१ नमून्यात मागविण्यात येत आहेत ई-निविदा दिनांक:-२९/०८/२०२५ सकाळी ११.०० ते दिनांक:-०८/०९/२०२५ दुपारी ०१.०० वाजेपर्यंत पाहणे, डाऊनलोड करणे व ऑनलाईन भरता येईल ई-निविदेची सर्व आवश्यक दिनांक व सविस्त ई-निविदा अटी व शर्तीसह शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळाव पहावयास मिळतील.

**(विवेक भारत कांदे)**
**मुख्याधिकारी नगर पंचायत,**
**माहूर**